


प्रस्तावना.

अश्वपरीक्षेचे ग्रंथ साद्यंत मराठींत कोठें आढळत नाहींत. मुख्य प्राचीन नकुलकृत व नलकृत असे दोन शालिहोत्राचे ग्रंथ आहेत ह्मणून पुष्कळ लोकांस ठाऊक आहेत. हे पुरे ग्रंथ दुर्मिळ आहेत. ज्या ज्या ग्रंथांचे किती एक त्रुटित दाखले अश्वपरीक्षेविषयीं सांपडतात तेही ग्रंथ कल्याणकृतसार, शालिहोत्र, वीरामित्रोदय, विष्णुधर्मोत्तर, जयकृतअश्वचिकित्सा, शारंगधर, भूपवल्लभ इत्यादि मिळत नाहींत. अग्निपुराणांत अश्वपरीक्षेचे कांहीं गुणावगुण सांगितले आहेत, परंतु पद्धतशीर कोठें ग्रंथ झालेला नाहीं. श्रीमंत प्रतापसिंह सातारछत्रपति राजाचे कारकीर्दींत प्रतापसिंहग्रंथ झाला आहे–तो ग्रंथ आह्मास फार प्रयत्नांनीं मिळाला. तो पद्धतवार ग्रंथ झाला आहे. त्या संस्कृतग्रंथावरून आह्मास हा ग्रंथ करण्यास फार उपयोग झाला. नळकृत व नकुळकृत हे दोन्ही ग्रंथ मिळाले. फारशी भाषेंत अनुभवशीर असलेला ग्रंथ, श्री. रा. रा. बाळासाहेब, खारकर जामनगर राजाचे दिवाण, यांणीं आह्मास दिला. त्यावरून घोड्यांचे रोगांविषयीं चिकित्सा व औषध यांचा उपयोग केला. हा फारशी ग्रंथ जुन्या संस्कृत ग्रंथांस अनुसरून आहे. यांत अनुभवास आलेलीं औषधें फार आहेत. हल्लीं अश्वपरीक्षेविषयीं इंग्लिशलोकांपेक्षां जास्ती माहिती कोणास नसावी असें वाटतें. तेही इंग्रजी ग्रंथ पाहिले तरी आमचे जुने ग्रंथास मिळत आहेत. इंग्रजी, मराठी, फारशी, व संस्कृत हे ग्रंथ आह्मास मिळाले त्यावरून हा ग्रंथ आह्मीं आज सुमारें चार वर्षें करीत आलों; तो आमच्या मतें बराच लोकोपयोगी झाला आहे. हा ग्रंथ जवळ बाळगिला असतां घोडे कसे बाळगावे व त्याच्या

खोडी व रोग, त्यावर औषध काय, व घोड्यांस कसें वागवावें, शिकवावें व तयार करावें, हें सर्व ज्ञान होणारें आहे. आणि किंमतवान् घोड्याचा बचाव रोगापासून वगैरे करतां येईल. श्रीमान् लोक घोडीं बाळगितात त्या लोकांस फारकरून थोडीबहुत माहिती असते. त्यांचे उपयोगास हा ग्रंथ अवश्य असला पाहिजे. घोडा खरेदी घेणें ह्मणजे पूर्वीचे लोक गुण अवगुणाचे खोडीकडे फार लक्ष्य देत असत. त्याविषयीं हल्लीं आस्तिक्य कमी झालें आहे; तरी अद्याप ती चाल मोडली नाहीं. सबब खोडी पहाण्यास दुसऱ्याचे आर्जव करणें नको. तसेंच घोडा आजारी झाला तर लागलीच विटिनरी सर्जन (घोड्याचे डाक्तर) यांजकडे पाठविण्याची जरूर पडणार नाहीं.

संस्कृत ग्रंथाचें भाषांतर वेदशास्त्रसं० रा० वामनशास्त्री केमकर, पुणें नेटिव इन्स्टिट्यूशन विद्यालयांतील संस्कृताध्यापक व ' आर्यमित्र, नामक मासिक पुस्तकाचे कर्त्ते, यांणीं केलें आहे. फारशी ग्रंथाचें भाषांतर पुणें येथील विद्वान् व वृद्ध काजी सय्यद अल्ली साहेब काजी यांणीं केलें आहे. फारशींत जीं औषधांचीं नांवें मराठींत लागलीं नाहींत तीं तशींच आह्मीं क्वचित् ठिकाणीं ठेविलीं आहेत; तरी त्यामुळें त्या औषधांचा कमीपणा होणार नाहीं. एक रोगावर एकच औषध लिहिलें असें नाहीं. दहा वीस औषधें लिहिलीं आहेत.

या ग्रंथांत इंग्रजी ग्रंथांवरून इंग्रजी औषधांचा बराच उपयोग लिहिला आहे. त्याचा उपयोग पुणें, मुंबई, वगैरे ज्या शहरांत इंग्रजी दव्यांचीं दुकानें आहेत तेथें आयास न पडतां करून घेतां येईल.

या ग्रंथांत इंग्रजीवरून घोड्यांचें शारीरज्ञानही आह्मीं साद्यंत लिहिणार होतों, ह्मणजे तेणेंकरून कोणताही रोग झाला असतां तो शरीरांत कोठें होतो हें समजण्यांत आलें असतें. परंतु हें सांगणें फार कठीण आहे. आह्मीं त्याचें मराठींत भाषांतर केलें आहे पण हल्लीं हा ग्रंथ फार वाढल्यामुळें त्यांत ते दाखल केलें नाहीं. पुढें दुसरी

आवृत्ति काढण्याचा सुप्रसंग येईल तर त्यांत ते सामील करूं अशी इच्छा ठेविली आहे.

ग्रंथ साद्यंत मन लावून वाचावा अशी ग्रंथ करणाराची विनयपूर्वक विनंति आहे, ह्मणजे वाचणारांस माहिती होईल व ग्रंथ करण्याची मेहनत किती झाली हें कळेल.

इतका मोठा अश्वपरीक्षेचा मराठींत ग्रंथ आजपर्यंत कोणीं केला नाहीं. हा प्रथमच झाला आहे. यांत चूक व अशुद्ध कोठें पडलें नसेल असें ह्मणवत नाहीं, तरी याविषयीं परीक्षकांनीं माफी करावी.

हें पुस्तक आह्मीं जाहिरात दिल्याप्रमाणें मुतदींत शेवटास गेलें नाहीं; याचें कारण, आह्मास इतर कामांमुळें पाहिजे तसा अवसर मिळाला नाहीं व तसेंच ग्रंथ विस्तारही फार झाला त्यामुळें आमचा निरुपाय झाला.

हें पुस्तक इतकें मोठें होईल असें आह्मास वाटत नव्हतें व अनुमानापेक्षां दुप्पट लिहिणें होऊन वेळही जास्ती लागला व त्या मानानें खर्चही वाढला; सबब शारीरज्ञानाचा भाग मागें ठेवावा लागला.

हा ग्रंथ श्रीमंत रा. बाळासाहेब खारकर, जामनगरचे माजी दिवाण, यांणीं पाहून पसंत केला आहे, व अश्वविद्येंत यांस चांगली माहिती आहे. ह्याच प्रमाणें आणखी किती एक अश्ववेत्यांनींही कबूल केलें आहे.

प्रसिद्ध श्रीमंत बाबासाहेब आप्टे या ग्वाल्हेर संस्थानांतील अश्ववेत्यांजवळ शिकलेले नामांकित प्रोफेसर रा. रा. विष्णु मोरेश्वर छत्रे, "धि ग्रॅंड इंडियन सर्कस" चे मालक यांणींही हा आमचा उद्योग पसंत केला आहे.

रामचंद्र सखाराम गुप्ते.

अनुक्रमणिका.

अश्ववर्णन	१— ३
अश्वजातिपरीक्षा ब्राह्मणादिकरून	३— १०
खेचरीची परीक्षा	११— १२
गर्दभपरीक्षा...	१२
गुणावरून, गंधावरून व सत्वावरून अश्वजातिपरीक्षा.	१२— १६
अश्वाचे ठिकाणीं ९ छाया असतात त्यांचें वर्णन	१७
घोड्यास सार ह्मणजे शुक्र मज्जादि धातु ज्यास्त असते त्यावरून सार समजण्याचा प्रकार	१८—१९
घोड्याची बुद्धि, आहार, व निद्रा, ह्यांविषयीं	१९
अनुकार	२०
देवाश्व	२०
अश्वमेधास घोडा कसा असावा ह्याविषयीं....	२१— २२
राजयोगकारक अश्व	२२— २५
रंगांविषयीं (घोड्यांच्या अनेक रंगांचें वर्णन)..	२६— ३२
भरतखंडांतील ५६ देशांचीं संस्कृत व प्राकृत नांवें (अश्वकुळाचें ठिकाण समजण्याकारितां)	३२— ३५
घोड्याचे जन्मदेश....	३५— ३८
अश्वकुलानि(अश्वाचीं कुळें, उपकुळें यांचें वर्णन)	३९— ६०
अश्वाचे शरीराचे विभाग	६०
शरीरवर्णन...	,,
स्थानकोश (अश्वांचे स्थानांचीं नांवें) संस्कृत शब्दाचा प्राकृत अर्थ....	६०— ६४

प्रत्येक अवयव कसे असावे याविषयीं. .... ६४— ७१
अवयवांची परीक्षा.... .... ७१— ७२
घोड्यांचें शारीरवर्णन .... ७३— ८४
अवयव मोजण्याची रीत ८४
घोड्यांचे भोंवऱ्याविषयीं व वाईट बरे खोडींविषयीं.... ८५—१०९
आयुष्याविषयीं ....११०—११३
घोड्याच्या दांतांवरून वय समजण्याची रीत ....११३—११९
अश्वशाळा (तबेला) कसा असावा ....११९—१२३
घोड्याच्या चाकरीविषयीं व त्यास लागण्यार्चे सामान.१२३—१२६
घोड्याच्या बिछान्याविषयीं.... ....१२७
व्यायाम व त्याचें अंग घुर्णे व काम घेणें ....१२७—१२९
घोड्यांस नाळ करणें. ....१२९ व १३०
पोषणविधि (कोणते महिन्यांत कोणतें व किती धान्य द्यावें) ....१३०—१३८
वळू घोड्याविषयीं जतन वगैरे. ....१३८—१५२
पसू घोडीच्या गर्भाशयाचें वर्णन १५२
गर्भधारणाविषयीं ....१५३—१५७
अश्वोत्पत्ति-घोडीस वळू घोडा देण्याची रीत.. ....१५७—१५९
सूतिकोपचार-घोडी पसवल्यावरचे उपचार.... ....१५९—१६२
घोडीचें दूध बिघडल्यास उपचार.... ....१६२
शिंगराचें पालन करण्याविषयीं (वाढविणें).... ....१६३—१६६
किशोरोपचार-शिंगरें पुष्ट करण्याविषयीं.... ....१६६—१७३
घोडा पुष्ट होण्याचे उपाय.... ....१७३—१७७
घोड्याचे रंग चांगले होण्याविषयीं व केश झडणें याविषयीं.... ....१७७—१७८
चाबूकस्वारांचीं लक्षणें ....१७८—१८१

विषय. पृष्ठें.
घोड्याचे गतीविषयीं.... ....१८१—१८३
शिक्षणाविषयीं(घोड्यास गति शिकविण्यास जागा कशी
असावी याविषयीं व चाली वगैरे शिकविणें). १८३—१९७
तयार झालेला घोडा बिघडल्यास सुधारणें विषयीं १९७
घोड्यास कारणपरत्वें मारण्याबद्दल.... ....१९७—२०२
घोडा खरेदी घेण्याविषयींचीं चिन्हें.... ....२०२—२०४
बसावयाकारितां, गाडीकारितां. शर्यतीकारितां, व शि-
कारीकारितां घोडा कसा असावा त्याविषयीं..२०४—२०७
घोड्याची अवयवपरीक्षा २०६
घोडा विकत घेते वेळेस विशेष अवयवपरीक्षा ....२०८—२३३

भाग २ दुसरा.

विषय	पृष्ठें.
घोड्याचे रोगाविषयीं चिकित्सा, निदान, आणि औषधोपचार यांचें वर्णन....	१
वातपित्तकफप्रकृतिपरीक्षा.....	१— ५
औषध देण्याचें प्रमाण..	५— ८
पिंड (गोळा) करून औषध कसें व कोणते रोगावर व कशानें देणें तें	८— १०
काढ्याविषयीं–कोणते रोगावर कसा व कशाचा देणें तें	१०— १२
घृत करण्याचा प्रकार–कशावर करणें व किती देणें....	१२— १६
तेल करण्याचा प्रकार व कशावर देण्याचें तें....	१६— १७
वातहारक तेलें.	१७— १९
स्नेहपरीक्षा (तेल तूप घोड्यास किती पाजणें याचा प्रकार).	१९— २०
नस्य देण्याचा प्रकार(नाकांत औषध घालण्याची रीत)	२०— २१
अश्वास घाम काढण्याचा उपाय	२१
अनुवासन (तेल तुपाची पिचकारी मारणें)....	२१— २२
निरूहबस्ती (काढे वगैरे मिश्रण करून पिचकारी मारणें)	२२— २३
शीर टोंचून रक्त काढणें	२३— २६
डाग देण्याचा प्रकार.	२६
धातुपरीक्षा व औषध..	२६— २९
शिरोरोग परीक्षा व औषध.	२९— ३०
नेत्ररोगपरीक्षा(पडळ व मुंजिकाची परीक्षा) व औषध	३०— ३३
सिंहानक (रिंगाडा) रोगपरीक्षा व औषध....	३३— ३४
संनिपातरोगपरीक्षा व औषध........	३४— ३५

विषय.	पृष्ठें.
रक्तादि शिरोरोग	३५
कर्णरोगपरीक्षा व औषध....	३५ व १३४
घ्राण (नासा) रोग व औषध....	३६ व १३९
व्रण (क्षत) परीक्षा व औषध.	३७ व ३८
पादरोगपरीक्षा व औषध....	३८— ३९
लंगित (लंगडणें) रोग परीक्षा व औषध	३९— ४१
कासरोग (खोकला दास) व औषध....	४१— ४२
ज्वर....	४२— ४४
अतिसार (ढाळ होतात ते) व औषध....	४४— ४५
कृमिकोष्ट (जंताची परीक्षा)व औषध....	४५— ४६
मूत्रपरीक्षा व औषध.	४६— ४७
शोथ (सूज) परीक्षा व औषध	४७
मुष्क (अंडाची) परीक्षा व औषध....	४८ व २२८
अंत्ररोग (शिस्नरोग) परीक्षा व औषध.	४८ व २२९
उदरपरीक्षा व औषध.	४८— ५०
आर्श (मूळव्याधि) परीक्षा व औषध...	५०— ५१
उन्माद परीक्षा व औषध	५१— ५२
विषपरीक्षा (दंश झाल्याचे किंवा दुसरें विष पोटांत गेल्याचे) व औषध....	५२
अपस्मारपरीक्षा (फेपरें येतें)....	५२
षट्पदादिभक्षणपरीक्षा (पोटांत माशा वगैरे गेल्यास उपाय.)	५२
उत्कर्ण (वायु) परीक्षा व औषध	५३
वातोद्भव रोगपरीक्षा व औषध.	५३—५४
श्वासबलपरीक्षा व औषध....	५४
हाडें मोडतात त्याची परीक्षा व औषध	५५—५६

विषय.	पृष्ठे.
सामान्यरोगपरीक्षा व औषध...	५६—५७
साध्यासाध्यपरीक्षा (रोग बरा होईल कीं, नाहीं) व औषध..	५७— ५८
आयुष्यपरीक्षा व औषध....	५८— ५९
घोड्यास उलट्या होतात त्यावर इलाज	५९— ६०
जुलाब होण्याविषयीं उपाय..	६०
घोड्यानें औषध पाजण्याची रीत व औषध....	६१— ६२
ढाळक देण्याची रीति.	६२
इंग्रजी औषधाचीं वजनें व मापें	६३— ६४
खांडकावर लावण्याचें पाणी..	६४
खांडकावर लावण्याचें मलम....	६४— ६५
शेकण्याचीं औषधें....	६६
ब्लिस्टर (फोड आणण्याचें औषध)	६६— ६७
उवांचें व गोचड्यांचें औषध...	६७
पोटीस (दर्द पिकविण्याचें औषध)....	६७
पिचकारी	६८— ६९
लोसन	६९
तांदळाची कण्हेरी....	६९
सारक व रेचक औषधें	७०
नस्य देण्याचा प्रकार.	७१— ७३
क्षुद्ररोग प्रकार	७३— ७४
मसाला देण्याचा प्रकार	७४— ७९
रोगाचीं कारणें	७९
विशेष उपचाराची माहिती....	७९— ८०
त्वचेचे रोगांवर उपचार....	८०
साधारण सर्व रोगांवर उपाय.	८०— ८१

विषय. पृष्ठें.
हरएक रोग शुद्ध किंवा निर्दोष करण्यावर औषध.... ८१
अग्निमांद्यावर उपाय.. .... ८१
अनोडाईन (दर्द कमी करणारी दवा.) .... ८१— ८२
वरचेवर लीद होत असल्यास (आर्डिनरीडायरिया)
त्यावर उपाय ८२
सर्दी दूर करणारी दवा .... ८२— ८३
पोटदुखीवर पिचकारी मारण्यास औषध.... .... ८३
ढाळकांविषयीं .... ८३— ८५
कषायान्वित औषधें.... .... ८५— ८६
तेलें व ब्लिस्टरें .... ८६— ८७
क्यास्टिक औषधें .... ८८— ९०
चार्ज (मलमपट्टी).... .... ९०
उष्णता आणणारीं औषधें ९१
डेम्यूलमेन्टस (नरमाई आणणारी दवा) .... ९१— ९२
डायफोरेटिक (घाम आणणारें औषध) ९२
डायजेस्टिव्ह (पिकवण्याचें औषध) .... ९२— ९३
ड्यूरेटिक (मूत्रव्याधीवर) ९३
इंब्रोकेशन (तेलानें मर्दन करणें व धुणें).... .... ९३— ९४
इम्यूलेशन (नरमाईस औषध) ९४
एक्सपेक्टरन्टस् (कफ पडण्यास औषध).... .... ९५
फीव्हरिश (ज्वरनाशक).... .... ९५— ९६
क्लिस्टर (पिचकारी) ९६
लोशन (औषधानें भाजणें) .... ९६— ९७
स्टिम्यूलेन्ट (गर्मी आणणारें औषध) ९७
स्टमक (क्षुद्बोधक) .... ९७— ९८
स्टायपिक्स (रक्त बंद करणें) ९८

विषय. पृष्ठें.
वर्ममेडिसन (क्रिमींवर औषध) ९८
टॉनिक (पाचक व पौष्टिक) .... ९८— ९९

मेंदूसंबंधी रोग.

क्रिनिटिस .... ९९—१००
आकसिम् ऑफ धि ब्रेन १००
स्लीपी ....१००—१०१
म्याडस्टचागर (उन्माद)…. ....१०१—१०२
मिग्रिम (मिर्गी)…. १०२
हैड्रोफोबिया (जलद्वेषरोग पिसाळलेलीं कुत्री चाव-
ल्या पासोन)…. ....१०२—१०३
चांदणी ....१०३—१०७
अर्धांगवायु…. ....१०७—१०९
झुला होतो त्यास उपाय ....१०९—१११
झणक वायु…. १११
शिरोरोग ११२

नेत्ररोग.

सिंपल अपथॉल्मिया (वोड्याची लाथाळी होऊन
क्षत पडल्यामुळें होतो) ....११२—११३
स्पेसिफिक आफ् तालमा (वायूपासून डोळ्यास वि-
कार) त्यास औषध…. ....११३—११४
क्याटेन्याक्ट (डोळ्यांतील फूल किंवा मोतिबिंदु)....११४
फंगॉइड (डोळे आंधळे होतात)…. .... ,,
अमरोशिस (मोतिबिंदु)…. ११५
इंपिडिमेंट (डोळ्यांतील पाणी नाकांतून येण्याचा
रस्ता बंद होतो) .... ,,
डोळ्यांतील दर्द (डोळ्यांतून पिवळें निळें पाणीं येते) ११५—१२५

विषय. पृष्ठें.
डोळे आणि तोंड सुजतें त्यावर उपचार ....१२६—१२७

मुखरोग.

खालचे जबड्याची इजा १२७
घोड्याचें तोंड येतें त्यावर उपचार.... ....१२७—१२८
जिव्हारोग (जिभेवर चिरा पडतात किंवा जीभ उकलते)१२८
तोंड येतें व त्यांत चट्टे पडतात .... ,,
घोड्याच्या तोंडाचे रोग ....१२८—१३०
दंतरोग १३०
उशीत रोगाचें लक्षण (घोड्यास अनसुट लागते)
त्यावर उपाय १३१
घोड्याला फासणी (कशी होते) त्यास उपचार.....१३१—१३२
जिव्हारोग (जिभेखालीं फोड येतात) त्यास उपाय.१३२—१३३
दाढबंदरस.... ....१३३
दाढारोग ....१३३—१३४
कर्णरोग (घोडा कानानें बहिरा होतो) कर्णमूळ, ज-
खम वगैरे होते त्यावर उपाय ....१३४—१३६

नासारोग.

घोड्याच्या नाकांतील रोगाविषयीं.... ....१३६—१३८
श्लेष्मा (पडसें).... ....१३८
हलका खोकला .... ,,
नाकांत फोड येतात.... ....१३९

कंठरोग.

सोअर थ्रोट (गळा सुजतो) त्यास उपाय.... ....१३९—१४०
खोकला ....१४०—१४१
शिंगरास (दास).... ....१४१—१४२

विषय. पृष्ठ.
लॉरिंगझायटीज (श्वासोच्छ्वासाच्या नळीस सूज येते). १४२
रोआरिंग, व्हीझिंग, ग्रंटिंग आणि ब्रोकन वुईन्ड (घसा वाजतो व श्वासोच्छ्वास जलद चालतो).... १४२—१४३
चोकिंग (गळ्यांत वस्तु आडकली तर होतो) त्यास उपाय .... १४३—१४४
शेंबा (पडसें, बळगंम, आणि कफ,) यावर उपचार. १४४—१४७
शेंब्याविषयीं उपाय.... .... १४७
हुब्बक (हानवटीखालीं गांठी होतात) त्यावर उपाय. १४७—१४९
शिगाडा (सर्दीपासून होतो) त्यावर उपाय.... .... १४९—१५०
मानेवर दर्द होतें, मान ताठतें व फोड येतात त्याजवर उपचार.... .... १५०
गंडमाळा (कलिकस) .... १५०—१५१
ब्रॉंकाइटीज (गळ्याचे नळींत रोग होतो) त्यास उपाय. १५१—१५२
खांद्यावर गंडमाळा होतात त्यास उपाय .... १५२—१५३
खांद्याचें हाड मागें पुढें होतें त्यास उपाय.... .... १५३

छातींतील रोग.

लजला (छातींतील व खांद्यावरील जखम) त्याजवर उपचार .... १५३—१५५
छातीचा दोन प्रकारचा दर्द, त्यावर उपाय... .... १५५
शिनाबंद खांद्यावर होतो त्यास उपाय .... १५५—१५६
घोडा लंगडतो व छातींत दर्द होतें त्यांवर उपाय.... १५६—१५८
घोडा थकला व छातींत दर्द झाल्यास उपाय.... .... १५८—१५९
घोडा लंगडतो व छातींत दर्द होतें त्यावर उपचार.... १५९—१६०
छातीवर फोड येतात त्यांवर किंवा कोणत्याही जागीं फोड झाल्यास उपाय .... १६०—१६२
छातीवर किंवा सर्व शरीरावर फोड येतात त्यास उपाय. १६२—१६३

विषय. पृष्ठं.

शूळाविषयीं.

पारकिडा शूळ १६३
कोलंज (आंतड्यांत वायु बंद होतो) त्यावर उपाय.१६३—१६५
पोटशूळास औषध.... ....१६५
चित्रकशूळ.... .... ,,
मायावर्तशूळ १६६
अंजन शूळ.... .... ,,
वर्तशूळ .... ,,
पाणी शूळ.... .... ,,
नासावर्तशूळ.... ....१६७
मूत्रावर्तशूळ.... .... ,,
क्षुधावर्तशूळ.... ....१६७—१६८
वादोदरीशूळ.... ....१६८
रक्तप्रमेहशूळ.... .... ,,
कृमिशूळ .... ,,
स्नेहावर्तशूळ.... ....१६८—१६९
बिंबावर्तशूळ.... ....१६९
बिभ्रमशूळ.... .... ,,
कासावर्तशूळ ....१६९—१७०
कुशावर्तशूळ (शुक्रावर्त).... ....१७०
गळग्रहीशूळ.... .... ,,
वायुशूळ .... ,,
रुक्षावर्तशूळ १७१
रसावर्तशूळ.... ....१७१
खडशूळ .... ,,
अजीर्णशूळ.... ....१७१—१७२

विषय. पृष्ठ.

सर्व प्रकारचे शूळांस औषध... ....१७२

इतर रोग.

निदाकणीरोग (घोडा कांहीं खात नाहीं, झोंप येत नाहीं, तहान लागत नाहीं) त्यास उपाय.... ,,

बायाळ घोड्यास उपचार १७३

घोडा फार चरत नाहीं, त्यास उपाय. १७४

मंदाग्निशोष... .... ,,

घोडें शिंगरूं असतां अंगाचें मांस हालत नाहींसें होतें. अगदीं आवळून जातें त्यास उपचार. ....१७४—१७५

डायफ्रम (तयार असलेल्या घोड्यास फार काम केल्यानें हा रोग होतो) त्यास उपचार. १७५

हेपिटायटिज २ प्रकारचे (१ ला आक्यूट २ रा क्रानिक).... ....१७५—१७६

वायुं विषयीं.

वटकिलंकवायु. १७७

मृगमुखदुःखवायु .... ,,

गोलवायु .... ,,

सन्निपातवायु.... ....१७८

तळवायु .... ,,

अवयवहीनवायु ....१७८—१७९

द्विपद्वायु.... ....१७९

अद्भुतवायु .... ,,

वायस्तंभ १८०

चौरंगवायु.... .... ,,

बोलिदोषवायु.. ....१८०—१८१

कंपवायु १८१

विषय. पृष्ठें.
उत्कर्णवायु.... ....१८१—१८२
गिरपथा (घोड्याच्या शिरा आंखडतात) त्यास उ-
पाय.... ....१८२—१८३
एकांगवायु.... ....१८३
त्रिकस्तंभवायु.. ....१८३—१८४
मनस्तंभवायु.... ....१८४
तळवायु .... ,,
बेल (घोड्याच्या सर्व शिरा आंखडतात) त्यावर
उपचार. १८५
ग्ल्यांडर्स (शेंबा) .... १८५—१८६
कच्चें धान्य खाल्यानें किंवा मठ खाल्यानें अजीर्ण होतें
व आंतड्यांत बेमारी होते.... .... १८७—१८९
दम्याविषयीं.. ....१९०—१९३
घोड्यास उचकी लागते त्यास.... ....१९३—१९४
गुदावर फोड होतात त्यावर.... ....१९४—१९५
घोड्याचें गुद बाहेर येतें त्यावर १९५
लेंडी बाहेर पडते वेळेस गुद बाहेर पडतें त्यास....१९५—१९६
लेंड्या कठीण होतात व पडल्या बरोबर रक्त बाहेर पडतें
त्यास.... ....१९६
असहाल किंवा नलसुरी (पोटांतून मैल निघतो).... ,,
घोड्याची लीद पाण्याप्रमाणें होते त्यास .... ,,
अन्न जिरत नाहीं त्यामुळें लीद पाण्याप्रमाणें होते१९७
डिसेंटरी १९८
अगरू (अंग बाहेर येतें व फोड येतात) ....१९८—१९९
क्रिमींवर व जंतावर.... ....१९९—२००
पोटांत गोमाशा होतात त्यावर २००

विषय. पृष्ठ.
पारकिडा होतो त्यावर इलाज २००
पांढरे क्रिमी होतात त्यावर.... ....२००—२०१
पांढरे व काळे क्रिमी होतात त्यावर.. ....२०१—२०२
पाऱ्यासाईट (किडा) २०२
पाटीवरचे हाडाचे आसपास फोड होतात त्यावर २०३
पोटांतील आंतडीं तुटतात त्यावर .... ,,

पोटदुखी.

पोट फुगतें,.... ....२०३—२०७
वायुकुळनाचे ६ प्रकार.... ....२०७—२०८
घोड्याचे पोटांत बेडकी गेली तर व शूळ होऊन लघवी बंद होते वगैरे यास ....२०८—२१०
नाभिरोग.... ....२१०—२११
बेंबी व पोटाखालील रोग.... ....२११—२१६
बेंबींत फोड होतात.... ....२१६—२१७
मूत्ररोग. ....२१७—२२२
घोडा खळत नसून थेंब पडण्यास उपाय २२२
घोड्याचे लघवीविषयीं ....२२२—२२४
घोड्याचें बहुमूत्र बंद होण्याविषयीं २२४
घोड्याचें मूत्र खुलें होण्यास.. .... ,,
निफ्रायटीज (हा रोग शिस्नांत गरम सूज आल्यानें होतो) त्यावर उपाय २२५
क्रानिक (तिडिक होते व कंबर कडक राहते) ....२२५—२२६
ब्ल्याडर(हा रोग शिस्न फाटल्यानें किंवा फुगल्यानें होतो) त्यावर उपाय २२६
अलब्यूमन (खर).... ....२२६—२२७
हेमोटोरिया (हा रोग मूत्रद्वारें रक्त आल्यानें होतो).२२७

विषय. पृष्ठं.

क्याल्क्यूलाय (मूतखडा शिस्नांत एकादी वस्तु आ-
 डकल्यानें होतो) त्यास उपाय ....२२७—२२८
वृषणरोग (अंडाची सूज).... ....२२८—२३०
अंडावर बेमारी होते त्यास.... ....२३०—२३१
अंडावर मोठे फोड होतात त्यावर उपाय २३१
पोटाखालीं व अंडावर फोड होतात त्यास उपाय .... ,,
पिसाब व लीद बंद होते व पोटांत दुखतें त्यास उपाय२३१—२३२
एक अंड चढतो व एक खालीं होतो, वर चढलेला
 उतरत नाहीं त्यास उपाय.... ....२३३
गरमीमुळें घोड्यास लाल फोड होतात त्यास उपाय.. ,,

त्वग्रोग.

खरूज, सफरा, पित्ती, गजकर्ण यांवर उपाय ....२३३—२३९
अकला (खवाल्यावर दर्द होते) त्याजवर उपचार....२४०—२४१
बरसातींत रोग होतो त्यास.... ... .२४१—२४३
बरसात रोग... ....२४३—२४६
घोड्यास गर होतात त्याजवर उपचार ....२४६—२४८
मराफिट (अन्न जिरणारे कोठ्यांत कांहीं हरकत झा-
 ल्यानें होतो) ....२४८—२४९
म्यालेंडर (गुडघ्याचे सांध्याचे पाठीवर पुळ्या होऊन
 फुटतात) त्यावर उपाय २४९
स्यांडर (मांडीचे सांध्यासमोर हा रोग होतो) त्या-
 वर उपाय.... ....२४९—२५०
बोसावाद (सर्व अंगावर गांठी होतात त्यास उपाय). २५०
श्रीमरोग ....२५०—२५२
गजचर्म (घोडा वारंवार अंग घांसतो व चट्टे पडतात).२५२
रिंगवर्म (चट्टे पडतात व किडे होतात) ... .२५२—२५३

विषय. पृष्ठं.

लिख (उवा) २५३
घोड्याचे पहिले केंस उपटून दुसरे आणण्याचा प्रकार. ,,
कपाळावरचे, मानेवरचे व डोळ्यांभोंवतालचे केंस झड-
तात त्यावर उपाय.... ....२५३—२५४
अंगावरचे केंस निघून जातात, ते येण्यास उपाय....२५४
पादरोग व मसरोग.... ....२५५—२५६
रसुलीवर उपाय, बैदा, गिर्दपाषाण, चक्रवळ, मौळू,
तांदुरा धतुरा, गाठूर किंवा टांचरू वगैरे ...२५७—२६०
अवढाण ....२६०—२६१
बेरहड्डीविषयीं ....२६१—२६४
नेवर पाय किंवा हस्ते काम (हाडावरचें मांस वाढतें
घोडा मुरगळतो,) सुंबाजवळ फोड येतात, च-
क्रावळ, सुंबाचे आंत पुतळीचेवर छिद्र पडतें,
सुंभाच्या रोगाचे९प्रकार,पाय मुरगळणें वगैरे.२६४—२७५
पायाचे रोग (नालाविषयीं, व नारू वगैरे) ....२७५—२७७
घोड्याचे पाठीवर पुष्कळ पैसा घालून दुसरे गांवीं पा-
ठविल्यानें मांदगी येते, त्यावर उपचार २७७
दुसऱ्या ओझ्यापासून झालेली मांदगी ....२७७—२७८
घोड्यास वेळचे वेळेस पाणी न मिळाल्यामुळें दर्द
होतो त्यास उपाय.... ....२७८
खोपड करणें.... ....२७८—२८०
घोड्यास फार मीठ खाण्यास दिल्यानें दर्द होतो त्या-
स उपाय ....२८०—२८१
मागील पायांत दर्द होतात त्यास पसतक ह्मणतात
त्याजवर उपाय ....२८१—२८३
उरुद्रोणी रोग (दोन्ही पायांमध्यें सूज येते) त्यावर

विषय. पृष्ठें.

उपाय (कोसाई, चाकळ, जानीवे होतात)....२८३—२८४

सन्निपातद्वंद्व ....२८४—२८५

हुडी.... ....२८५

रसाचा प्रकार .... ,,

हाडपंकरस.... ....२८५—२८६

तळवे गांठीरस २८६

तळस्तंभरस.... ....२८६—२८७

रतिभगरस.... ....२८७

मधुपंकरस .... ,,

पाणीपंकरस.... ....२८८

गुडवी .... ,,

गुडघ्यावर चार प्रकारचे दर्द.... ....२८८—२९०

बेलरोगावर.... ....२९०—२९४

अनसबावा.... ....२९५—२९६

बादीवर इलाज ....२९७—२९८

मरजसत्ताका.... ....२९९

पृष्ठीरोग.

पाठीवरचे दर्दावर (त्याचे तीन प्रकार). ३००

कुक्षिरोग.

कुशींत दोन प्रकारच्या बेमारीवर उपाय. ३०१

हाड मोडलें तर उपाय .... ,,

शेपटीस बेमारी होते त्यावर उपाय.... ....३०२

घोड्याची साधी बिमारी, त्यावर उपाय ....३०२—३०३

खाण्याची व पाणी पिण्याची बेमारी होते.... ....३०३—३०४

केंस आणणें.

औषधाचे इलाजानें अंगावरचे केंस जातात ते येण्यास

विषय. पृष्ठ.

औषध ३०४

मुत्रारोग.

मुत्रारोग (सरमुत्रा, मांसमुत्रा, हाडमुत्रा.).... ....३०९—३१०

दुसरे प्रकारचा मुत्रा पाण्यापासून मागील पायास होतो तो.... ....३१०—३१३

तिसरे प्रकारचा मुत्रा.... ....३१३—३१५

चौथा, बाजार हड्डी.... ....३१५—३१६

पांचवा प्रकार, मुसळी.... ....३१६—३१८

सहावा प्रकार, दुलंदपाय खुलदपाय.... ....३१८

सातवा प्रकार, सांधेजोड.... .... ,,

आठवा प्रकार, अकला.... ....३१९

नववा प्रकार .... ,,

ज्वर.

सिंप्टोम्याटिक ताप वगैरे.... ....३१९—३२०

पायाचे दर्दावरून तापज्वरांविषयीं.... ....३२०—३२१

संतापज्वर.... ....३२१

मन्मथज्वर.... ....३२१—३२२

अढळज्वर.... ....३२२

द्वंद्वज्वर. ....३२२—३२३

श्लेष्मज्वर, क्षीणज्वर (मुकाज्वर).... ....३२३

वातज्वर लंघनज्वर.... ....३२४

घोड्यास साधारण ताप येतो त्यास उपचार.. ....३२४—३२६

जखम.

घोड्याचे खांद्यावर जखम होते त्यास ३२६

घोड्यास नाळ पडली तर त्यावर उपाय ....३२६—३२८

घोडा विस्तवानें भाजला तर अंगावर फोड उठतात व

विषय. पृष्ठें.

अंगावरील कातडें जळतें त्यावर उपचार....३२८

घोड्यास दुसऱ्या जनवरांनीं केलेल्या जखमेवर उपाय.३२८—३२९

जखमेंत किडे झाले तर उपाय.. ....३२९

शारीररोग.

देवाकबदिया, एरकान, ताप, हैजा, शिळ, खिनाने

खुष्क, व खिनानतिर यांजवर औषध.... ....३३०—३३४

घोडा चावत असल्यास इलाज., ...३३४

घोडा खच्ची करणें.... ....३३४—३३७

घोड्यास साप व पिसाळलें कुत्रें चावलें व गांधिण माशी

चावल्यावर उपाय.... ....३३७—३३८

जखमेवर औषध...... ....३३८—३३९

घोडीचे पोटांत शिंगरू ठरत नसल्यास उपाय .....३४०—३४२

घोडीचे योनीस.. ....३४२—३४३

स्तनरोग. ३४३

घोडीचा मूत बंद झाल्यास..... ....३४४

घोड्याबरोबर घोडीनें चालण्यांत तिरस्कार न करणें.. ,,

गर्भ धरण्याविषयीं ३४५

खुब्यांतील लचक.... ....३४५—३४६

जलोदर रोगावर. ३४६

लंग्स—फुफुसांतील रोगावर.... ....३४७—३४९

घोडा आजारी झाल्यावर कशी तजवीज ठेवावी ....३४९—३५०

कोणतीं इंग्रजी औषधें कोणते रोगावर द्यावीं.. ....३५०—३५६

नाडीपरीक्षा... ....३५७

आंत बाहेर इंग्रजी औषधें लावण्याचा कसा उपयोग करावा. ३५८—३६५

घोड्यास स्वारीकरितां लागणारें सामान. ३६६

भाग पहिला.

अश्व वर्णन.

घोड्यास अश्व नांव पडण्याचें कारण असें आहे कीं, अश्वपात नांवाच्या ऋषीनें यज्ञ केला. त्या यज्ञाचा धूर त्या ऋषीचे डोळ्यांत जाऊन डोळ्यांतून पाणी आलें. तें पाणी जमिनीवर पडतांच त्यापासून अश्व उत्पन्न झाले. उजवे डोळ्यांतील पाण्यापासून जे उत्पन्न झाले ते नर जातीचे अश्व, आणि डावे डोळ्यांतील पाण्यापासून उत्पन्न झाली ती स्त्री जात. ह्याप्रमाणें अश्रूपासून उत्पन्न झाले ह्मणून त्यास अश्व ह्मणतात.

ह्या घोड्यांस पूर्वीं पंख होते तेव्हां ते आकाशांत यथेच्छ गंधर्वापेक्षां त्वरेनें गमन करीत असत. ते मोठे बलाढ्य आणि वेगवान् असे असल्यामुळें हे आपणास वहानास योग्य आहेत असें समजून इंद्र त्याजवळ असलेल्या शालिहोत्र नामक ऋषीस ह्मणाला कीं, हे ऋषिवर्या, आपणास कोणतीही गोष्ट करण्यास असाध्य नाहीं याकरितां हे अश्व ज्या योगानें वाहनास योग्य होतील असें करावें, ह्मणजे मी युद्ध करते वेळेस माझा रथ रणांत हे वाहतील आणि दैत्य समुहांत हे उत्तम वाहन होतील. हें इंद्राचें वाक्य ऐकून शालिहोत्र ऋषीनें दर्भास्त्र सोडून अश्वांचे पंख छेदून टाकिले. पंख छेदल्यानंतर ते अश्व रक्तानें भरलेले आणि दीन असे त्या ऋषीकडे येऊन त्यास ह्मणाले, आमचा कांहीं अपराध नसतां आमचे पंख आपण कां छेदिले, आपण जाणते आहांत आणि ज्ञाते (जाणते) कोणतेही जिवास उपद्रव करीत नाहींत. असो, आतां आपण आमचे पंख छेदिले तर आह्मा पक्षहीनांस जेणेंकरून सुख होईल असें करावें. तेव्हां शालिहोत्र

ऋषीस दया येऊन त्या दुःखित अश्वांस ह्मणाले, मी हें कृत्य इंद्राच्या आज्ञेनें केलें. आतां तुमच्या देहास सुख होईल आणि त्रैलोक्यांत जेणेंकरून तुमचा गौरव राहील असें मी करतों. तुह्मी आजपासून इंद्रादिदेवांचें आणि पृथ्वीवरील राजांचें वाहन व्हाल आणि त्या योगानें तुमची कीर्ति होईल. जो राजा तुह्मांस चांगल्या रीतीनें पाळून आपल्या जवळ ठेवील त्याच्या अंगीं दुसरे कोणतेही गुण नसले, आणि त्याला शत्रु पुष्कळ असले तरी त्याचा पराभव कोणाच्यानें होणार नाहीं. तसेंच तुमच्या संतोषाकरितां, रोगनाश होण्याकरितां मनुष्य चिकित्सेप्रमाणें मी अश्वचिकित्सा करितां. तर तुह्मी कांहीं भूलोकास आणि कांहीं पाताळास जा ह्मणजे तुह्मास स्वस्थता होईल. याप्रमाणें शालिहोत्र ऋषीनें घोड्यांस आज्ञा देऊन आपण अश्वचिकित्सा नामक बारा हजार संहितात्मक ग्रंथ केला. तेव्हांपासून अश्व हे या लोकांत वाहन झाले. नंतर शालिहोत्रकृत अश्वचिकित्सा शास्त्र जगांत प्रसिद्ध झालें. याप्रमाणें अश्व वाहन होण्याचें कारण आहे, ही कथा नकुलकृत शालिहोत्रांत आहे.

याचप्रमाणें भूपवल्लभ ग्रंथांत अश्वोत्पत्तीविषयीं असें लिहिलें आहे कीं, श्वेतवर्ण अश्व ब्रह्मदेवाच्या अश्रूपासून उत्पन्न झाले आहेत. ते श्रेष्ठ अश्व होत. त्यांस ब्राह्मणाश्व ह्मणतात. क्षत्रियाश्व हे सूर्याच्या नासिकेंतून उत्पन्न झाले. ते रक्तवर्ण असून युद्धाचे कामांत मोठे उपयोगाचे असतात. सूर्याच्या विर्यापासून क्षत्रियाश्व श्रेष्ट असा रैवत नामक उत्पन्न झाला. तसेंच वडवा (घोडी) इचे ठिकाणीं सूर्यापासून अश्विनोदेव क्षत्रिय उत्पन्न झाले त्यापासून चित्रविचित्र बळवान असे अश्व उत्पन्न झाले. वैश्यअश्व अग्नीच्या ज्वाळापासून उत्पन्न झाले. ते श्याम मिश्रित तांबड्या रंगाचे असतात. काळे अश्व ते शूद्र अश्व. ते गंधर्वापासून उत्पन्न झाले. ते युद्धांत धैर्यवान् त्याचे मात्र रक्षक होत. कृष्णमिश्रित निळ्या रंगाचे घोडे

गालव ऋषीच्या श्वासापासून उत्पन्न झाले. ते ब्राह्मण जातीचे असतात. त्यांना वेग फार असतो. शुभ्रमिश्रित निळ्या रंगाचे अश्व चंद्रापासून उत्पन्न झाले. हिरवे निळे घोडे विष्णूपासून उत्पन्न झाले. रक्तवर्ण अश्व सूर्यापासून उत्पन्न झाले.

अथाश्व प्रशंसा विरमित्रोदये.

ज्या राजाचे राष्ट्रांत सर्व लक्षण संपन्न अश्व आहेत त्याच्या राष्ट्रांत लक्ष्मी, धर्म, काम, आणि अर्थ संपत्ति ह्या स्थिर रहातात. यावरून सुलक्षणयुक्त अश्वावरच आरोहण करावें असें सांगितलें आहे.

अथ विष्णुधर्मोतरे.

राजांना जय प्राप्त होणें हें अश्वांचे स्वाधीन आहे याकरितां राजानें सर्व प्रयत्नें करून अश्व संपादन करावे आणि पालनाविषयीं विशेष प्रयत्न करीत असावे.

राजानें जितक्याचें पोषण आपल्यास सुखानें करितां येईल तितकेच अश्व बाळगावेत. क्षुधित होऊन दुःख पावणारे व ज्याचें पोषण करण्यास आपल्यास दुःख होईल इतके अश्व ठेवूं नयेत.

अश्व जाति परीक्षा.

अश्वाचें स्वरूप यथार्थ जाणणारा व त्याविषयीं तत्पर, व जितेंद्रिय असा महाप्राज्ञ जो शालिहोत्र मुनि, त्यास कोणी एक जिज्ञासु मित्राप्रमाणें प्रश्न करीत आहे. हे महाराज शालिहोत्र, घोड्याचे चारी वर्ण कोणकोणच्या चिन्हांवरून समजावे? हें मला आपण सांगण्यास योग्य आहां. असें विचारल्यावर महाचार्य जो शालिहोत्र मुनि तो ह्मणाला, अश्वाचे चारी वर्णांचें ज्ञान होणें कठीण आहे. परंतु लक्षणांवरून मी तुला सांगतों हें श्रवण कर. अश्वांतील चार वर्णांचे विभागावरूनच जे अनुलोमज (उत्तम वर्णापासून नीच वर्णाचे ठिका-

णीं जन्मलेले) आणि प्रतिलोमज (नीच वर्णा पासून उत्तम वर्णाचे ठायीं जन्मलेले) हेंही मी विशेषें करून सांगतों, तें श्रवण करून लक्षांत ठेव. जाति चार प्रकारच्या; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र अशा चार जाती आहेत.

ब्राम्हणाश्व परीक्षा.

ब्राह्मण अश्वांची परीक्षा रूपवान्, तेजस्वी, नम्रता धारण करणारे, ज्यांना पुष्कळ उपचार करावे लागतात, आणि ज्यांची बुद्धी चांगली असून जे मागली स्मृति बाळगतात ते अश्व ब्राह्मण जातीचे जाणावे. गुरू व राजा यांची आज्ञा मान्य करण्याविषयीं यत्न करणारे, प्रदक्षिणा ह्मणजे मंडळावर फिरण्याविषयीं जे शक्तिमान व अतिशय शब्द न करणारे, आणि शुचि ह्मणजे शुद्ध पदार्थ सेवन करणारे ते ब्राह्मण अश्व होत. क्षुधा सहन करणारे, भार सोसण्यास समर्थ, सुंदर शरीराचे, प्रसन्न मनानें असणारे, गंध, पुष्पें, ज्यांस प्रिय असून जे उत्तम वेश धारण करून संतोषी असतात, ज्यांचा सत्कार केला असतां आनंदी होऊन अनुकूलत्वानें गमन करतात, जे देखणे असून नेहमीं हर्षित असतात, स्वछंदानें चालणारे, तेजस्वी, सर्व कर्मांस अनुसरणारे, जे पाणी, चंदी आणि वस्त्र (जीन) हीं दुसऱ्याचीं उच्छिष्ट असल्यास टाकितात, तसेंच अशुद्ध (मूत्र, विष्टा वगैरे) पदार्थांचा जे तिरस्कार करतात, मधु (द्राक्षासव), लाह्या, तूप, अपूप (अनारसे किंवा घारगे) आणि पायस इत्यादि पदार्थांची इच्छा करणारे अश्व ब्राह्मण जातीचे होत. गंध व फुलें यांनीं संतुष्ट होणारे, तसेंच स्नान, नीरांजनादि मंगळ, हीं ज्यांस प्रिय, जे न्हेषणा (अश्व जातीचा शब्द) करीत असतां हुंगतात, जे दिसण्यांत सुंदर असून ज्यांची निद्रा सुख साध्य आहे ह्मणजे जमिनीवर न पडतां जे निद्रा घेतात,

क्षुधा व तृषा यांविषयीं जे महाशूर, (सोसणारे) ज्यांची गर्जना मोठी असून उग्र आहे, ज्यांच्या त्वचेचा रंग पिवळा, पांडुर, तांबडा, गोरा व मधासारखा पिंगट आहे, पुष्कळ चालण्याविषयीं ज्यांना हौस असते, ज्यांचा शब्द श्राव्य आहे, जे स्थिर, ओलसर भासणाऱ्या तेजस्वी रंगाचे व शरीरास रक्षण करणारे ते सर्व अश्व श्रेष्ठ असे ब्राह्मण जातीचे होत. निजले असतां जे लौकर जागे होतात व सोडले कीं झोंपीं जातात, ज्यांचा गंध, लाह्या, ऊस आणि वाळा यांप्रमाणें आहे, देव व गंधर्व यांप्रमाणें ज्यांचें सत्व (धैर्य) आहे आणि त्याप्रमाणेंच ज्यांचा आचार आहे, ते ब्राह्मण होत. या प्रकारच्या लक्षणांवरून व आचारावरून ब्राह्मण जातीचे अश्वांची परीक्षा करावी.

तथाच कल्याण कृतसार समुच्चये.

ज्याचा स्वभाव चांगला आहे, व जो भार सोसणारा सुगंधि असून शुद्ध एक्या रंगाचा, सुंदर दिसणारा, गंभीर शब्दानें हिंसणारा, स्वच्छ, धैर्यवान आणि ग्रास ह्मणजे चंदीविषयीं मोठा उत्सुक असा अश्व ब्राह्मण जातीचा होय.

अथ क्षत्रियाश्व परीक्षा.

शालिहोत्रे.

दुःखाविषयीं ज्यांचा स्वभाव आहे ह्मणजे अडचणींत जाण्यास जे निर्भय, रागीट, अति तेजस्वी, तिखट स्वभावाचे, शूर, आणि ज्यांचा शब्द अतिशय गंभीर आहे, ते अश्व क्षत्रिय जातीचे होत. ज्यांचें प्रमाण (उंची) अधिक आहे, ज्यांचें धैर्य मोठें, जे बळकट असून चपळ, ज्यांच्या शरीरांत दृढता आहे, ज्यांचे अवयव विविक्त (वेगळे किंवा स्पष्ट) असून त्वचा सूक्ष्म आहे, पर्जन्यकाळांत पाण्याच्या शब्दानें भीत नाहींत, मारिलें असतां, किंवा गर्दीमध्यें कठीण

पदार्थांचा स्पर्श झाला असतां व झाडांच्या अडचणींत जे निर्भय असतात, कोणी आडविलें असतां, व उंच सखल जमिनींत चालतांना जे खिन्न, श्रमी होत नाहींत, ज्यांचा वेग उत्तम आहे, व ज्यांचें दर्शन प्रिय आहे, रथांच्या घडघडाटांत व शंखताल यांचा शब्द होत असतां, हत्तींच्या गर्जनांत, घंटानाद होत असतां, छत्र, ध्वज, पताका यांच्या योगानें मोठ्या सैन्यांत गर्विष्ठ होतात, जे पुच्छ अतिशय हलवितात, हर्षयुक्त होऊन प्रफुल्ल ज्यांचे नेत्र आहेत, सोडल्याबरोबर पृथ्वीवर धांवतात, व खुरांनीं जमीन विदारण करीत जे हिंसतात, ज्यांना घाम फार येतो, मूत्र व लीद फार सोडीत असतात, पुढें घोडे पाहिले असतां त्यांना भय दाखवतात, व आपण हर्षानें क्रीडा करतात, चतुरंग सैन्यांत जे आनंदानें प्रवेश करितात, त्यावेळीं अनेक गर्जना करितात, व रणांत रममाण होतात, दुसऱ्या घोड्यांच्या पाठीमागें चालण्यास जे इच्छित नाहींत, शस्त्र पाहून ज्यांस आनंद होतो, प्रहारे करून जे व्यथा पावत नाहींत, संग्रामांत जे पराक्रम करतात, ज्यांच्या अंगांत चपळपणा आहे, मणि, रत्नें, मल्लिका यांप्रमाणें ज्यांची कांति स्वच्छ आहे, ज्यांचे नेत्र पिंगट वर्ण आहेत, जे विवर्ण ह्मणजे निस्तेज किंवा अनेक रंगाचे नसतात, सर्व कर्मांत जे समर्थ, ज्यांचा शब्द उत्तम असून जे प्रमादि (बेसावध) कधीं नसतात, देव, गंधर्व यांप्रमाणें ज्यांचें धैर्य असतें, जे उत्तम कुळांत जन्मले असून हिंसणें चांगलें आहे; या प्रकारें ज्यांचें आचरण असतें ते अश्व क्षत्रिय जातीचे जाणावे.

तथाच सार समुच्चये.

शूर, तिखट स्वभावाचा, अभिमानी, रागीट, वाऱ्यासारखा वेगवान, उत्तम गर्जना करणारा, दीर्घकाळ ज्याचें आयुष्य आहे, चालण्यांत ज्याची फार जलदी असते, आणि जो अति धैर्यवान असतो तो अश्व क्षत्रिय जातीचा होय. इति क्षत्रियाश्व परीक्षा.

अथ वैश्याश्वपरीक्षा.

बुद्धि उत्तम असून शिक्षादिक्रियेविषयीं जे मंद अल्प जातीचे, जे कधीं रागावत नाहींत व हर्षही पावत नाहींत, जे स्थिर मनाचे आणि जितेंद्रिय (अन्य अश्विनीशीं गमन न करणारे) ज्यांनीं क्रोध जिंकिला आहे, असे व निराभिमानी, मृदु व सम स्वभावाचे, प्रहारादिकामुळें वेदना होत असल्यास क्षुधार्त होणारे, भार घेऊन स्थिर चालणारे, मध्यम वेग धारण करणारे, बळ व धैर्य हीं ज्यांचे मध्यमच असे आणि हिरवे किंवा पिंवळ्या नेत्राचे, ज्यांचे नेत्र क्रोधयुक्त व काळे असतात, ज्यांचे अधरोष्ट (खालचे ओठ) केशयुक्त व तांबडे असतात, जे कोठें व्यंग नसलें तरी मोठे वीर्यवान नसतात, ज्यांचा वास मत्स्याप्रमाणें किंवा उंटिणीच्या दुधाप्रमाणें असतो, जे खुषींत असले ह्मणजे लागलीच झोंपी जातात आणि क्षमाशील असून मनुष्य जातीप्रमाणें धैर्यवान असतात, अशा प्रकारें ज्यांचा आचार असतो, ते अश्व वैश्य जातीचे होत.

तथाच सार समुच्चये.

ज्याला मद्य प्रिय आहे असा व जो निराभिमानी, दूरदृष्टि आणि लहान शरीराचा अश्व वैश्य जातीचा होय. इतिवैश्याश्व परीक्षा.

अथ शुद्राश्व परीक्षा.

ज्यांस अन्न व पाणी एकमेकांचें उच्छिष्ट आवडतें, व एका पात्रांत जे उभयतां हर्षानें खाणें व पिणें करतात, ज्यांचे नेत्र आरक्त आहेत, जे पायांनीं जमीन उखळतात, लीद व मूत्र यांस जे हुंगतात आणि निंद्य पदार्थ भक्षण करतात, मत्सरानें वागतात, आपलें पालन करणारास मारतात, आणि खुरानें, शेंपटीनें व दातांनीं, आपल्या अंगास खाजवून घेतात, दर्भ व काश (एक प्रकारचें तृण) यांचे यो-

गानें संतोष पावणारे, मित्रे व शिक्षेचा खेद मानणारे, ज्यांचा आचार चांगला शुद्ध नसतो ह्मणून शुचिपणा ज्यांस आवडत नाहीं, चवाट्याचे ठिकाणीं व द्वाराचे ठायीं जे मळ त्याग करतात, धूर व अभ्र यांप्रमाणें ज्यांचा मळकट रंग आहे, ज्यांचीं मुखें मोटीं असून पांढरीं असतात, रुक्ष, भिन्न स्वराचे, आकळण्यास कठीण आणि पिशाच राक्षस याप्रमाणें नेहमीं झोंपेंत गैर सावध असतात, अशा प्रकारचा ज्यांचा आचार ते शूद्र जातीचे अश्व होत. इति शु०

तथा सार समुच्चये.

क्रोधी व फार अभिमानी असून अति वेगवान असा अश्व शूद्र जातीचा होय. इतिशुद्राश्व परीक्षा.

विलोमजादिकांची परीक्षा सांगतों.

ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र अश्व यांपासून क्रमानें ब्राह्मणादि जातीच्या अश्विनीचेठायीं उत्पन्न झालेले अश्व ब्राह्मणादि नामक होत ह्मणजे ब्राह्मणाश्वापासून ब्राह्मण जातीचे अश्विनीचे ठिकाणीं झालेला ब्राह्मण, क्षत्रियाश्वापासून क्षत्रियाश्विनीचे ठिकाणीं झालेला क्षत्रिय, याप्रमाणें जाणावें.

अथ अनुलोमजादिकांविषयीं तच्चोक्तं शालिहोत्रे.

शालिहोत्र मुनी म्हणतात अनुलोमज जातीचें ज्ञान व आचार मजपासून ऐक. ब्राह्मणाश्वापासून क्षत्रियाश्विनीचे ठायीं झालेला अश्व क्षत्रिय होय. क्षत्रियाश्वापासून वैश्य जातीच्या अश्विनीच्या ठिकाणीं झालेला वैश्य होय. येथें सर्व मातुश्रीच्या जातीचे होतात असें सांगितलें असून वैश्यापासून शुद्रिणीचे ठिकाणीं झालेला वैश्य

वास्तविक शूद्र होतो असें पाहिजे. तथापि शूद्रापेक्षां अधिकत्व दाखवण्याकरितां तसें सांगितलें आहे. हे अश्व ज्या रंगाचे असतील त्या वर्णाप्रमाणें त्यांचा आचार असेल तर ते त्या वर्णाचे समजावे. जर आचारापासून भ्रष्ट असतील तर ते शूद्र जाणावे. ब्राह्मणाश्वापासून वैश्य अश्विनीचेठायीं झालेला वैश्य होय. क्षत्रियाश्वापासून शूद्रिणीचेठायीं झालेला क्षत्रियतुल्य होय. अथवा ब्राह्मण, क्षत्रिय आणि वैश्य या अश्वांपासून शूद्र अश्विनीचे ठिकाणीं झालेला अश्व, निषाद (शूद्रापेक्षां नीच) होतो.

अथ भूपालवल्लभे विशेषः

ब्राह्मणाश्वापासून शूद्र अश्विनीचेठायीं झालेला अश्व संग्रामांत हर्ष देतो, किंवा शत्रूचे बाण लागतांच स्वामीला टाकून रणांत शयन करतो, याप्रमाणें दोघांचे गुण त्यांत असतात. पांचपासून दहा अंगुलेंपर्यंत ज्यांचे पाय पांढरे रंगाचे असतात, त्यांस हलायक असें म्हणतात. ब्राह्मणाश्वापासून क्षत्रियाश्विनीचे ठिकाणीं जन्मलेला अश्व संग्रामांत धन्यास कधीं सोडीत नाहीं. क्षत्रियापासून वैश्य अश्विनीचे ठिकाणीं झालेले, शेंवाळें, पोपट, याप्रमाणें ज्यांचा रंग आहे किंवा निळ्या रंगाचे, अथवा जवसाच्या फुलाच्या रंगाचे आणि पांढरे, हे अश्व रणांत जयप्रद होत. शूद्र अश्विनीचेठायीं क्षत्रियापासून झालेले मेघासारख्या रंगाचे, किंवा कोरांटीच्या फुलासारख्या रंगाचे, ज्यांच्या अंगावर तुषाराप्रमाणें चिन्हें आहेत, ज्यांना क्षमा नाहीं व धूळ हें ज्यांचें भूषणच होय, ते अश्व दुष्ट होत. इति अनुलोम जाति.

आतां प्रतिलोम जाति सांगतो शालिहोत्र.

ब्राह्मण जातीच्या अश्वीनिच ठिकाणीं क्षत्रियाश्वापासून झालेला अश्व सूत जातीचा होय. हे अश्व कोरांटीच्या पुष्पाप्रमाणें गौर किंवा दांताप्रमाणें स्वच्छ असतात, अथवा तांबड्या रंगाचे असून बहुधां प्रसन्न ज्यांचे नेत्र असतात, ज्यांचा ध्वनी मोठा असतो, मद्य किंवा

पुष्प याप्रमाणें ज्यांस गंध आहे; निर्हार झोपेंत सावध होणारे व शांत असे अश्व ते बधीर जाणावे. ब्राह्मण जातीचे अश्विनीचे ठिकाणीं वैश्य अश्वापासून झालेला मागध होय. या जातींतले अश्व भार सोसणारे, पण बळहीन, शब्दतावर्जित, (न हिंसणारे,) चंचळ स्वभावाचे, व कोणाच्या रक्षणांत न राहणारे, बुद्धिमान असून अशिक्षित, आणि वेगवान असून आनंद रहित असतात. ब्राह्मण अश्विनीचे ठिकाणीं शूद्राश्वापासून उत्पन्न झालेला अश्व चांडाळ होय. या जातीचे अश्व शिक्षादि कर्मांस जाणत नाहींत. नेहमीं बेसावध असतात. त्यांचा शब्द फार तीक्ष्ण असतो, नखें रुक्ष व कुटीर असतात, त्यांचा स्वभाव क्रूर असतो. आणि जे अशक्त असतांही दुसऱ्यास आकळत नाहींत; कांहीं खुणा भोवरे इत्यादि लक्षणें ज्यांचीं दग्ध व अप्रशस्त आहेत, निंद्य असें शरीर बिंदु व तिलक यांनीं शोभायमान, जे मल मूत्र खातात, अशुद्ध व शून्य अशा गृहाचे ठिकाणीं रममाण होतात, कोल्हे व लांडगे याप्रमाणें ज्यांचा रंग आहे, किंवा धुराप्रमाणें रंगाचे किंवा अनेक रंगांचे, ज्यांचा शब्द क्रूर आहे, गंध पूवाप्रमाणें, ज्यांना मांस मज्जा हें फार आवडतें, ते अश्व पिशाच, राक्षस यापासून झालेले चांडाळ होत, असें जाणावें. या खुणांवरून व लक्षणांवरून चारी वर्णांचा निर्णय करावा.

तथाच भूपालवल्लभे, विशेषः

ब्राह्मण जातीच्या अश्विनीचे ठिकाणीं वैश्य जातीय अश्वापासून उत्पन्न झालेला लंबायमान आकृतीचा श्यामकर्ण (ज्याचे कान काळे असा) गर्दभाप्रमाणें सर्व रंग असून कपाळाचे ठिकाणीं काळा असा अश्व युद्धकर्मांत नष्ट होय.

क्षत्रिय जातीच्या अश्विनीचे ठिकाणीं वैश्य अश्वापासून उत्पन्न झालेले, चंद्राप्रमाणें शुभ्र कपाळाचे, आणि नक्षत्राकृति चिन्हें ज्यांच्या अंगावर आहेत, असे व चित्र रंगाचे जे अश्व ते राजे लोकांचीं

उत्तम वाहनें होत. शूद्र जातीच्या अश्विनीचे ठिकाणीं वैश्य अश्वापासून उत्पन्न झालेले, आंखूड केसाचें, तोंडल्याच्या रंगाचे किंवा पाणकोंबड्याच्या रंगाचे, तसेच वाघासारख्या रंगाचे जे अश्व ते सैन्यास शोभा आणणारे व बळकट असतात. केशांचीं अग्रें वंश (पाठीचें हाड) आणि पाय हीं ज्यांची काळ्या रंगाचीं असतात असे शूद्राश्वापासून ब्राह्मणाश्विनीचे ठिकाणीं झालेले अश्व कंकोन संज्ञक होत. व ते अंत्यजांचीं वाहनें असें जाणावें. वैश्य अश्विनीचे ठिकाणीं शूद्राश्वापासून उत्पन्न जे अश्व त्यांस दर्दुर किंवा शुक शालिक ह्मणतात, यांस व चंडाल (ब्राह्मणाश्विनीचे ठायीं शूद्राश्वापासून उत्पन्न) जालेले. सूत (ब्राह्मणआश्विणीचे ठायीं क्षत्रियअश्वापासून उत्पन्न) जालेले. आणि मागध (ब्राह्मणाश्विनीचे ठिकाणीं) वैश्यापासून उत्पन्न जालेले यांस संग्राम कर्माचे ठायीं वर्ज्य करावें.

आतां प्रसंगानें खेचरीची परीक्षा सांगतों.

ब्राह्मणअश्वापासून गर्दभीचे ठिकाणीं जन्मलेली श्वेत वर्णाची खेचरी शुभ होय. ती अश्व शालेंत रक्षण करावी, कारण तिचें दर्शन व स्पर्श हे शुभ होत. आतां ब्राह्मणअश्विनीचे ठिकाणीं गर्दभापासून झालेली कृष्ण वर्णाची जी खेचरी ती चांडाळीण होय. तिला स्पर्शही करूं नये. कारण ती दुष्ट व दुःख देणारी आहे. ती भार सोसण्यास मात्र मोठी बळकट असते. क्षत्रियाश्वापासून गर्दभीचे ठिकाणीं झालेली तांबड्या रंगाची खेचरी शुभ होय.

क्षत्रियाश्विनीचे ठिकाणीं गर्दभापासून झालेली तांबडी किंवा काळी खेचरी अतिनिंद्य होय. वैश्या पासून गर्दभीचे ठिकाणीं झालेली पिवळ्या व भुरकट रंगाची खेचरी तशीच वैश्यश्वा जातीय अश्विनीचे ठिकाणीं गर्दभापासून उत्पन्न झालेलीं मळकट रंगाची आणि रोबाकी

[भुरकी.] खेचरी शुभ होय. गर्दभींचे ठिकाणीं शुद्राश्वापा सून झालेली गर्दभासारख्या रंगाची जी खेचरी ती गर्दभीच होय. शुद्राश्विनींचे ठिकाणीं गर्दभापासून झालेली नाकाचे ठिकाणीं शुभ्रवर्ण गर्दभाप्रमाणें जिचें तोंड तीही गर्दभ जातीची जाणावी. इति खे० प०

गर्दभ परीक्षा.

गर्दभापासून निषाद जातीच्या अश्विनींचे ठिकाणीं झालेली गर्दभा प्रमाणें किंवा अश्वाप्रमाणें शब्द करणारी खेचरी गर्दभीच होय. अश्वापासून निषाद जातीय अश्विनींचे ठिकाणीं झालेली, हिंसतांना गर्दभाखारखा शब्द करणारी, धूम्र रंगाची, गर्दभासारख्या मुखाची खेचरी चांडाळी होय. ती अशुभ असल्यामुळें युद्धादिकृत्यांत वर्ज्य करावी. इतकेंच कीं, वर सांगितलेल्या खेचरी अश्वशाळेंत किंवा अश्वशाळेच्या समोर स्थापन कराव्या. त्यांच्या दृष्टिपातानें विघ्नांचा नाश होतो. त्यांत जी श्वेता ह्मणून खेचरी प्रथम सांगितली तिच्या अवलोकनमात्रें करून भूतें, प्रेतें, पिशाच, शाकिनी, डाकिनी ग्रह, यक्ष, चेटकें, वेताळ, कुष्मांड, भैरव, आणि झोटिंग हीं सर्व नष्ट होतात. श्वेता खेचरी युद्धांत किंवा भार वाहण्यांत आणि वहन कर्मांतही सर्व वर्णांस जयप्रद होते. इतर खेचरी केवळ भार वाहक होत आणि अंत्यजादिकांस वाहनभूत होत्सात्या युद्धांत जयप्रद होत परंतु त्या एक जातीच्या असाव्यात, भिन्न जातीच्या वर्ज्य होत. मिश्र वर्णाचे व मिश्र जातींत उत्पन्न झालेले जरी अश्व आहेत, तथापि पान, भक्षण, चेष्टा यावरून त्यांचें अंतःकरण जाणावें.

गुणावरुन अश्वजाति परिक्षा,

गंधावरून अश्वांची परीक्षा.

ज्याचा वास पुष्पाप्रमाणें येतो तो ब्राह्मण जातीचा. कृष्णागरू

प्रमाणें ज्याचा वास तो क्षत्रिय. तुपाप्रमाणें वासाचा अश्व वैश्य आणि माशाप्रमाणें ज्याचा वास तो शूद्र होय.

गुणावरून परीक्षा.

विचारवान व दयाळू ब्राह्मण. बळकट व तेजस्वी क्षत्रिय. दुष्ट अंतःकरणाचा तो वैश्य. आणि जो अगदीं निर्बल इंद्रियाचा तो शूद्र होय.

तदुपयोगः नकुलकृताश्व चिकित्सायी :प्रसंगविशेषीं त्यांचा उपयोग.

निर्भय अशा स्वस्थपणाच्या कृत्यांत ब्राह्मण जातीचे अश्व सिद्धिकारक होत. युद्धादिकर्मांत क्षत्रियाश्व, द्रव्य किंवा सेवक संपादन करण्याचे कामांत वैश्य जातीचे अश्व आणि याशिवाय अन्य कृत्यांचे प्रसंगीं शूद्र जातीचे अश्व सिद्धिकारक होत असें जाणावें.

तथाच भूपाल वल्लभे विशेषः

ब्राह्मण जातीचा अश्व ग्रंथित तृण (न विसकटतां) खातो. क्षत्रिय अश्व चहूंकडे विखरून खातो. वैश्य अश्व बाजूस असलेलें खातो आणि शूद्र अश्व भूमींतून उगवलेलें खातो.

नकुलकृतेऽश्वचिकित्से.

कांहीं अश्व जलापासून झालेले (ज्यांच्यांत जल हें तत्व अधिक आहे) आहेत. कित्येकांत तेजतत्व अधिक आहे, कोणी वायुतत्वानें अधिक आहेत, आणि कितीएकांत भूमितत्व जास्त असतें. जलतत्व प्रधान (अर्थातशांत) ते ब्राह्मण, तेजःप्रधान ते क्षत्रिय, वायुतत्व अधिक असणारे ते वैश्य, आणि ज्यांत पृथ्वीतत्व अधिक ते शूद्र जाणावे. ब्राह्मण जाति आपला मळ (लीद) पाहत नाहीं. क्षत्रिय अश्व लीद पाहतो. वैश्य जातीय मलास हुंगतो. आणि शूद्राश्व तर लीद भक्षण करतो.

पाण्यावरून परीक्षा.

ब्राह्मणाश्व नाकानें पाणी पितो. क्षत्रिय ताडित केलेलें पाणी पितो. आणि वैश्य ओठांनीं पितो व शूद्र पितांना पितो.

जो घोडा सर्व तोंड डोळ्यापर्यंत पाण्यांत बुडवून पाणी पितो तो ब्राह्मण जातीचा.

जो घोडा दोन्ही ओठ पाण्यावर ठेवून नाकपुड्यापर्यंत तोंड पाण्यांत बुडवितो तो क्षत्रिय जातीचा.

जो घोडा पाण्यांत जात नाहीं, पाण्यावर दोन्ही ओट टेवून पाणी पितो तो वैश्य जातीचा.

जो घोडा कोरडे मारल्या वांचून पाण्यांत जात नाहीं लांबूनच पाणी पितो तो शूद्र जातीचा जाणावा.

भयावरून परीक्षा.

ब्राह्मण जाति अश्व थंडीस भीत नाहीं. क्षत्रिय थंडी व उष्ण या दोन्हीस भीत नाहीं. वैश्य थंडी व पाणी यापासून भितो आणि शूद्र तिन्ही (शीत, उष्ण, जल) सोसतो.

वाद्यावरून परीक्षा.

ब्राह्मण वाद्यें वाजवल्यापासून हर्ष पावतो. क्षत्रिय कहोल (एक विशेष वाद्य आहे) ते वाजल्यापासून हर्षित होतो. वैश्य वाद्यानें रागावतो. शूद्र तर रागावून चाकरास खातो. ब्राह्मण संग्रामांत पाठमोरा होतो. क्षत्रिय सन्मुख होतो. वैश्य रणामध्यें मळमूत्र करितो. आणि शूद्र जवळ असणाऱ्यास चावतो. ब्राह्मण अश्व रणांत शस्त्रादिकांनीं दुःखित होतांच धन्यास घेऊन जातो. क्षत्रिय शत्रूस विदारण करतो. वैश्य स्वामीस टाकून निघून जातो. आणि शूद्र तत्काळ रणांत मरण पावतो. ब्राह्मण जातीचा अश्व पांढरा आणि उज्वळ असतो. क्षत्रिय बोराप्रमाणें व तांबडा असतो. वैश्य पिंवळा व श्याम (सावळा) असतो. आणि शूद्र निळा आणि काळा असतो.

तथाच जयदेव कृताश्व चिकित्से.

त्रासक स्वभावाचा व क्षुधातुर होणारा ब्राह्मण होय. शूर व फार रागीट तो क्षत्रिय. पापी व वाईट रुपाचा व दुष्ट तो वैश्य आणि

विरूप व वेडे वाकडे व उग्र ते शूद्र होत. ब्राह्मणाश्वास दाणा चंदी दिली असतां तो चांगल्या प्रकारें स्वामीस वाहतो. क्षत्रियाश्व साम ह्मणजे प्रिय भाषणानें राहतो. वैश्य दंड व शब्द यांनीं वळतो. आणि शूद्रास दंडच पाहिजे. ब्राह्मणाश्वास पाहटे चालवावें. क्षत्रियाश्वास प्रहर दिवस आल्यावर. वैश्यास संध्याकाळीं आणि शूद्रास रात्रीं चालवावें. आतां असा उत्तम लक्षणी अश्व असून पराभव पावतो तो संकीर्ण (मिश्र) जाणावा.

उत्तम गंधाची परीक्षा.

ज्या घोड्याचे आंगाचा स्वाद मद, कमळ, पुष्प, कुंद, उंच मद्य, चंदन, अशोक फूल, जाईचें फूल याप्रमाणें असतो तो उत्तम.

उत्तम सत्वाची परीक्षा.

ज्या घोड्याचा उत्तम वर्ण, व स्वर व गति व सुगंधि, तो कुलिन, नम्र, ज्याचें सत्व देवासारखें. गंधर्व, श्रेष्ठ मुनी तो शुद्धसत्व जाणावा.

सत्वादि गुण अश्वाचे ठिकाणीं कसे ओळखावे याविषयीं.

बुद्धिमान्, मुखभागीं सुंदर आणि प्रशस्त शरीराचे, सुखभोक्ते, दीर्घ दृष्टी, दीर्घायुषी आणि क्षमावान् असे जे अश्व ते सात्विक; अखूड शरीराचा दुःखी; मत्सरी, तीक्ष्ण, अल्पायुषी, रागीट अशा स्वभावाचे ते राजस; आणि तंद्रा (गुंगी) निद्रा फार असणारे, मंदगती, दुर्बुद्धी, आळशी, असे अश्व ते तामस गुणाचे जाणावे.

घोड्यांचे सहज गुण.

उत्तम बुद्धि, शौच (शुद्धता) शौर्य व इतर चेष्टा यांच्या योगानें मोह न पावणारे, औदार्य, समंजसपणा, अंतः करणाचे ठिकाणीं प्रीति, प्रफुल्लितपणा, संताप न करणें, स्वभावानुरूप वर्तन, स्मरण, धैर्य, ऐकण्याची इच्छा; अभिमान, संचार करणें, सर्व कर्मांत मनाचा निश्चय आणि त्यांचा अंगिकार हे अश्वांचे सहज गुण होत.

घोड्यांचे सत्वज (मनाचे) गुण.

तीक्ष्णता, शूरता, शुचित्व, सत्कर्माचे ठिकाणीं निश्चय, विषाद (खेद) न करणें हे घोड्यांचे मनाचे गुण होत.

घोड्याचा आकार, बळ, स्वभाव शक्ति, दम प्रीति ठेवणें व स्मरण हे गुण सर्व देशाचे घोड्यांत एकसारखे रहात नाहींत. देशपरत्वें कमी जास्त असतात. घोड्यामध्यें गुण येण्यास शिकवण्यास मनुष्याचा सहवास असणें हें मुख्य कारण आहे. घोड्यास जाच बिलकूल करूं नये. वाईट वागविल्यानें घोडें बिघडतें. घोड्यावर प्रीति केली असतां तो मनुष्याचे स्वाधीन होतो. घोड्यास इजा किंवा वाईट पणानें वागविलें तर तो त्याचा सूड उगवितो.

घोड्याच्या हिंसण्यावरून परीक्षा.

अश्व, हंस, हत्ती, कुरर, क्रौंचपक्षी, मेघ, नगारा, जलप्रवाह, या सारखा हिंसल्यास उत्तम. ज्यानें हिंसणें पुष्कळ घोड्यांच्या हिंसण्यांत ऐकूं येतें तो उत्तम. जो अश्व आपल्या उजव्या आंगाकडे पाहून हिंसतो, तो उत्तम. ज्याचा शब्द पुष्कळ घोड्यांच्या हिंसण्याप्रमाणें वाटतो, असा जो गंभीर शब्दाचा अश्व तोही उत्तम. तसाच जो दुसऱ्या अश्वाचें हिंसणें ऐकून मागून हिंसतो तोही उत्तम. हीं उत्तम लक्षणें सांगितलीं. आतां वाईट लक्षणें सांगतों.

जो घोडा खालीं तोंड करून हिंसतो तो वाईट. आपल्या डाव्या आंगाकडे पाहून हिंसतो तोही वाईट. तसाच जो अल्पही वस्तु पाहून हिंसतो, तोही वाईट. गर्दभा सारखा हिंसणाराही वाईट जाणावा.

अश्वाचें हिंसणें मधुर, अविछिन्न, गंभीर, आणि दिनता रहित असल्यास, तसेंच भरलेलें पात्रस, ब्राह्मण पुष्पें हीं पाहून हिंसल्यास, त्याचप्रमाणें ध्वजाचे अग्रभाग व सूर्य यांस पाहून हिंसल्यास उत्तम लक्षण समजावें.

ह्या हिंसण्याच्या स्वराचें लक्षण घोडा लहान, निर्बळ, वृद्ध, भुकेलेला, तृषित, श्रमी, आणि भीत असलेला असतां पाहूं नये.

या हिंसण्यांत सिंहादि पशूंच्या प्रमाणें हिंसणें असल्यास उत्तम आणि काकादि पक्ष्यांप्रमाणें असल्यास वाईट जाणावें.

मागे अश्वाचे गंधावरून परिक्षा सांगितली आहे तो गंध कोणते ठिकाणचा पाहावा तीं इंद्रियें वगैरे—मुख, नाशिक व त्यांतून स्वास येतो तो, कर्णमळ, लिद आणि रेत इतके जागीं गंधावरून परिक्षा करावी.

अश्वाचे ठिकाणीं ५ छाया असतात त्यांचें वर्णन.

पृथ्वि, अप, तेज, वायु, आणि आकाश ह्यांची पांच प्रकारें छाया अश्वावर पहावी. सर्व रोम, मांड्या, दांत, केश, नखें या ठिकाणीं अधिक कांति असते. ती भूछाया जाणावी. कठीण, दिन व भस्मा सारखी पूर्वीं सांगितलेल्या ठिकाणीं कांति असल्यास ती वायुछाया जाणावी. अतिरक्त, अति स्निग्ध, सुवर्णासारखी कांति असल्यास अग्निछाया जाणावी. मेघासारखी निळी असून तेजस्वी अश्वप्रभा असतां जलछाया होय. रुक्ष, सूक्ष्म व विरळ अशी अश्वाची कांति असतां आकाशछाया जाणावी. गंभीर, स्निग्ध असून इतर सर्व रंगाची पृथ्वि छाया जाणावी. या वर सांगितलेल्या पांच छायेंत जळ, पृथ्वि व अग्नि यांची छाया असल्यास उत्तम आणि वायु व आकाश यांची छाया असल्यास वाईट समजावी.

घोड्यास सार म्हणजे शुक्र मज्जादि धातु ज्यास्त असते त्या वरून सार समजण्याचा प्रकार.

१ ज्याची त्वचा व केश स्निग्ध असून गुप्त अंगें सुंदर आहेत आणि जो बुद्धिवान, वेगसंपन्न, दक्ष, व स्वच्छ केसाते करणारा असतो तो अश्व त्वकसार होय. तो देखणा व शूर असतो.

२ परिमाणानें ज्याचीं अंगें विभक्त आहेत, व सर्व अवयव सारखे आहेत. तो तांबड्या रंगाचा किंवा तांबडी झांक असणारा रक्तनेत्राचा देखणा, तेजस्वी, शूर, स्मरण ठेवणारा व बुद्धिवान असा अश्व रक्तसार होय.. तो मोठा जिवट असतो.

३ ज्याचे दांत, आश्रुस्थान, डोळे व केश हे स्निग्ध, शिर मृदु, स्निग्ध, व विस्तीर्ण, खुरांतील शफ (नख) लांबट, जिव्हा मऊ व घट्ट असून कमल पत्राच्या आकाराची, मांस सर्वत्र सारखें आणि नासिक, नेत्र व तालू आरक्त आहेत तो मांससार होय. हा अश्व शुद्ध बळवान असतो.

४ लोध्र पुष्पाचे रंगाचा वृत्त (गोल) घट्ट अशा अंगांनीं युक्त जो, आणि कांहीं अंगें विभक्त व कांहीं पिळदार आहेत व नेत्र तालू यांचे ठायीं स्निग्ध जो घोडा तो मेदसार होय. त्याचा रंग चकचकीत दिसतो.

५ अगदीं स्वच्छ किंवा मेघाप्रमाणें रंगाचे, साग्र, सारखे व दाट असे दांत, दाढा व शफ (नखे) असून हाडें घट्ट व विभागलेलीं, बळकट, व भार सहन करणारीं आहेत तो अश्व अस्थिसार होय.

६ ज्याची मज्जा थिजलेल्या घृताप्रमाणें स्थिर, व पुष्कळ बाहेरचीं सर्व मांसें स्निग्ध, नेत्र तेजस्वी व स्वच्छ, सर्व रोम स्निग्ध

आहेत तो अश्व मज्जासार होय. हा बळकट व तेजस्वी असतो.

७ ज्याचें वीर्य स्निग्ध, घट्ट, दुर्गंधीरहित, व दुधा प्रमाणें असतें तो तृप्त असून वेगवान असतो. तो शुक्रसार होय. तो फार बळवान आणि कठीण असतो.

८ ज्याचे खूर सुंदर, शब्द गंभीर, सर्व अंगें सुरेख असून शीघ्र वृद्धि पावणारे सांधे, उत्तम व दृढ असून सर्व कर्मे करणारा तो अश्व स्नायुसार होय.

९ शूर, रणांत खिन्न न होणारा, स्मरण व बुद्धि यांनीं युक्त, स्निग्ध वर्ण, स्वच्छ केशाचा व ज्याचें गुदद्वार मळानें लिप्त होत नाहीं तो सत्वसार होय.

घोड्याची बुद्धि, आहार, निद्रा ह्यांविषयीं.

घोड्याचा विचार केला असतां असें दिसून येतें कीं, त्याची बुद्धि कुत्र्याच्या बुद्धिपेक्षां कांहीं कमी आहे. कुत्र्यास मनुष्याचा हुकूम ऐकण्याची व त्याप्रमाणें करण्याची जशी बुद्धि आहे तशी घोड्यास नाहीं. त्याचें सर्व शिकण्याचें ज्ञान लगामावर आहे. बसणारा जसा लगाम वळवील त्याप्रमाणें तो चालतो. तथापि घोड्यास कांहीं चाली वगैरे शिकवितात. त्यावरून त्यास बुद्धि अगदीं नाहीं असें ह्मणतां येत नाहीं. घोड्याचा जठराग्नि प्रदिप्त आहे ह्मणजे त्यानें कितीही खाल्लें तरी तें त्याला पचतें. घोड्याची निद्रा बहुतकरून उभ्यानेंच असते. ती पांच तासांहून जास्त नसते. उभ्यानें झोंप घेतली असतां पायास इजा आहे परंतु जमिनीवर अंग टाकून झोंप घेणें हितकारक आहे. ती तो आपल्या खुषीनेंच घेतो.

आनुकार.

चार प्रकारचे अनुकार सांगतों:—अश्वाची गति, स्वर, रुप आणि सत्व-यांवरून अनुकार पाहावे. सत्व तीन प्रकारचें-सात्विक १, राजस २, तामस ३. आतां रुपावरून अश्वाची आकृती ज्या दुसऱ्या प्राण्याचे आकाराची असेल त्याचें तें रुपानुक समजावें, ह्मणजे वानर मुख. गत्त्यानुक पुढें सांगावयाचें आहे ह्मणजे हंस, गज वगैरे पशूंचे चालीप्रमाणें ज्या अश्वाचें चालणें आहे त्यावरून गत्त्यानुक समजावें. स्वरानुक ह्मणजे सिंव्हादि पशूंच्या स्वरा प्रमाणें ज्याचे स्वर असतात ते अश्व शुभ होत. काकादिकां प्रमाणें शब्द करणारे ते वाईट.

श्रीमान, कांतिमान, मुखभागीं सुंदर व प्रशस्थ शरीराचा अश्व सात्विक. अखुड शरीराचा, तिक्ष्ण व मछरी अश्व राजस. हे अश्व राजास सहाय होत. दुर्बुद्धि आळशी तो अश्व तामस.

देव सत्वाश्व.

कित्येक अश्व देवा प्रमाणें सत्वधीर असतात. तसेच कित्येक यक्षा प्रमाणें बळवान, कित्येक गंधर्व व सर्प याप्रमाणें बळकट असतात ह्मणून त्यांची पूजा केली असतां ते राजास धर्म, अर्थ व काम येणें करून पूर्ण करितात.

देवाश्व.

सर्व पांढरे अश्व चंद्राचे, इंद्राचे सुवर्णा सारखे पीतवर्ण, यमाचे काळे, सुलक्षण संपन्न व रंगानें निळे विष्णूचे, सूर्याचे पोपटाच्या रंगा प्रमाणें हिरवे, अग्नीचे पळसाच्या फुला सारखे, वरुणाचे निळ्या ढगा प्रमाणें, व कुबेराचे अश्व पांढऱ्या कमळाच्या रंगाचे होत; या प्रमाणें वर्णावरून देवाचे अश्व पृथक पृथक सांगितले.

अश्वमेधास घोडा कसा असावा ह्याविषयीं.

जो अश्व सारा पांढरा व एक कान मात्र शामवर्ण आहे तो अश्वमेधास उत्तम.

तोंडाचे ठिकाणीं गाईच्या दुधा सारखा पांढरा आणि इतर ठिकाणीं कुंकवाप्रमाणें रक्त वर्ण, मानेवरील केश उत्तम व कान शामवर्ण आहेत असा अश्व अश्वमेधास योग्य आहे.

गाईचें दूध, कुंदाचें फूल, चंद्र आणि बर्फ याप्रमाणें पांढरा, पिवळ्या पुच्छाचा, श्यामकर्ण किंवा सर्वच शामवर्ण आहे तो उत्तम होय.

नील मेघाप्रमाणें सर्वांगाचेठायीं निळा, पाय व पुंढू या ठिकाणीं मात्र चंद्राप्रमाणें शुभ्रवर्ण आहे आणि ज्याचे अंगावर पांढरीं कमलाकार चिन्हें आहेत, तो अश्वमेधास उत्तम होय.

सर्व अंगाचे ठिकाणीं दुधासारखा शुभ्र असा असल्यास त्यास उच्चैश्रवा ह्मणतात. सर्व शरीर पिवळें असून पाय आणि तोंड मात्र श्वेतवर्ण असल्यास त्यास पंचभद्र ह्मणतात.

सर्व ठिकाणीं काळा असून पाय आणि तोंड श्वेतवर्ण असल्यास त्यास पंचवर्धन ह्मणतात.

गुह्य स्थान आणि मागील सांगितलेलीं पांच अवयवें मिळून ६ अंगें ज्याचीं शुभ्र आहेत त्यास पटवर्धन ह्मणतात.

सर्व रंग पिवळा असून पांयाचीं तळें व पाय ज्याचे पांढरे आहेत, तो चक्रवाक् नांवाचा अश्व होय.

पाय पांढरे असून मुखावर जांभळाच्या आकाराचे पांढरे बिंदु असतात त्यास मल्लिकाक्ष ह्मणतात.

ज्याचे डोळ्यांतील बाहुली, कांहीं पांढरी व कांहीं काळी अशा रेषेनें वेष्टिली आहे त्यास मल्लिकाक्ष ह्मणतात.

साग पांढरा असून चारी पाय काळे असल्यास यमदूत जाणावा. त्याचा त्याग करावा.

चारी पाय व मुखाचा मध्य भाग हीं ज्याचीं शुभ्र आहेत तो पंचकल्याणी होय. तो सर्वकाळ कल्याणकारक होतो. इति शार्ङ्गधरे.

भूपवल्लभे.

मुख व चरण या ठिकाणीं मात्र पांढरा आणि अन्य सर्व ठिकाणीं रक्तवर्ण अश्व पंचकल्याणी होय.

शार्ङ्गधरे.

ज्याचे चारी पाय, शेपूट, ऊर, तोंड, आणि डोक्यावरील केश शुभ्रवर्ण आहेत त्या अश्वास अष्टमंगळ असें जाणावें.

राजयोगकारक.

ज्याचे कान रुईच्या पानाच्या आकाराचे असतात, दांत सारखे असून विरळ असतात, लाखेच्या रंगा सारखी ज्याची जिव्हा, स्तन, टाळू हीं आरक्त असतात, डोळे वैडुर्यासारखे तशींच नखेंही असतात त्यास विजयी अश्व ह्मणतात. तो फारच उत्तम. असा अश्व राजांनीं पाळावा.

शुक पक्ष सवर्ण.

सर्व शरीराचा रंग पोपटाच्या पंखा सारखा असून शीर मात्र तांबडें असतें, नेत्र स्निग्ध असून भिन्न रंगाचे असतात त्यास शुकपक्ष ह्मणतात. हा अश्व उत्तम समजावा. हा अश्व राजांनीं पाळण्याला योग्य आहे.

गौर मणिनिभ.

सर्व शरीराचा रंग गौरवर्ण, टाळूचे ठिकाणीं मात्र तांबडा, अशा घोड्यास मणिनीभ अश्व ह्मणतात. तो राजानीं पाळण्याला योग्य आहे.

श्वेताश्व तालूरक्त.

टाळूचे ठिकाणीं तांबडा, दारूप्रमाणें नेत्र, मानेवरील केश आरक्त वर्ण आणि बाकी सर्व अंग तांबडें अशा घोड्यास रक्तताळू ह्मणतात. तो राजांनीं पाळण्यास योग आहे.

कृष्ण सटः

ज्याचे मानेवरील केश काळे, मेघ किंवा नगारा याप्रमाणें ज्याचा गंभीर शब्द, कृष्ण सर्पाप्रमाणें ज्याचा श्वास, गती उत्तम, ज्यास धैर्य पुष्कळ आहे त्यास कृष्णसट ह्मणतात. तो उत्तम अश्व होय.

शंखश्वेत.

शंखा सारखे शुभ्रवर्ण, शंखाप्रमाणें ज्याचा शब्द सुशील, हंसाप्रमाणें उभा राहणारा, फार ठेंगणा नाहीं फार उंचनाहीं, अशा अश्वास शंखश्वेत ह्मणतात. तो राजानीं पाळण्यास योग्य होय.

ज्या अश्वाचे डोळे दीपाच्या ज्वालेप्रमाणें, धांवणें बहीरससाण्याप्रमाणें, क्रौंच् पक्षासारखी ज्याची मान आणि पाय खोल आहेत, उडी मारण्याविषयीं जसे वानरच, पाहण्यांत फार उग्र आणि शंख, क्रौंचपक्षी, सिंह, मेघ गर्जना यांच्या शब्दा सारखा ज्याचा शब्द तो उत्तम समजावा.

कृष्णावर्त ह्मणजे घोड्याचे सर्व अंगांपैकीं एके ठिकाणीं शंखाप्रमाणें भोंवरा असतो तो फार चांगला आहे.

सुपर्ण पंख ह्मणजे छातीवर केश आले असावे कीं, ज्याचे योगानें छाती झांकून जावी; आणि चार पायास किंवा एक पायास केश असतात ते लहान किंवा मोठे असले तरी त्यास सुपर्ण पंख ह्मणतात.

गरुड पक्ष ह्मणजे घोड्याचे दोन्ही कुशींवर दोन भोंवरे असतात. एका कुशीवर असल्यास वाईट त्यास कुखावर्त ह्मणतात.

ज्या घोड्याचे डोक्याचे केश लांब असून त्याच्या योगानें डोळे झांकले जावे, आणि शेपटीचे केश जमिनीवर पडतात इतके लांब असतात त्यास कांबी आयाळ ह्मणतात.

दिव्यपक्ष दुसरे कांहीं भोंवरे व दुसरा रंग नसावा जर दोन्ही बगलांत दोन भोंवरे असतील तर तो उत्तम समजावा व त्यास दिव्यपक्ष ह्मणतात. एका बगलेंत भोंवरा असल्यास तो वाईट त्यास काखावर्त ह्मणतात.

कंठाभरण हाळकुळाचेखाळीं भोंवरा असतो त्यास ह्मणतात.

दोन्ही कुशी खालीं दोन भोंवरे असतात ते शंखाप्रमाणें, कमलाच्या फुलांप्रमाणें अथवा बांगडीप्रमाणें भोंवरा असतो त्यास शीतमंगल ह्मणतात.

ज्याचे कपाळावर किंवा डोक्यावर किंवा हाळकुळावर भोंवरा असेल तो ते २।३।४।९ असतील तर त्याचें नांव जयमंगळ.

अरिष्टभंग.

जो ठेंगणा व टाळू आणि मुख या ठिकाणीं तांबडा त्या अश्वाच्या योगानें शत्रूचा पराभव होतो.

पुष्कर.

ज्याच्या कपाळावर कमळ, पृथ्वी, माळा, चंद्र, वस्त्र, हत्ती, ध्वज, शंखपताका आणि भुज हीं चिन्हें शुभ्रवर्ण आहेत, तो अश्वराजलक्षण होय. कारण हीं राजचिन्हें होत. ज्याचे पाय व पोटऱ्या पांढऱ्या रंगाच्या आहेत त्यास अंनदरूप समजावें. तो अश्वपरराष्ट्राचें मर्दन करणारा होय. वक्र किंवा वज्र अथवा विस्तीर्ण धनुष्य हीं रंगाचीं चिन्हें ज्यावर आहेत तोही राजलक्षण युक्त अश्व जाणावा. त्याच्या योगानें मित्र, प्रीति, कोश, राष्ट्र, अश्व यांची वृद्धि, युद्धांत जय इत्यादि इष्टफलें प्राप्त होतात. या प्रकारचीं राजचिन्हें ज्यांवर

दिसतील त्या घोड्यांस अंगलेपन (चंदनादिकाचा लेप) स्नान, उटणें, माळा, सुगंध, उत्तम भोजन हीं नित्य द्यावींत व प्रदक्षिणा कराव्यात. ज्यांच्या घरीं सुपूजित असे अश्व आहेत, त्यांस पुत्र पौत्रादि संतति, शत्रु पराजय हीं फळें प्राप्त होतात.

अंगदंड मतिस्थूलः

अश्वांची वर सांगितल्याप्रमाणें पूजा केली असतां मोठाही शरीर दंड ते सहन करतात, याकरितां राजानें नित्य त्यांची पूजा करावी.

दीर्घग्रीवाक्षीकूट.

मानेचे ठिकाणीं लांब, नेत्र, त्रिकस्थानें, व हृदय या ठिकाणीं विस्तीर्ण; तालु, ओष्ट व जिव्हा या ठिकाणीं आरक्त; त्वचा व केश या ठिकाणीं सूक्ष्म; शफ, गति आणि मुख इतके ठिकाणीं सुंदर, कान, ओंठ व शेपूट हीं ज्याचीं अखुड आहेत असा व जंघा, (पोटऱ्या) गुडघे व मांड्या या ठिकाणीं वर्तुळ, सारख्या व शुभ्र दंताचा, रुपानें सुंदर, सर्वांगांनीं शुद्ध असा अश्व राजाच्या शत्रूंना नाश करणारा होय.

कंठस्थानीं कौस्तुभमण्यासारखा भोंवरा असेल तर त्या घोड्यास चिंतामणी ह्मणतात.

सर्व अंग पिवळे रंगाचें, चारी पाय पांढरे, व डोळे स्वेत रंगाचे त्या घोड्यास चक्रवाक ह्मणतात.

ज्या घोड्याचे ललाटावर एक हरिनें तीन भोंवरे असतात त्या घोड्यास त्रिकूट ह्मणतात. तो उत्तम होय.

दोन्हीं गंडस्थळीं भोंवरे असतात त्या घोड्यास इंद्राक्ष ह्मणतात.

कर्णमूळ स्थानाचे ठायीं दोन भोंवरे असले तर त्या घोड्यास विजयाख्य ह्मणतात.

नाशिक मध्यभागीं भोंवरा असेल तर त्या घोड्यास चक्रवर्ती ह्मणतात.

रंगाविषयीं.

घोड्याचे मुख्यः—सात रंग असतात ते येणें प्रमाणें श्वेत (पांढरा), तांबडा, पिंवळा, निळा, जरदा, काळा आणि कबूर (चित्रविचित्र रंगाचा). ह्या सर्वांत पांढरा उत्तम व त्याच्या खालोखाल तांबडा. सर्व शुभ्र, काळा, तांबडा आणि पिंवळा हे चार रंगाचे घोडे युद्धाचे उपयोगी आहेत. हिरव्या रंगाचे घोडे फार दुर्मिळ असतात-घोडा पांढरा किंवा श्यामवर्ण असून मेहन (शिश्न) अरक्त वर्ण असल्यास तो घोडा उत्तम होय. कपोत पक्ष्या प्रमाणें काळा असून केश जर पांढरे असतील तर तोही प्रशस्त होय. ज्याच्या पाठीच्या कण्याला अनुसरून पांढरी रेषा आहे व ज्याचें मस्तक कांहीं पांढरें व कांहीं काळें तो अश्व प्रशस्त नाहीं. ज्या त्या रंगापेक्षां भिन्न रंगाचें पुच्छ व शीर आहे किंवा पुच्छ व शीर या ठिकाणीं चित्रविचित्र रंग आहे ते अश्व प्रशस्त नाहींत. ज्याचा रंग अस्पष्ट आहे, किंवा तितीर पक्ष्याप्रमाणें आहे आणि तोंड वानराप्रमाणें आहे, किंवा व्याघ्रा प्रमाणें ज्याचें चाटणें आहे, ते अश्व चांगले नाहींत.

घोड्याचे सर्व रंग प्रशस्त आहेत पण ते तेजस्वी, स्थिर व स्निग्ध असावेत. त्या सर्वांत पांढरा उत्तम आहे. कारण तो नित्य सर्व रंगाचा पति आहे ह्मणून सर्व वर्णांचा संयोग पांढऱ्या रंगानें मिश्रित असावा.

ज्या घोड्याचे केश पीतवर्ण आणि गौरवर्ण आहेत तो, व पुच्छ व केश आणि मुख हे तिन्ही पांढरे रंगाचे आहेत तो, असे दोन्ही अश्व उत्तम होत. ज्याचे तार (केश) पिवळे किंवा पांढरे आहेत तोही उत्तम. ज्याचे तार (केश) पांढरे तो युद्धांत उत्तम. सर्व पांढरा सर्व काळा, सर्व तांबडा आणि पिंवळा हे अश्व युद्धांत उपयोगी आहेत. हिरवे घोडे महा पुण्य असल्यास प्राप्त होतात.

कोणत्याही रंगांत काळे, निळे रंगाचें मिश्रण असलेले प्रशस्त नाहीं व अगदीं त्याज्य आहे. अन्यही सर्व रंग मिश्र असलेले प्रशस्त नाहींत. ज्या घोड्याचा उत्तम असलेला पहिला रंग हळु हळु वृद्धिंगत होतो तो अश्व उत्तम समजावा, आणि ज्याचा पहिला रंग पुढें कमी होत जातो तो वाईट समजावा.

इंग्रजींत रंगाचे पुष्कळ भेद आहेत. सफेत (पांढरा), निळा, लाल (तांबडा), बोर, पिंवळा, जर्दा, काळा, सारंगा, कुमाईत, तांबूस कुमाईत, काळसरकुमाईत, पिंवळाकुमाईत, गहिरा, निवळ बोर, बोरतांबूस, भुरका (हरिणा), तांबडे झोकाचा, काळसर, तांबडा (तेल्याबोर), तांबसरकाळा, कोळश्या सारखा काळा, आणि आस्मानी.

गांगा, तांबडा, पांढरा मिश्र ह्मणजे तांबडा कर्डा (उंब्रा केसांचा) काळ्या पांढऱ्या मिश्र केसांचा, कर्ण ह्मणजे सब्जा, चित्राविचित्र ह्मणजे चितोडा, फाक्ता, दूदा, सौर, निळा (निळीचे रंगाचा), कबूर, जर्दा, गर्दोस (शेंडी पासून नाका पर्यंत पांढरी लकेरी असेल त्यास ह्मणतात. जर दुसरें कोठें अंगावर पांढरे असेल तर गर्दोस ह्मणत नाहींत), पिवळी अयाळ, वाघ, गिधड, लांडगा यांचे रंगा प्रमाणें दूम ह्मणजे शेपूट नसावी. संजाबाला गर्दोस प्रमाणें लकेर असेल तर वाईट रंगाचा घोडा समजावा. सौर ह्मणजे सर्व शरीर काळे रंगाचें किंवा माती अथवा गुलाबी किंवा घारे असे रंगाचें असल्यास त्यास सौर असें ह्मणतात. फुल्ला, शरीरावर पांढरे ठिपके होतात तो. सुरंग, कुमाईत, मुषाक, जर्दा या रंगांवर पांढरे ठिपके असल्यास वाईट. उंदराचे रंगाची दूम असल्यास वाईट. एक हात किंवा एक पाय गुढघ्यापर्यंत पांढरा असल्यास त्याला अर्जल ह्मणतात, पण तो घोडा या खेरीज सर्व ठिकाणीं एक रंगाचा असावा. सदहू फाक्त्या पासून अखेर पर्यंत जे सदरीं रंग लिहिले आहेत ते वाईट रंग असें ह्मणतात.

१ अष्टमंगळ, २ समंद, ३ फल्वरी, ४ कांव, ५ चाळ, ६ संदली, ७ मक्सी, ८ मुरगा, ९ चिनी, १० सुरंग, ११ संजाप, १२ गहिरा, १३ चौधर, १४ हरा, १५ गर्क, १६ मोहताब, १७ बावर्त, १८ जुरई, १९ शनवनी, २० मुरगा, २१ टोपड, २२ हरांजनी, २३ निलाष्कुक, २४ पंगत, २५ टपाला, २६ घेर, २७ कछा, २८ मळहीर, २९ खिरा, ३० सबजा, ३१ शामकर्ण, ३२ फाकताई, ३३ अचंब, ३४ अर्जन, ३५ सोतम, ३६ लखीख, ३७ पंचकल्याण, ३८ परेल, ३९ वचक, ४० अबलक, ४१ सोहा, ४२ बदामी, ४३ कुमेन, ४४ एकरंग, ४५ सौर, ४६ बिलोरी, ४७ हुतग, ४८ गर्ग, ४९ बागंबरी आणि ५० चल हे रंग फारषी ग्रंथांतून घेतलेले आहेत

तांबडे रंगांतील प्रकार.

१ सुरंग छिद्डा—शरीर लाल, व आयाळ, दूम आणि शेंडी सफेत, कपाळावर पांढरा ठिपका असावा.

२ मुतलकलमी—शरीर तांबडे, दोन पाय व उजवा हात सफेद गुडघ्या पर्यंत व कपाळावर ठिपका पांढरा असावा.

३ सुरंग—ह्यांत दुसरा रंग नसावा केवळ रक्ता प्रमाणें असावा.

४ सुरंग आबलख—हा शरीर सफेद, तोंड लाल किंवा सफेद पट्टे आणि शरीर लाल अगर सफेद शरीर किंवा लाल पट्टे याप्रमाणें असतो.

५ सुरंग आपसानी—लाल शरीर, त्यावर सफेद काळे पिवळे यांपैकीं एखादे रंगाचे पट्टे असतात. हा घोडा चांगला परंतु क्वचित आढळतो.

६ सुरंग माहावा—शरीर लाल, त्यांत काळसर रंग चांगला, व हात पांढरे गुडघ्या पर्यंत, व डोळ्याची अकृती मनुष्याचे डोळ्याप्रमाणें असते. यालाच जयमंगळ ह्मणतात.

७ सुरंगगरा—शरीर लाल, त्यांत पांढरे केंसाचें मिश्रण व डोळे मनुष्याचे डोळ्या प्रमाणें असावेत.

८ सुरंग सुनेरी—सर्व शरीर तांबडें, त्यांत पिंवळेपणा असावा व कांहीं जर्दा केसाचें मिश्रण असावें. असा घोडा चांगला होय.

९ सुरंग बदामी—हा सर्व रंग बदामा प्रमाणें असून त्यांत लाली असावी. असा घोडा फार चांगला होय.

१० निखालस कुमाईत—शरीर सर्व लाल, आयाळ व दूम काळी, चारी पाय गुडघ्या पर्यंत खाल पासून काळे असावे, कान व शेंडी काळे केंसाची असावी.

११ तेलीया कुमाईत—यांत केंश लालकमी व काळेजास्त असावे, पाय गुढघ्या पर्यंत काळे असावे, व कपाळावर पांढरा ठिपका असावा. जर चारी पाय पांढरे असतील तर तो तेलीया पंचकल्याण असें समजावें.

१२ कुमाईत आबलख—अर्धे शरीर लाल व अर्धे पांढरें असें असावें.

१३ अबलग—सर्व शरीर लाल त्यांत कांहीं काळे, पांढरे, जर्दे असे पट्टे असावे ह्मणजे चांगला. असा घोडा क्वचित आढळतो. सदरप्रमाणें शरीरावर पट्टे असून मुखपट्टाही असावा.

१४ कल्ला—सर्व शरीर लाल त्यांत जर्दा रंगमिश्र असून आयाळ व दूम काळी असावी व पाठीवर सैली असावी.

१५ दूर्वेगूष—सर्व शरीर लाल व त्यांत काळें मिश्रण असावें, आणि शेंडी, आयाळ, दूम, हातपाय काळे व कान सफेद असे असावेत.

१६ आप्सतुर्क फलवारी—सर्व शरीर लाल किंवा लाल रंगावर निरनिराळे रंग, कपाळावर पांढरा ठिपका, नाक व वरचा ओंठ पांढरा असावा. डोळे गारे असावेत. हातपायावर काळे, जर्दे किंवा पांढरे टिपके असावेत.

८ नुकरा—पांढरा रंग असून त्यांत जर्दा रंग असावा व डोळे सफेत व चकचकीत असावेत.

९ नुकरापलंग—पांढरें शरीर त्यांत जर्दे व काळे ठिपके असावेत.

१० बवर्ता—सफेत व काळे केंस असून त्यांत लाल केस असावे.

११ निळा कबूद—सफेत व काळे केंस असावे, डोळे घारे, आयाळ व दूम पांढरी, आयाळींत कांहीं केंस पांढरेही असावे.

१२ महावा आबलग—मोहाच्या बियांच्या रंगा प्रमाणें सर्व शरीर असून त्याजवर बारीक पांढरे पट्टे असावेत, हातपाय, आ-याळ व दूम हीं सर्व पांढरीं असावींत, कान काळे, शेंडी, तोंड व नाक पांढरें, कपाळ सर्व रंगीं आणि डोळे मनुष्याचे डोळ्याप्रमाणें असावेत.

१३ बुजतेलीया अबलग—सर्व शरीर पांढरें असून त्यांत काळ-सरपणा असावा, कान काळे, पोटा खालीं काळें, आयाळ व दूम काळी आणि पाठीवर व हातपायावर काळी लकेर असावी.

१४ हातपाय, दोन्ही कान व कपाळ तसेंच छाती व दूम सर्व पांढरी असतील तर वाईट ह्मणतात परंतु ते वाईट नाहींत.

१५ पिसाबाच्या जाग्यावर पांढरा रंग असेल तर चांगला.

१६ खूब—सर्व रंग एक असून एक कान रंगीन असावा.

भरत खंडांतील ५६ देशांचीं संस्कृत व प्राकृत नांवें.

अंगदेश-(बहार) पाटना, राजमहाल, मोंगीर, गाजीपूर इत्यादि.

अवंतिदेश-(माळवा) उज्जनी, चितूर, इंदूर इत्यादि.

आंध्रदेश-(तैलंगण) नेलोर, गंतूर, मच्छलिपट्टन, राजमहेंद्र, विशागापट्टन, आणि गंजम इत्यादि.

आनर्तदेश—द्वारका प्रांत.

कनोजदेश—गंगा व यमुना यांमधील प्रांत, अंतर्वेदी, इ०.

करहाटदेश—दक्षिण कोंकण.

कर्नाटकदेश—म्हैसूर, श्रीरंगपट्टण, यांतून कावेरी नदी वाहते.

कलिंगदेश—(ओढिआ) कटक, बळासूर, खुर्द अ० जगन्नाथ-पुरी इ०.

कांबोजदेश—(रोहिलखंड) मुरादाबाद, वगैरे किंवा ब्रह्मदेशाचा दक्षिण भाग ज्यास कांबोडिया ह्मणतात.

कामरूमदेश—(आसाम) बंगाल इलाख्यांत.

काश्मीरदेश—प्रसिद्धच आहे. जंबू.

किरात—पूर्व समुद्राकाठीं, उन्नूर, सुंदा, इ०.

कुंतलदेश—(दक्षिण हैद्राबाद) कल्याणी, कलबुर्गा प्रांत, बेदराचा मुलूख, इत्यादि.

कुरुदेश—अकबराबाद, आग्रा, मिरत, मुजफरनगर, साहरणपूर, पाणपत, अंबाला, संपादु, लुधियाना, इत्यादि.

केरलदेश—(मलबार) कालिकोट इ०.

केकेयदेश—काबूल.

कोंकणदेश—रत्नागिरी, (ठाणें, साष्टी), कोळवण इ०.

कोसलदेश—(आयोध्या) लखनौ.

गांधारदेश—कंदहार.

गुर्जरदेश—सुरत, बडोदें, खेडा, अमदाबाद, वगैरे.

गौडदेश—बंगाल्यांतील गंगातीरचा भाग.

चैद्यदेश—शिशुपाळाचा देश पूर्व हिंदुस्थान.

चोलदेश—(मद्रास) अर्काट, त्रिचनापल्ली, तंजावर वगैरे.

जालंदरदेश—पंजाबचा दक्षिण भाग.

टंकणदेश—(मद्रास) कुर्ग.

दशार्णवदेश—(ठठ्ठा) सौराष्ट्र काठेवाडाकडे.

द्रविडदेश—त्रावणकोर जिल्हा, चितोर, चिंगलपट व मद्रास इत्यादि.

नेपालदेश—प्रसिद्धच आहे. यांत मुख्य देवस्थान पशुपतेश्वर मुक्तस्थान आहे.

नैषधदेश—बंगाल्याचा एक भाग.

पांचालदेश—(पंजाब) लाहोर वगैरे.

पांड्यदेश—(मद्रास) मधुरा जिल्हा.

पाटनादेश—(प्रयाग) काल्पि, चित्रकूट वगैरे.

पारसिकदेश—इराण.

पुलिंददेश—बलुचिस्थान.

बर्बरदेश—आफ्रिकेंतलीं बार्बरी संस्थानें.

बाल्हिकदेश—अर्बस्थान.

भद्रदेश—(इजिप्त) मिसरदेश.

भोजकोटदेश—कच्छदेश.

मरुदेश—मारवाड, अजमीर, जयपूर, जोधपूर.

मलियाड—मलबार.

मत्स्यदेश—कानपूर, मिरजापूर इ०.

महाराष्ट्र—पुणें, सातारा, अहमदनगर, सोलापूर, नासिक, खानदेश, इ०.

मागधदेश—गया जिल्हा.

मालवदेश—(माळवा) इंदूर, उज्जनी इ०.

मेदपाटदेश—मेवाड, उदेपूर वगैरे.

मैथिल अथवा विदेहदेश—(जनकपूर) गोरखपूर प्रांत.

मेंध्रुवदेश—दिल्ली, अग्रा इत्यादि.

यवनदेश—ग्रीसदेश वगैरे.

लाटदेश—(औरंगाबाद) वेरूळ वगैरे.

वंगदेश—(बंगाला) चितेगाग व कामाक्षादेवी आहे तो प्रांत.

विदर्भदेश—(वऱ्हाड) आकोला, उमरावती, वगैरे.

शूरसेनदेश—अलिगड अ॰ कोएल, मथुराप्रांत.

सिंधुदेश—सिंधप्रांत.

सिंव्हलद्वीप—(लंका) सिलोन.

सौराष्ट्रदेश—काठेवाड, सोरटी सोमनाथ.

हूणदेश—तिबेटदेश वगैरे हिमालयाचे पलीकडील प्रांत, उत्तरभद्र उत्तरकुरु अथवा सिंधुदेश इत्यादि.

याप्रमाणें भरतखंडांतले ५६ देश ग्रंथांतरीं प्रसिद्ध आहेत.

हे देश जेथें देशाचें संस्कृत नांव येईल तें समजण्याकरितां प्राकृत भाषेंत दिले आहेत.

घोड्यांचे जन्मदेश.

उत्तम अश्व सर्वांत अधिक गुणवान् असतात, तें पारशिक (इराण) तार्तरी, केकाण ह्या देशांत उत्पन्न झालेले असतात. हे पृष्टज (पृष्ट भागाचे ठिकाणीं अधिक उंच) असतात. उरोज (उराचे ठिकाणीं विस्तीर्ण) हे बुखार (बुखारा), भूपृष्ट आणि आंध्र या ठिकाणचे झालेले होत. तसेंच, हे पट्ट, सिंधू (सिंध) सारस्वत, समंग, आकूत आणि जटा ह्यादेशांत उत्पन्न झालेले असतात. त्यांचा दीर्घपणा बेताचा असतो. मान साधारण लांब असते. कान आंखूड असून, शरीर मोठें व ऊर रुंद असतो. ते अश्व उत्तम होत. इति जयदेवकृते.

नकुल कृते.

चार प्रकारचे घोडे भूमीचे ठिकाणीं देशविशेषाच्या संबंधानें

उत्पन्न झाले. ते उत्तम, मध्यम, कनिष्ट आणि नीच याप्रकारे होत. जाजिक, खुरसान, तुषाण ह्या देशांत उत्पन्न झालेले घोडे उत्तम होत. गोजिककाण, केकाण आणि पोटाहार या देशांतले घोडे मध्यम; गाह्वर, साहुराण, आणि सिंधुवार येथील कनिष्ट; आणि वरील देश शिवाय करून इतर देशांतले नीच अश्व समजावे.

वर लिहिल्याप्रमाणे घोड्याचे जन्म देश सांगितले. मूळ घोड्याची प्रख्याती व त्याचा उपयोग आरबस्थानांत झाला असें जें इंग्लिशांच्या शोधांत आहे तें वास्तविक आहे. कारण घोड्याची उत्तम जात आणि त्याचे जन्म देश जे वर सांगितले त्यांत आपल्या हिंदुस्थानास लगत बुखारा आणि पारशिक (इराण) ह्या ठिकाणचे उत्तम घोडे असें लिहिलें आहे. यावरून अरबी घोडे उत्तम अशी जी ह्मण आहे ती खरी आहे. अरबस्थानांत घोडे ईजिप्तांतून आले असें इंग्लिशांचे धर्मपुस्तकांत जेकब महापुरुषानें लिहिलें आहे. यावरून आफ्रिकाखंड हें घोड्याचें मूळ जन्म स्थान शोध लागलेलें होय.

सांबराणी, जयनाथ, महा, माभुती, लातव, कलोती, या सहा देशांतले घोडे उत्तम समजावे. अस्सल आरबी घोड्याचें आयुष्य चाळीस वर्षे असतें. आदन, बुखारा, जिवनीया, सफरा, खुरासान येथील घोडे उत्तम व बळकट असतात. यांचें आयुष्य बत्तीस वर्षे.

मुलतानचा घोडा लहान असून त्यास शक्ती फार असते.

विलायत, हुरमूज, अज्यनाग, नागळार, येवलें, येथील घोडे मोठे व पळणारे असे असतात.

कच्छ व विलायत येथील घोडा फार चांगला असतो.

ताजी (आरबी,) नरदीन, तुर्की, तुरासानी, ईराकी, यमनी, तार्तरी, खुतनी, आदनी, चिनी, माचिनी, तुराणी, काबुली, काश्मीरी, इराणी, भिवरथडी, काठेवाड, जंगल, भुटिया, रंगपूर, घोडाघाट, इजानीइजत, नजत, शामी, जंजिरे, बारकी, मिश्री, खपाजी, मगरीफ

(पश्चिमेकडील), विलायती (इफीरगीर), मानदेशी, अर्काट, दक्षिण-देश हेहीं घोड्यांचे देश आहेत. सदरीं सांगितले देशांपैकीं कांहीं देशाचे घोड्यांचें वर्णन पुढें सांगण्यांत येईल.

पृष्टज.

आतां पृष्टजांचें लक्षण ह्मटलें ह्मणजे त्यांचीं शरीरें स्थूल किंवा अस्थूल असतात. त्यांच्या पाठी लांबरुंद असतात. केकाण देशांत झालेल्या हलक्या प्रतीच्या घोड्यांचीं मुखें नावेच्या मुखासारखीं असतात, हें त्यांचें सामान्य लक्षण होय.

उरुजा.

लांब व आंखूड शरीराचे (चांगले लष्ठ असून अतिशय तापट) पाहिजेत तशीच शरीराची ठेवण सुरेख, व बाटोळी असून स्वभावानें जलाल, शरीरानें फार उंच, अथवा नीच नसून साधारण मध्यम आकाराचे असणारे घोडे ' उरुज ' जातीचे होत.

तुरुष्का.

तुरुष्क देशांतील घोड्यांचीं शिरें व विशेषतः मुखें स्थूल असून त्यांचीं बाकी सर्व लक्षणें उरुज जातीचे अश्वा प्रमाणें असतात.

केकाण देशांतील घोडे मांडलिक असल्यामुळे ते सौम्य, शरीरानें धिप्पाड वगैरे गुणांनीं तुरुष्काचें साम्य पावत नाहींत.

सिंधु देशांतील घोडे शरीरानें बळकट असून बहुत सुख देणारे होतात. सिंधु देश कोणता याविषयीं तंत्रराजांत लिहिलें आहे कीं, लंकेपासून तों थेट मक्के पर्यंत असणारा जो डोंगरी मुलूख तो सिंधु देश होय.

आननंचापि.

पक्कआणिसारस्वत (सरस्वती नदीच्या कांठचा देश) या देशांतील घोडे पराक्रमानें व वेगानें प्रख्यात व रणामध्यें मरदुमकी करणारे ताजीक देशांतील घोड्यापेक्षां स्वारावर अधिक प्रेम करणारे असून

शरीरानें उंच, आंगलेट, विस्तृत, पाठ व तोंड लांब व कान फार तिखट असे असतात.

कानाच्या पाळया लांब व गुढघे एकमेकांस लागणारे असले ह्मणजे तो अव्याल जातीचा घोडा समजावा.

दक्षिणेकडील घोडे लढाऊ असून शरीरानें लहान व सरळ आकृतीचे असतात. पूर्वेकडील घोडे अतिशय दुष्ट व चालण्यामध्यें कमकुवतीचे असतात.

वर सांगितलेल्या लक्षणांवरून घोड्यांचीं लक्षणें जाणावीं.

राजकोशे.

सैंधवाश्व, रहवाल, यावन, इराखी, पारशीक, आरबी, जवत, कछी, विजायतीय, मुजतस, वाल्हीक, जहरी, मंद्रज, ताजी, पार्वतीय, टांकण या ठिकाणींचे घोडे वरील लक्षणाप्रमाणेंच असतात.

गणकृताश्वायुर्वेदे.

कांबोज, वाल्हीक, वनायुज, गांधार, रद, चांपेय, सैंधव, तैतिल, कुलज, उपकुलज, मेचक, उपमेचक, त्रिगर्त, अर्जून, सावित्रेय, यौधेय, यावन, ऱ्हस्व यावन, तुषार, कंदर, पर्वत, अवंती, उरस्प, सकानन, मद्र पर्वतोत्तर, मद्र, कैकेय, अंतर्द्वीप, वासंतक, सौवीर, दारद, सैंधव, कैरावत, मालव, अवंति, कालिंग, मौग्द्ल, वानवार, तैलंग, कथन, प्रावृतक, सौराष्ट्र, पाल्क, कुरुक्षेत्र, पांचाळ, प्रोथक, कुकुशव ऱ्हस्वकुकुश इतक्या देशांत अश्वांची उत्पत्ति विशेषेंकरून होते.

अश्वांचीं कुलें ९४ आहेत तीं पुढें सांगण्यांत येतील. शिवाय त्यांचीं कुलें आहेत तीं येणें प्रमाणें.

मंड, वक, वार्मितेय, मौलिक, श्वेतवाहन, चकोर, श्वेतगिरीज, वैदर्भवसामेय (शेवटची जात हिमालय पर्वताच्या दक्षिणेकडील व पूर्वे कडील भागांत राहाते) ॥ इतिअश्वोत्पत्तिः

अथाश्वकुलानि.

शालिहोत्रांत सांगितलें आहे कीं, मागें सांगितलेल्या कुलांच्या पुत्रपौत्रांनीं कालें करून सर्व पृथ्वी व्यापली त्यांपैकीं कित्येक समुद्राच्या कांठावर जाऊन राहिले. यवन, कांबोज, (यवन देश वायव्येस आहे व कांबोज देश पांचाल देशापासून म्लेंच्छ देशाच्या पूर्वेस व दक्षिणेस जो देश आहे त्यास ह्मणतात.) हे देश व त्याच्या भोंवतालचीं अरण्यें त्याप्रमाणेंच शता (शतद्रु-सतलज), विविधाशा, काकधा, चंद्रभागा, सरस्वती, कौशिकी, गंगा, मेघवती इत्यादि नद्यांचीं तिरें यांमध्यें ते पसरले.

केचित्पर्वताश्रिताः

आणखी कच्छ, कुकु, हिमालय, मलय, गिरिथि, गंधमादन, कुणीर, कैलास या पर्वतांमध्यें ते जाऊन राहिले.

अथ देशाश्रितः

आणखी सौराष्ट्र, शूरसेन, काश्मीर, मंदभूमिक, पांचाल, कुकुर, वंग, गांधार, बर्बर, दशार्ण, सौवीर, मध्यप्रांत, कलिंग, विदर्भ इतक्या देशामध्यें ते जाऊन राहिले.

हिंगुलाजा पासून ४०० कोस पसरलेला गुजराथचा भाग सौराष्ट्र नांवाचा आहे (ज्यास हल्लीं काठेवाड ह्मणतात). मगध देशापासून (बहार) दक्षिणेकडे व विंध्याचलाच्या पश्चिमेकडे जो देश तो शूरसेन देश होय. काश्मीर हा देश उत्तरेस आहे. कुरुक्षेत्रा पासून पश्चिमेस, इंद्रप्रस्ता पासून उत्तरेस त्रयोदश योजन पर्यंत पांचाल देश होय. कुकुर हा देश उत्तरेस आहे. हस्तनापुरापासून (दिल्ली) कुरुक्षेत्राच्या दक्षिणे कडील व पांचालाच्या पूर्व कडील भागास कुरुदेश ह्मणतात गांधार हा देश पूर्वेस आहे (परंतु त्यास हल्लीं कंदाहार ह्मणतात. तोच तो असावा.) या पुरापासून उत्तरेकडे सप्तशृंगा पर्यं-

त बर्बर देश (परंतु पुष्कळ लोकांचें मत असें आहे कीं, हा देश आफ्रिका खंडाच्या उत्तर टोंकाला जो बार्बरी ह्मणून देश आहे तो-च हा असावा) दशार्ण हा एक उपदेश आहे (अजमीरच्या आ-सपास प्रांताला हेंनांव आहे. मध्यदेश ह्मणजे अंतर्वेदी आहे सौवीर हा देश किंकरा पासून पश्चिमेकडे व शूरसेनाच्या पूर्वेकडे जो आहे तो. ओढ्याजगन्नाथ पासून दक्षिणेकडे कृष्णा नदीच्या मुखा पर्यंत क-लिंग देश होय. वज्राकार या स्थला पासून ब्रह्मपुत्रानदी पर्यंत देशाला वंग हें नांव आहे (यास हल्लीं बंगाल ह्मणतात) भद्र-काली पासून रामदुर्ग पर्यंत पश्चिमेकडील देश विदर्भ (यास हल्लीं वऱ्हाड ह्मणतात). क्रथ हा उपदेश आहे. कौशिक ह्मणजे जेथें कौशिक नदी आहे तो. हा आग्नेयींदिशेकडे प्रसिद्ध. आहे

घोड्यांची एकंदर ५४ कुळें आहेत ह्मणून मागें सांगितलें तीं येणें प्रमाणें:—मुख्य कुळें ४ कांबोज, वानायुज, आरट्टज, सैंधव. हीं होत.

तशींच उपकूळें ४ उपकुळ ह्मणजे मुख्य कुळें ज्या देशांत होतात, त्या-च्या जवळच्या देशांत त्या कुळा पासून झालेलीं कुळें तीं उपकुळें तीं ४ बाल्हिकेय हें कांबोजाचें उपकुळ होय. गांधार हें वानायुजाचें उप-कुळ नापेय हें आरट्टजाचें उपकुळ. आणि तैतिळ हें सैंधवाचें उप-कुळ होय. मेचक, उपमेचक, कुळज हीं चार अंतरकुळें आहेत. त्रैगाल, आर्जुनेय, सावित्रेय, यौधेय हीं चार तद्‌मुख्य कुळें आहेत. यावन, तुषार, विषमेय, कादंबरेय, वार्ष्मेनेय हीं ५ पंचस्थ. अवंत्य, काश्मीर, सकाचक, पानीय, उत्तरांत, हीं ५ विपमेय कुळें होत. दक्षिणांत. माद्रेय, अंतर्द्वीपिक, कैकय, अंबष्ट हीं ४ अनूपज कुळें होत. वासंत, सौवीर, दारद, सैंधव हीं चार अपरांतक कुळें आहेत. क्षुद्रक, मालवक, ऐरावन, आवंत्यक हीं चार शूद्रकुळें आहेत. कालिंगक, मोकुल, वानवासिक, तैलिंग हीं चार दक्षिणात्य कुळें होत. क्रथन, अपावृतक, सौराष्ट्र, साल्वेय हीं चार वैशिम कुळें होत.

कुरुक्षेत्रज, पांचाळ, वोष्टज, अपिसाज हीं चार बेसर कुळें होत. स्वाकज व हिमालयाच्या उत्तरेकडील प्रांतांतील हीं २ कुकुस कुळें. एक उत्तर कूळ. मंतावक, अश्मकेश, मौत्किल, चकोरक, श्वेतशैलज, वैदर्भिक, पूर्व हैमेय, दक्षिण हैमेय, सामेय हीं नऊ कुळें घोटक होत. याप्रमाणें चार कुळें, चार उपकुळें, चार अंतस्थ कुळें, चार तदनुस्थ कुळें, पांच पंचमस्थ, पांच विषमेय, चार अनुपज, चार अपरांतक, चार वैशिम, चार बेसर, दोन कुकुस, एक उत्तर, नऊ घोटक, अशीं एकंदर कुळें ९४ व त्यांखेरीज मुख्य कुळें व उपकुळें आठ आहेत.

या प्रमाणें कुळें सांगून देशादेशाच्या ठायीं होणाऱ्या अश्वांचीं भिन्न भिन्न चिन्हें, स्वभाव वगैरे कथन करतों.

तत्रादौकांबोजाश्व प्रशंसा.

(कांबोज्यांचीं लक्षणें.)

कांबोज देशांतील घोडे सर्वांहून श्रेष्ठ होत. रुप, तेज, वेग इ-त्यादि गुणांनीं यांची बरोबरी दुसऱ्यांच्यानें होत नाहीं. हे कुलीन, चांगल्या स्वभावाचे, दमदार, बळकट, क्रूर नव्हेत असे, धन्याचे हितकरणारे, सुंदर, शुभकारक असे आहेत.

यांची हनुवटी व कपाळ हीं मोटीं असतात. तोंड लांब असतें. पावलें व पायाचे घोटे थोडे उंचावलेले, मांड्या भरदार, शरीराच्या मानानें पोट सडपातळ, शरीराचा बांधा उंच व थोडा डौलाचा, शंकूच्या आकाराचे कान, बेडकाच्या डोळ्या प्रमाणें डोळे उचलून आलेले, मान लांब, शरीरावरील केंश तुळतुळीत, अंगावरील कातडीं मऊ, ते घोडे काळ्या, तांबड्या, पांढऱ्या रंगाचे असले तरी त्यांचा तोच रंग कायम राहातो, विटत नाहीं, सदां आनंदांत असून खिंकाळत असतात, इतकीं लक्षणें त्यांचीं आहेत.

तेषामुपकुलजाबाल्हिकाः

(बाल्हिकांचीं लक्षणें.)

त्या कांबोजाचें उपकुलज बाल्हिक देशांतील अश्व होत. हे रुपानें, गुणानें, व पराक्रमानें, कांबोज देशांतील घोड्या सारखे असतात. याकरितां त्यांतील विशेष भेद काय काय याचा निर्देश करितों. शरीराचे अवयव लांब, पाठ रुंद, कांतडीं मऊ, मांडया आंखूड व भरदार, शरीरावर ठिपके ठिपके असतात. शरीराची पुढील बाजू उचललेली, लांबी रुंदीनें कांबोजच्या घोड्यापेक्षां किंचित वरिष्ट, या प्रकारें करून शरीरानें असतात; व ते शरीरानें प्रायःपिंगट रंगाचे असतात.

हे उदार मनाचे, धन्या विषयीं प्रेमळ, प्रसंगीं पराक्रम करणारे, स्थिर, संकटामध्यें कधींही स्वाराला सोडणारे नव्हेत असे असतात.

अथवनायुजदेशस्थाः

(वनायूज देशांतील अश्वांचीं लक्षणें.)

शरीरें फार उंच नाहींत परंतु फार लहानही नाहींत. तीं मध्यम प्रमाणानें असतात. पुढली शरीराची बाजू उचललेली, तोंड लहान, डुकरा सारखे डोळे तीक्ष्ण, शंकू सारखे कान, शरीराचा बांधा बळकट व वाटोळा, नाक उंच, पाठ आणि त्रिक हीं लहान, चालीनें वरिष्ट, उदार स्वभावाचे, गर्धभाच्या खुरा प्रमाणें ज्यांच्या कडा अतिशय खोल व मोठे असे खुर, प्रत्येक कामाच्या ठिकाणीं स्थिर, पुष्कळ मजल करणारे, मनस्वी ओझें घेणारे, शरीरानें बळकट व वेगवान् असे असतात. त्यांना जें काम शिकवावें तें ते लक्ष लावून शिकून त्यांत लवकर प्रवीण होतात. त्यांचा रंग बहुधां काळा असतो. ते दम, तेज, बळ यांही करून वरिष्ट असे असतात.

तदुपकुलस्थाः

(उपकुलज गांधार यांचीं लक्षणें.)

त्यांचे डोळे काळे व भुरे प्रायशःअसतात. त्यांचे रंग काळवीटासारखे अथवा तांबडे लाल अथवा दुसऱ्याही कित्येक रंगाचे असतात. त्यांचीं शरीरें बळकट व धिप्पाड, अंगावर ठिपके ठिपके, पुढल्या भागापेक्षां मागला भाग अंमळ बारीक, बारीक व लांब मुख, अयाळीचे केंश रांठ अशा लक्षणाचे असतात. हे मोठे रागीट, पराक्रमी व बळकट असे असतात.

अथ आरददेशस्थाः

(आरद (आरब) देशांतील अश्वांचीं लक्षणें.)

यांच्या पाठी लहान, मुखें सुरेख, डोळे पाणीदार, शरीरावरील केंश बारीक व मऊ, पुढली बाजू विस्तारलेली व उंच, कांतडीं मऊ, कान लहान असून शंकूच्या आकाराचे, घोट्यावर केंश असून ते थोडे उचललेले, कमरे मध्यें बळकट, तांबड्या रंगाचे अथवा शुभ्र पांढऱ्या रंगाचे अथवा पांढऱ्याच्या जवळ जवळ असणारे जे दुसरे वर्ण त्या वर्णांनीं युक्त, पुढल्या बाजूच्या पायानें सहज लीला करणारे, पायाच्या नखांनीं पाणी उडविणारे, दोन पायांमधील अंतर्भूत जागेमध्यें पाय आपटून क्रीडा करणारे, मोठ्या वेगाचे व मोठ्या बळाचे. या प्रकारचे घोडे आरदज कुळापैकीं जाणावे.

तेषामुपकुलेजाताःचांपेयाः

(उपकुलज चांपेय यांचीं लक्षणें.)

पाठ लहान, ज्याचे कित्येक इंद्रियाच्या ठिकाणीं विवक्षित सुगंध येतो. पाय लहान, मांड्या हरिणा सारख्या, शरीरावरील प्रत्येक अवयव मांसल, शरीरावरील केंश तुळतुळीत व बारीक, या लक्षणांनीं युक्त आणि तेजस्वी ,दमदार, बळकट असे असतात.

अथ सैंधव देशस्थः

(सैंधव देशांतील अश्वांचीं लक्षणें.)

यांचे पाय स्थिर, यांच्या मांड्या सडसडीत, डोळे टपोर, मान लांब, अयाळ बारीक केंसाची, शरीरें मोठीं, कांतडीं मऊ, खालचा ओंठ बारीक, प्रोथ प्रदेश मोठा, घोडीच्या पोटा प्रमाणें पोट, मेहन आणि वृषण हीं लंबायमान, शेंपूट वांकडें, पृष्ठ आणि मुख असावीं तशीं लांब आणि विस्तृत, कुलवान, शीलवान, बळवान, दमदार, शिकवावे त्या कामांत प्रविण असे असतात.

तेषामुपकुलस्थास्तैतिलाः

(त्यांच्या उपकुलां मधील झालेले तैतील यांचीं लक्षणें.)

मान आणि पाठीवरील आसनस्थान हीं दोन्ही स्थूल, मांड्या भरदार, डोळे विशाळ, शरीरावरील केंश व अयाळींचे केंश हे रांठ, गुदस्थानचे फल मोठें, तसेंच कपाळ व ऊर हीं विशाळ, डोकें आणि विशेषें करून तोंडाचा खालचा ओंठ हीं सदां उर्ध्व, पाय बळकट, प्रत्येक अवयव सुरेख, दमदार, बल आणि वेग इहीं करून युक्त, मंद बुद्धीचे, मार्गामध्यें कितीही ओझें अथवा क्लेश पडले तरी न जुमानणारे, तहान व भूक हीं सोसून मजल काटणारे, या प्रकारें करून लक्षणांचे असतात.

अथ मेचक लक्षणः

(मेचकांचीं लक्षणें.)

ज्यांचा संस्थान प्रदेश उत्तम, वक्षस्थळ विशाळ, शंकु सारखे कान, खालचा ओंठ लहान, मदानें धुंद झालेले डोळे, लांब रुंद व मऊ कांतडीची अशी मान, जत्रु प्रदेश (मान आणि स्कंद यांच्या मधील भाग ज्यास वह असें ह्मणतात) वर आलेला, शरीराचा झोंक वाटोळा, आसन प्रदेश विस्तृत, मांड्या आणि जंघा लहा-

न व वाटोळ्या, कुक्षि प्रदेशाचीं हाडें लहान लहान, कमर बारीक, पोट सडपातळ, सर्व शरीरावर रोम ह्मणजे बारीक केंश, स्वभावानें फार क्रूर नव्हेत आणि मृदुही नव्हेत. नाना प्रकारचे रंगाचे विशेषें करून पाटल पुष्पा प्रमाणें रंगाचे, मार्ग चालणें, भार वहाणें, शौर्य, तेज, बल, वेग इत्यादि सर्व गोष्टींत मध्यम प्रतीचे असतात.

अथोपमेचकाः

(उपमेचकांचीं लक्षणें.)

शरीरानें लहान, शेंपटाचे आणि अयाळीचे केंश रांठ, कांतडीं मऊ, मान सदां उंचावलेली, यांचे खूर दुर्बळ, तोंडाची आकृती चांगली नाहीं, उरस्थळ अगदीं लहान, नेत्र विरुप, हीं लक्षणें उपमेचकांचीं होत.

अथ कुलजाः

(कुलजांचीं लक्षणें.)

पाठी लांबरुंद, गुदस्थानचें फल लहान, मान वाटोळी, मुख सदां खालीं, कंबर बारीक, शेंपटाचे केंश लांब, अयाळीचे केंश बारीक, उर लहान अशा लक्षणाचे अश्व कुलजजातीचे होत.

उपकुलजाः

(उपकुलजांचीं लक्षणें.)

शरीरानें लहान, मान, मांड्या, कुक्षि हीं लहान; शेंपटाचे केंश लांब, व क्रूर स्वभावाचे परंतु पराक्रम फार थोडा, तेजोहीन, मंद बुद्धीचे, अल्प बलाचे, बाकी सर्व लक्षणें कुलजजातीचीं.

तदनुस्था त्रिगर्ताः

(त्रिगर्तांचीं लक्षणें.)

मान बारीक, उर विस्तृत, शेंपटाचे केंश व अयाळ यांचे केंश, रुक्ष, पायाचे खूर बळकट, क्रोड (उरा खालचा भाग), तोंड व

केंश मऊ हीं सर्व सशा सारखीं असतात. प्रायः गर्दभा सारखा रंग, बळवान् असून क्रूर नसणारे, रागीट असून कमी पराक्रमी असे असतात.

आर्जुनेयाः

(अर्जुनेयांचीं लक्षणें.)

ऊर विस्तृत, डोळे मोठे, अयाळीचे केंश रांठ, कुत्र्यासारखीं तोंडें, गुद स्थानचें फल मोठें, खांदे उंच, मान मऊ, काळा अथवा त्याजवळचा रंग ज्यास प्रायशः असतो, स्वभावानें कांहींसे क्रूर असे असणारे घोडे आर्जुनेय होत.

सावित्रेयः

(सावित्रे यांचीं लक्षणें.)

सावित्रेय जातीच्या अश्वांचीं लक्षणें अशीं आहेत कीं, त्यांच्या पाठी लहान, मांड्या विस्तीर्ण, शेंपूट आणि अयाळ यांचे केंश रांठ, खूर बळकट, शरीर मांसल, सर्व शरीराला सुगंध येतो, शरीर मऊ, डोळे मोठे, पाय लांब, कटि प्रदेश लांब, शरीरानें धिप्पाड, शूर अशीं असतात.

अथ योधेयाः

(योधेयांचीं लक्षणें.)

कान लहान, खालचा ओंठ लहान, अंगलोट वाटोळा व विस्तृत असा, मान खालीं, कमर, मांडी, आणि कुक्षि हीं वाटोळीं, शेंपटाचे केंश लांब, कांहींसा पिंगट, मुख लांब, ऊर विस्तृत, कांतडीं मऊ, सूक्ष्म केंश, मजल काटणारे, भार वहाणारे, आणखीं त्यांचीं लक्षणें सांगतों. त्यांचीं ललाटें विस्तृत, नेत्र मोठमोठाले असे असतात. सुंदर मुखें लंबायमान, ऊर अरुंद, कांतडीं मऊ, केंश बारीक, शंकूसारखे कान, चाल जलदीची, यांच्या पाठी लांब, रुंद मांड्या व त्या भोंवताळचा प्रदेश हा मांसल, यांचे खूर एकमेकांना लागलेले,

प्रत्येक कामीं स्थिर, स्वभावानें गंभीर, दमदार, बलवान्, तेजस्वी, शरीरें धिप्पाड; ज्यांचें दर्शन झालें असतां तत्क्षणींच आनंद व्हावा असे असतात.

यावनाश्वः

(यावनांचीं लक्षणें.)

पुढले दोन पाय किंचित् लांब असून शरीराची घडण लहान, शरीर वाटोळें, सर्व अवयव पूर्ण, स्पष्ट, सडसडीत, केंश व रोम (शरीरावरील केंश) हे बारीक नरम, वर्णानें, तेजानें, बलानें श्रेष्ठ, स्वभाव थोडा कर्कश, खेळकर, धन्यावर प्रीति करणारे असे असतात.

तुषाराः

(तुषारांचीं लक्षणें.)

शरीरावरील केंश रुक्ष असतात. मजल करणारे असून ओझें पुष्कळ घेणारे, मधुर शब्द करणारे, बळकट खुराचे, आरंभिलेलें काम तडीस नेणारे, तेज, बळ, इहीं करून युक्त या प्रकारचे लक्षणाचे व दुसऱ्याही कांहीं किरकोळ भेदांनीं युक्त असे तुषार अश्व असतात.

विषमेयाः

(विषमांचीं लक्षणें.)

कुक्षिप्रदेश लहान, शरीर वाटोळें, डोकें व मान सदां वर उचललेली, पोट सडसडीत, पाठीवर भोंवरे, उरस्थळें विस्तृत, चाल जलदीची, शरीरावरील केंश बारीक, प्रायः पांढऱ्या रंगाचे, असे असले ह्मणजे विषमेय अश्व समजावे.

कादंबरेयाः

(कादंबरांचीं लक्षणें.)

आंगलोट सुरेख, पाय बळकट, कुक्षिप्रदेश उत्तम, कांतडीं जाड,

रोम बारीक व नरम रेपूट व मानेवरील अयाळ यांचे केश रांठ, ज्यास कधीं कोप येत नाहीं, सुशील असे कादंबेरेय अश्व जाणावे.

वार्ष्मतेयाः

(वार्ष्मतेयांचीं लक्षणें.)

मनुष्या सारखी मान, शरीर लहान, कुक्षिप्रदेशीं उत्तम, शरीराचा मागला भाग सर्वत्र सारखा, पुढला भाग अढळ, पोट सडसडीत, पाठ लहान, शीलवान् व बलवान या प्रकारचे वार्ष्मतेय अश्व जाणावे.

आवंत्याः

(आवत्यांचीं लक्षणें.)

शरीरें स्थूळ, कुक्षिप्रदेश बळकट, पोट सडसडीत, पाठ रुंद व लांब, ऊरस्थळ विशाळ, बहुतकरून तांबडा व त्याजवळचा रंग यानें युक्त असे अश्व अवंतिदेशीय जाणावे.

ऋथेयाः

(ऋथेयांचीं लक्षणें.)

जंघा व उरू मोटमोठ्या, मऊ तुळतुळीत केश, पाठ बळकट, रंग पांढरा अथवा त्याजवळचा, ऊर विशाळ, या लक्षणांनीं युक्त अश्व ऋथदेशांतील जाणावे.

काश्मीरकाः

(काश्मीरांचीं लक्षणें.)

शरीरें धिप्पाड, तेजस्वी, प्रत्येक अवयव सुरेख, सुंदर आणि विस्तृत कपाळ, जलदी चालणोर, कांतडीं मऊ, रोम नरम, पाठ रुंद, मुखें लांब, बलिष्ट, स्वभावानें क्रूर, शरीराची घडण बळकट, तांबडा किंवा त्याजवळचा रंग, अशा लक्षणांचे अश्व काश्मीरक जाणावे.

सकानकाः

(सकानकांचीं लक्षणें.)

सकानक या नांवाची एक नदी आहे त्या ठिकाणीं होणारे घोड्यांस हें नांव आहे. या घोड्यांचा पुढला भाग उंच असून मागला भाग सखल असतो. त्यांची मान मृदु, अरुंद, लांब, शेपटाचे केंश हे लांब, दांत तीक्ष्ण, धुराप्रमाणें डोळे, घोडा अथवा घोडी पाहिली असतां खिखाळून त्यावर चालून जातात. शंकुसारखे कान, मुख लांब, पार्श्वे आणि उदर हीं लंबायमान, शंख (गल्लप्रदेश) व तलपार्ष्णि प्रदेश हे रोम युक्त, गात्रें उत्सत, जघन भाग मोठे अशा प्रकारचे असतात.

पार्वतीयः

(पार्वतियांचीं लक्षणें.)

बारीक मान, जघन आणि वक्षस्थळें हीं मोठीं, गात्रें आणि पृष्ट भाग हीं लंबायमान, शेंपूट आणि मान यांचे केश लांब, पाय बळकट, वेगानें जबर, बलवान्, याप्रकारचे पार्वतीय जात्युत्पन्न अश्व जाणावे.

अनुपोत्तर माद्रेयाः

(अनुपोत्तरांचीं लक्षणें.)

शेंपूट आणि मान यांवरचे केंश रांठ, खुर बळकट, मान जाडी, कान लांब, मजल लांब करणारे, परंतु ते कोणच्याही जरूरीच्या कामाला लावण्या इतके प्रमाणिक नाहींत, कारण ते शिलवान् नव्हेत. त्यांस धरण्यास कठीण पडतें. शिवाय त्यांस खुष करणें हींही गोष्ट कठीणच होय. ते रंगानें पिंगट, शुभ्र पांढरे अथवा त्याजवळच्या रंगाचे असे असतात.

दक्षिणमद्र देशांतील अश्वांचे स्वभाव वगैरे सर्व याप्रमाणेंच आहेत. विशेष इतकें आहे कीं, हे थोडे रागीट व आळशी असतात.

अंतर्द्विपेयाः

(अंतर्द्विपांचीं लक्षणें.)

इरावति, विपाशा (रावी), सतद्रु (सतलज), चंद्रभागा, इतक्या नद्यांच्या तीरावर व आंतील बेटावर होणारे अश्वांस अंतर्द्विपेय अश्व ह्मणतात.

सरस्वतीच्या जवळचे अंतर्द्वीपेय जातीचे जे आश्व आहेत त्यांचीं लक्षणें अशीं आहेत कीं, यांच्या पाठी लांबरुंद, मान लांब, शुभकारक व्यंजन (डाग) शरिरावर असणें, उत्तम शिलवान अशा प्रकारचे असतात.

कैकेयः

(कैकेयांचीं लक्षणें.)

हे शरीरानें उंच, वरचा ओंठ व एकंदरीनें तोंडही लांब, मान लांब, श्वास बहुत, शेंपूट आणि अयाळ हीं लांब, रस्त्यामध्यें बहुत मजल करणारे, बहुत शब्द करणारे, पाय बळकट असून बाकी सर्व लक्षणें यवन अश्वासारखीं असलीं ह्मणजे ते कैकेयक जातीचे अश्व जाणावे.

अंबष्टकाः

(अंबष्टक अश्वांचीं लक्षणें)

खांदे उंच, मान वाटोळी, मुख प्रदेश किंचित वक्र, रंग थोडा पांढरा, शरीरें उंच, वक्षस्थळ विशाळ, कान व मेहन (गुद) हीं लांब, आस्कंद मोठा, कुर्चे, मांड्या आणि कुक्षि हे प्रदेश विस्तृत या प्रकारचे घोडे आंबष्टक जातीचे जाणावे.

वासंतकाः

(वासंतक अश्वांचीं लक्षणें.)

मान लांब, हरिणा सारखें पोट, पाठ लहान, कान आणि मेहन हीं लहान, पाय बळकट, कुक्षि प्रदेश उंच व विस्तृत, ऊर आणि मां·

ज्या यांमध्यें बळकटी, स्वभाव क्रुर, या प्रकारचे वासंतक अश्व जाणावे.

शिवीरकाः

(शिबिरक अश्वांचीं लक्षणें.)

पाठ लहान, इंद्रियें बळकट, उड्डाणयुक्त गति, दोन पायांमधील अंतरांत क्रिडा करणारे, हुकूमांत वागणारे, प्रत्येक अवयव पूर्ण अशा प्रकारचे घोडे सौवीरक जातीचे जाणावे. शिवाय त्यांचीं लक्षणें अशीं आहेत कीं, मांड्या लहान, कुर्च प्रदेश लहान, बुद्धि थोडी, पोट, डोकें, खांदे हीं मोठीं आणि प्रसंगीं मोठा पराक्रम करणारे, बलवान, वेगवान उंच असे असतात.

दरदाः

(दरद अश्वांचीं लक्षणें.)

डोळे लहान, पुच्छ व पाठ हीं लहान, बाकी सर्व लक्षणें सौवीरक अश्वांप्रमाणें जाणावीं.

सैंधवाः

(सैंधव अश्वांचीं लक्षणें.)

केंश व शरीरावरील रोम हीं रांठ, कांतडीं जाड, खांदे, मांड्या हीं मोठीं, श्वास पुष्कळ, कुक्षि व पोटऱ्या हीं स्थूल, शरीरें धिप्पाड, भव्य, शूर, बलवान असे सैंधव अश्व होत.

क्षुद्रकाख्याः

(क्षुद्रक अश्वांचीं लक्षणें.)

खूर बळकट असून मोठे, कान आणि मेंढू हीं दीर्घ, मांड्या भरदार असून विस्तृत, शरीराचा आंगलोट विस्तृत व वाटोळा, सुरेख, कुशळ, तेज, बळ, वेग इहीं करून युक्त असे क्षुद्रक अश्व जाणावे.

मालवाः

(मालव अश्वांचीं लक्षणें.)

यांच्या मांड्या विस्तृत, पुढली बाजू उचललेली, ओंठ लांब, कान लांब, मान आंखुड असून उंच, सुंदर व तेजस्वी असे हे अश्व असतात.

ऐरावताः

(ऐरावत अश्वांचीं लक्षणें.)

यांचे अस्थि आणि मांस हीं स्थूल असतात. कान रुक्ष, वेगहीन, बुद्धिहीन असे ऐरावत अश्व जाणावे.

अवंत्यकाः

(अवंत्यक अश्वांचीं लक्षणें.)

कान लांब, जघन आणि ऊर व मान यांचा आकार मोठा, मानेवर ठिपके, मुख वांकडें, मागला भाग बारीक, शरीरावर ठिपके लहान लहान, केंश लांब, तळवे मृदु, बळानें आणि वेगानें मध्यम, बहुशः मृदु शरीराचे, नानाप्रकारचे रंगाचे, स्वभावानें स्थिर, सुशील, कोणच्याही स्थितींत सुख मानणारे असे अवंत्यक अश्व जाणावे.

कालिंगकाः

(कालिंगक अश्वांचीं लक्षणें.)

कान लांब, पाय स्थूल, खुर बळकट, मागला भाग पुढल्या भागाशीं विषम, पाठीवरील हाड उंच असल्यानें कुब्ज दिसणारे, शरीरें लांबरुंद, मान दंडाप्रमाणें सरळ, तोंड वांकडें, मेहन (गुद) लांब, तेज आणि बळ यांनीं हीन असे कालिंगक अश्व जाणावे.

मौकुलाः

(मौकुल अश्वांचीं लक्षणें.)

केंश रांठ, पाठ व जघन प्रदेश हीं लहान, साधारण सर्व अवयव

लहान, कुक्षि व पोटऱ्या हीं स्थूल, आसन प्रदेश विस्तृत, त्यांस उत्साह नसून बल आणि तेज यांहीं करून हे कमीच असतात, तरी ते तापट, व बुद्धिहीन असतात.

वानवासिकाः

(वानवासिक अश्वांचीं लक्षणें.)

दक्षिणेकडील प्रांतांत जीं अरण्यें आहेत त्यांमध्यें एका प्रकारच्या घोड्याची जात आहे, तिचीं लक्षणें सांगतों:—

पृष्ट, मांड्या आणि जघन हीं लहान, पुढली बाजू संहत ह्मणजे जुळून आलेली असून मागची बाजू त्याप्रमाणें नसते. पाय बळकट, थोड्या आयुष्याचे, दम, तेज, वेग यांहीं करून युक्त, शांत स्वभावाचे असे ते असतात.

वैशिमाः (तैलिंगाः)

(वैशिम अश्वांचीं लक्षणें.)

हे अश्व तैलंगण देशामध्यें होतात. यांचे खांदे व ऊर हीं विशाळ असून रागीट व क्रुर कर्म करणारे असे असतात.

ऋथनाः

(ऋथन अश्वांचीं लक्षणें.)

कान लांब, मांड्या मोठ्या, जघन प्रदेश विस्तृत, सर्व शरीराचे अवयव उचललेले परंतु मागला भाग नीच असतो. पुष्ट, लांब, कुक्षिप्रदेश मोठा, रंग अगदीं भिकार, तेज हीन, गात्रें मंद, अशा प्रकारचे अश्व ऋथन कुळांतील होत.

उपावृत्तकाः

(उपावृत्तक अश्वांचीं लक्षणें.)

पुच्छ लांब, कुक्षि प्रदेश मोठा, कान लांब, खांद्यावर ठिपके, वृष-

ण, मेहन आणि सृक्क (वरचा ओंठ) हीं लांब, पाठ रुंद असून वरील हाड उंच, बहुत करून पिंगट रंगाचे असे अश्व उपावृत्तक जाणावे.

सौराष्ट्राः

(सौराष्ट्र अश्वांचीं लक्षणें.)

यांचे पाय स्थूल, बळकट आणि रोमयुक्त, पार्ष्णि दीर्घ आणि विस्तीर्ण, मागला भाग उंच, पोटऱ्या, मांड्या आणि कुक्षी हे अवयव स्थूल या प्रकारचे अश्व सौराष्ट्र कुळांतील होत.

साल्वेयाः

(साल्वेय अश्वांचीं लक्षणें.)

यांचे अवयव मंद, कुक्षि लहान, लांब, बारीक आणि मृदु अशीं मान, कान लांब, ऊर विस्तृत, मागल्या दोन पायांनीं विशेष उड्डाण करणारे, रुक्ष, बारीक, असे केंश (शेपूट व अयाळ यांचे), स्वभावानें रागीट असे हे अश्व जाणावे.

कुरुक्षेत्रजाः

(कुरुक्षेत्रज अश्वांचीं लक्षणें.)

शरीराचा पुढील भाग विस्तृत, खांदे उंच व पाठ लांबरुंद, मागल्या भागामध्यें वेग विशेष, असे अश्व कुरुक्षेत्रांतील जाणावे.

पांचालाः

(पांचाल देशांतील वेसर जातीच्या अश्वांचीं लक्षणें.)

तोंडें लांब, कुक्षि मोठ्या, विस्तृत व लवलेली पाठ, गात्रें मृदु, पाय सुरेख पण त्यांत पुढले दोन पाय बळकट, तेजोहीन, आरोहण करण्यास कठीण असे हे अश्व जाणावे.

ओठजाः

(ओठज जांगलाश्रीत अश्वांचीं लक्षणें.)

सर्व शरिर स्थूल, पाठ लांब, पोट लहान, ओंठ व कान हे

लांब, डोके व त्यांत तोंडें हीं मोठीं मांसल. सर्व शरीरावर मांस जमलेलें, केवळ भार वहाण्यास योग्य, शरीरावरील केंश बळकट, वेग अगदीं मंद असे हे अश्व जाणावे.

अभिसाराः

(अभिसार अश्वांचीं लक्षणें.)

यांचे पुढले दोन पाय स्थूल, बाकी सर्व शरीर लहान असून यांचे कान उभे असतात. हे बहुत व्रात्य असल्याकारणानें त्यांना शिकविण्यास व ताब्यांत ठेवण्यास कठीण पडतें, परंतु हे शिकले तर चांगले वेगवान होतात याकरितां त्यांचा उपयोग चांगला विशेष होईल.

काचकाः

(काचक अश्वांचीं लक्षणें.)

शरीरावरील केंश बारीक, मेहन लहान, पाठ लहान, मान बारीक, मेंढ्र प्रदेशाचें (गुदस्थानचें) फल लहान, पाय स्थिर (मंदगती), तेजहीन, दम थोडा, सारख्या रूपरंगाचे, खिखाळणारे असे हे काचक अश्व होत.

ऱ्हस्व कौशलाः

(ऱ्हस्व कौशल अश्वांचीं लक्षणें.)

यांचे अवयव लहान, चतुर, शरीराचा विस्तार लहान, गति मंद, अशा प्रकारचे अश्व ऱ्हस्व कौशल जाणावे.

कुकुसः

(कित्येक अश्व जातीच्या अभिसारापासून झालेले कुकुस या नांवाच्या जातीचें कुळ आहे त्याचें लक्षण.)

ऱ्हस्व कौशल्य जातीचे अश्व याच लक्षणाचे जाणावे.

हिमवत्युत्तराः

(हिमवत्युत्तर अश्वांचीं लक्षणें.)

शरीराची उंची विशेष, कुक्षि लहान, पाय स्थूळ, शीर मोठें, पुढली बाजू जमून आलेली असून मागली बाजू तशी नसते, पायांचे खूर बळकट, वेगवान या लक्षणाचे ते अश्व जाणावे.

घोटकाः

(घोटक अश्वांचीं लक्षणें.)

आतां घोटकाचीं कुळें ९ आहेत ह्मणून सांगितलें तीं लक्षणांसह येथें सांगतों:—

१. नेत्र मोठे व पाणीदार, मुष्क (वृषण) लहान, पाय बळकट, कुरु आणि अश्मार्क देशांत होणारे असतात.

२. डोळे मोठे, मान व डोकें यांमधील संधि (स्नायु) स्थूल, सद्गुणसंपन्न असे मंतावक जाणावे.

३. वरील लक्षणाचे चकोरक अश्व जाणावे. विशेष इतकाच कीं, यांचे कान आंखूड व शेंपूट लांब असतें.

४. चकोरकामध्यें व श्वेतशैलजामध्यें विशेष फरक नाहीं, परंतु श्वेतशैलज हे काळ्या किंवा त्या जवळच्या एखाद्या रंगाचे अश्व असतात.

५. वैदर्भिक हे सुरेख, चंचळ व उत्साहवंत असे असतात.

६. पूर्व हैमेय, दक्षिण हैमेय आणि साम्येयक या तिन्ही जाती सारख्या आहेत. त्यांचीं लक्षणें हींच कीं, ते तापट, वेगवान व दमदार असे असतात.

९. सामिचकांचीं लक्षणें अशीं आहेत कीं, इतरापेक्षां हे थोडे उंच असून यांचें कूर्च उंच व वर्तुळ, डोळे मोठमोठे, कुक्षि उचललेल्या असतात. हे नाना प्रकारच्या वर्णाचे असतात.

या प्रकारच्या १४ कुळांचे अश्व सांगून उत्तम, मध्यम व कनिष्ट कोणते याचा निर्णय येथेंच सांगतों:—

कांबोज इत्यादि कुळें व सर्व उपकुळें हीं श्रेष्ठ.

अपरकुळें व अंतस्थकुळें हीं मध्यम.

शेष राहिलेलीं सर्व कुळें कनिष्ट होत.

याप्रमाणें मुख्य कुळें ४, उपकुळें ४ आणि उपकुळांची पोटकुळें १४ यांचीं लक्षणें सांगितलीं. आतां याशिवाय आणखी जीं उपकुळें आहेत त्यांचीं लक्षणें सांगतों:—

मागधाः

(मागध अश्वांचीं लक्षणें.)

रोम बारीक, कुक्षि लहान, शरीर निर्मांस, आहार थोडा, अल्पायुषी, निरुत्साह, तेजहीन परंतु दमदार, ओंठ व कान हे लांब, हीं लक्षणें मागधांचीं आहेत.

अर्धमागधः

(अर्धमागध अश्वांचीं लक्षणें.)

हिमालयाच्या आसपास दक्षिणेकडे, मगध देशाच्या पूर्वेस व पश्चिमेस होणारे ज्यांची पुढली व मागली बाजू अगदीं हीन ह्मणजे बेढब, शरीरें लहान, मुखें लहान, बहुत करून पिंगट रंगाचे, हे बलहीन, शिक्षण लवकर न घेणारे, सदां सर्वदां क्षुधित व तान्हेले, भार वहाण्याच्या व साधारण कामाच्या उपयोगी असे हे अश्व जाणावे.

चोटकाः

(चोटक अश्वांचीं लक्षणें.)

शरीरानें लहान, तेजोहीन, जरूरीच्या व वजनदारीच्या कामास योग्य, कुदीनें व चालीनें मंद असे हे जाणावे.

अनेक देशांतल्या उत्पत्तीमुळें कुळांचा भेद.

ज्या देशांत जो घोडा जन्मला त्या देशाचें नांव व गुण त्या घोड्यास प्राप्त होतात. जसें—शिंदी, काठेवाडी, आरबी, काबली, भिवरथडी अथवा दक्षणी, पहाडणी, पेगू, मारवाडी, कच्छी, माळवी इत्यादि.

१. शिंदी घोड्याचें नाक मेंढराचे नाका सारखें उंच आकृतीचें असून तो देश रेतीचा असल्या कारणानें चाल कांहीं प्रकारें रेतींत चालण्याप्रमाणें असते. ही जात काठेवाडी घोडीपासून उत्पन्न आहे ह्मणून जितक्या जाती काठेवाडींत आहेत तितक्या शिंदींत असतात.

२. काठेवाडी घोडे कडक, शरीरानें पातळ व देखणे असतात. यांत दुसऱ्या जाती बहुत आहेत. जसें—१ फुलमाळिया. २ माणिक्या. ३ बोरिया. ४ ताजणिया. ५ केशऱ्या. ६ भुतडीया. ७ रेडिया. ८ मलिया. ९ बोदलिया. १० लखिया. ११ कशिया. १२ शिंगाळिया. १३ वांदरिया. १४ चवरढाळ. १५ जखमिया. १६ हरणिया. १७ मारूया. १८ ढोलर. १९ रेशमिया. २० लखमिया. २१ वागळिया. २२ बेगडीया. २३ चटपंख्या. २४ नागफण्या. २५ बहेरिया. २६ सारटिया. २७ रिमीया. २८ बोजळिया. २९ चिंतामणी. ३० अगरिया. ३१ परवाळिया. ३२ मोरध्वज. ३३ पारखमणि. ३४ पटैया. ३५ पोपट. ३६ छलबल. ३७ तोखरिया. ३८ साखळिया. ३९ कावर. ४० धुमटि. ४१ कालडि. ४२ बचनाग. ४३ कागडीया. ४४ पंखळिया. ४५ हसळिया. ४६ मणिया. ४७ आखडिया. ४८ रामपहा. ४९ पारवेयु. ५० काळिभार. ५१ शिनया. ५२ चांग्या. ५३ पुतळिया. ५४ उतावळिया. ५५ तेजा. ५६ विछपिया. ५७ खखारिया. ५८ सोंसळीया. ५९ दावलिया. ६० कोहाल. ६१ वडियुथा. ६२ लालपा. ६३

रुपाळिया. ६४ माळिया. ६५ मळिया. ६६ हरडिया. ६७ मीरा-ळिया. ६८ टिळाळिया. ६९ माकडा. ७० बाजळिया. ७१ छप-रिया. ७२ खोटिया. ७३ हिराळा. ७४ बलियुया. व ७५ माछ-ळिया, इतक्या जातीचे घोडे हल्लीं या देशांत उत्पन्न होतात.

३. अरबी घोडा पातळ अंगी असून कानांत ताठा नसतो. तो चालते वेळीं दांडी उचलतो व मेळ्यांत राहतो (दुसरे घोड्यांबरोबर दांडगाई करीत नाहीं). हा घोडा गरीब असून शाहाणा असतो, व पाहिजे तें काम शिकतो. इंग्रज लोक बहुतकरून या घोड्यास पसंत करतात. अरबी घोड्यास कानामागें डाग दिलेला असतो.

४. काबली घोडा मोठा असून सुंभाचा मजबूत आणि दांड असतो.

अश्वकुळांचे गुण.

घोड्यावरील स्वार पडला असतां बहुधा घोडा उभा राहतो आ-णि घोडीवरील स्वार पडला असतां ती पळून जाते, इत्यादि शालि होत्रांत अनेक प्रकारचे गुण सांगितले आहेत. जो घोडा ठाणांत सामायन ठेवलें ह्मणजे उल्हासें करून पुढचा उजवा पाय उचलतो व सामायन ठेऊन बाहेर आणिला ह्मणजे खासदाराचे हातांत कलोल करून स्वार बसूं लागला ह्मणजे स्थिर उभा राहून त्यास स्वस्थतेनें बसूं देतो. नंतर स्वारानें अनिन हातांत घेतली ह्मणजे तो हुषार हो-ऊन इशाऱ्याची वाट पहातो, आणि सर्व कामांत स्वाराचे मर्जी प्रमाणें वागतो; व बहुत फिरवून दमला असतां कांहीं वेळ टेहळा-विल्यावर लागलेंच कलोल करूं लागतो तो उत्तम कुळांतील घोडा जाणावा. जो घोडा सामान ठेवून अश्वशाळे बाहेर आणिल्यावर क-लोल करून स्वार बसते वेळीं कांहीं तेजी करतो, फिरविला ह्मणजे चांगला फिरतो व स्वारानें एड मारली तर फारच उत्सुक होतो तो चांगल्या कुळांतील स्वाभावीक गुणांचा आहे असें समजावें.

विशेष सूचना—मणक्या हा घोडा रूपवान असतो. ताग़णिया हा घोडा बसत नाहीं, कदाचित झोंप घेणें झाल्यास तो उभ्यानेंच घेतो. ह्या जातीच्या घोडीस पसवते वेळीं बकरूं खाण्यास घावें लागतें, नाहीं तर ती आपलें शिंगरूं खाते. भुताडिया ह्यास घुवून स्वच्छ न ठेवल्यास भुतासारखें करतो. शिंगाळिया ह्या घोड्याला शिंगासारखी खूण असते. चवरढाल हा घोडा दांडी उभी करून चवरीसारखी पसरतो.

घोड्याचें शारीर.

घोड्याच्या शरीराचे विभाग ह्मणजे ज्यास संस्कृतांत क्षेत्र अशी संज्ञा आहे ते येणें प्रमाणें:—

१ मुख. २ कपाळ व मस्तक. ३ मानेपासून खांद्यापर्यंत. ४ कंठ, ऊर, गुडघे, वसवंड आणि काकस. ५ आसन. ६ कटी. ७ स्फिक. ८ फलक. ९ जंघा आणि कूर्च संधी.

स्थानकोश.

अश्वाचे अवयवांचें ज्ञान होण्याकरितां संस्कृत भाषेत जीं नांवें सांगितलीं आहेत तीं समजण्याकरितां प्राकृत भाषेंत सांगतों. हीं स्थानें कळल्यावांचून या ग्रंथांत जे शब्द येतील त्यांचीं स्थानें समजणार नाहींत व त्यांची चिकित्सा होणार नाहीं सबब हा स्थानकोश अवश्य समजला पाहिजे.

जिव्हा—ही सर्व प्रसिद्ध आहेच.

सूना—जिव्हेच्या खालचा भाग.

तालु—जिव्हेच्या वरचा भाग.

दंतपीठिका—जिव्हेच्या पुढचा भाग.

दंत—दंत पिठिकेच्या वरचे व खालचे दांत.

चिबुक—दंताचा खालचा भाग.

अधरोष्ठ—(खालचा ओंठ) चिबुकाच्या वरचा भाग.

हनुवटी—चिबुकाच्या उजवेकडचा व डावेकडचा भाग.

सृक्किणी—तोंडाचीं दोन्हीं शेवटें.

प्रपाण—वरचा ओंठ.

प्रोथ—ओंठावरील भाग.

नाकपुड्या—प्रोथाच्या डावेकडे व उजवेकडे जे भाग असतात ते.

घोणा—दोन्ही नाकपुड्याच्या मधला भाग.

गंडस्थळें—घोण्याच्या उजव्या व डाव्या बाजूचे भाग.

अश्रुपात—नेत्राच्या खालचा भाग.

अपांग—डोळ्याचा जो भाग कानाकडे गेलेला असतो तो.

कनिनिका—नाकाच्या समोरचा डोळ्याचा भाग.

प्रच्छादन—डोळ्यामध्यें काळें व पांढरें जें मंडळ (वर्तूळ असतें तें.

अक्षिकूट—डोळ्याच्या पुढील चर्मभाग.

कपाळ—अक्षिकूटावरची जी केशाची रेषा असते तिजपासून पुढचा भाग.

केशांत—कपाळाच्या वरचा भाग.

भ्रुव—केशांताचा पुढचा भाग.

शिर—भ्रुवाचा वरचा प्रदेश.

कान—शिराचा पार्श्व भाग.

शकुंतल—कानाचें मूळ.

शंख—अपांगापासून दोन अंगुळें प्रदेश.

कटाक्ष—शंख व कर्ण ह्यांमधील अंतर.

बिंदु—कानाच्या खालीं सहा अंगुळावर जो भाग असतो तो व कानाचा पृष्ठभाग.

निगाल—घंटाबंधाच्या समोरचा भाग.

गल (गळा)—निगालाच्या खालचा प्रदेश.

कंठ—गळ्यापासून खालचा भाग.

ग्रीवा—मान.

केसर— मानेवरील केंश (आयाळ).

वह— मान व खांदा यांमधील अंतर तें.

जत्रु (गर्दन)—वहाच्या वरचा भाग.

मान—आयाळ याच्या अंतप्रदेशापर्यंत.

मान व आयाळ—स्कंध व पाठ यांचे मधील भाग.

ककुद—जत्रू (गर्दन) जवळ जें हाड असतें तें.

पृष्ठ (पाठ)—ककुदा पुढील भाग.

आसन—पाठीच्या मध्य भागाची जागा.

स्कंध (खांदा.)—ककुदाशीं जोडलेले भाग.

बाहु—स्कंदाच्या खालचा प्रदेश.

धिष्ण्य—स्कंध सोडून सहा अंगुळें बाहूचा जो प्रदेश तो.

गुढगे—धिष्ण्याचा खालचा भाग.

पोटऱ्या—गुढग्याच्या खालील भाग.

फलक—कंबरेचा सांधा.

क्रोड—उराच्या खालचा प्रदेश.

कुष्किका—खुरांचा मध्य भाग.

जबडा—मुखाचा खालचा व वरचा भाग.

वैसिक संधी —पोटच्याच्या बाजू.

पहिला—वैसीक संधीचा अग्र भाग (मागील भाग.)

कूर्च—खुराचा वरचा भाग.

क्षीण—खुराचा मध्य भाग.

कूर्चिका—कूर्चाच्या मागील भागाचें ठिकाण.

खुरसंधी—कूर्चिकेच्या खालचें ठिकाणं.

खूर—खुरसंधीच्या खालचें ठिकाण.

पार्ष्णि—खुराचा मागील भाग.

नखें—खुराचा पुढचा भाग.

तळ—खुराचा खालचा भाग.

क्षिरिका—खुराचें मांस.

कुक्षि—पार्श्व हृदयाच्या डावे व उजवे कडचे भाग.

नाभि—पोटाचे दोन भागाचे मध्याचें ठिकाण.

रोमराजि—नाभीपुढील भाग.

मुत्रकोश—रोमराजी पुढील भाग.

पुट (स्फिक्)—पृष्ठभागाचे ठिकाणीं कंबरेपर्यंत ज्या दोन बाजू त्या.

रंध्र (उपरंध्र)—कुक्षीचा अंतर्भाग.

पुच्छ—शेंपटीचें मूळ.

मांसल—पुच्छमूळ.

पायु (गुद)—पुच्छाचा खालचा भाग.

सिवणी—गुदाच्या पुढचा भाग.

मुष्क—अंड.

उरुसंधी—कटि संधीच्या पुढचा भाग.

मांड्या—उरुसंधीचा पुढील भाग.

मदिर—खुराचे खालील भाग.

कला—कुर्च आणि कुष्किका.

मंडूकी—खुराचा शेवटचा भाग.

जंघा (मांड्या)—ऊर, मान, डोकें आणि तोंड हे सर्व मिळून घोड्याचा पूर्व भाग.

पृष्ठदेश (पाठ)—मध्यभाग आणि कंबरेपासून खुरापर्यंत पश्चिम भाग.

प्रत्येक अवयव कसे असावे ह्याविषयीं.

जिव्हा—घोड्याची जीभ सूक्ष्म असून सरळ व लांब असावी. ती वर्णानें तांबडी असून मृदु असावी, ह्मणजे उत्तम लक्षण समजावें. कोणी ती आंखूड असावी असेंही ह्मणतात.

सूना (अश्वाच्या जिभेचा खालचा भाग)—ही पुष्ट व रक्तवर्ण असावी आणि तिचा रंग प्रफुल्लीत असून ती मृदु असावी.

तालू—घोड्याची टाळू खोल असून त्यावर सूक्ष्म रेषा असलेली अशी असावी. ती रक्तवर्ण असून आंखूडही असावी.

दंत—घोड्याचे दांत पूर्ण, दृढ, घन (दाट), स्थीर, अविकार (विकृती नाहीं असे), स्निग्ध (तेजस्वी), तीक्ष्ण आणि आंतून उंच असावे. त्यांचा रंग पांढरा किंवा मधाप्रमाणें असावा. ते विषम नसावेत.

चिबुक (दांतांच्या खालचा भाग)—हा स्थीर, थंड आणि कृश असावा. त्याची आकृती सारखी असून त्यावर केश नसावेत.

अधरोष्ठ (खालचा ओंठ) आणि प्रथाण (वरचा ओंठ)—ह्यांवर सुरकुत्या असाव्या. ह्यांची आकृती सूक्ष्म असून लांबट असावी

ती अशी कीं, दांत त्या ओंठांनीं दुरूनच झांकले जावेत. त्या ओंठांत मृदूपणा आणि पुष्टता असावी. त्यांत प्रधान ह्मणजे खालचा ओंठ तो चतुष्कोन किंवा वर्तूळ आणि सम असावा. हें उत्तम लक्षण आहे. हे आंखूड असावेत व किंचित रक्तवर्ण असावेत असेंही कोणी ह्मणतात.

प्रोथ (वरच्या ओंठाचा वरचा भाग)—तो समान, मृदु, गोल, सरळ, उंच व सुंदर असावा. त्याचा मध्यभाग उंच असून अगदीं मिळालेला असावा. तो विस्तीर्ण असल्यास उत्तम होय.

नासापुट (नाकपुड्या)—मृदु व सारख्या उंच असून त्यांतून निघणारा श्वास वर जात असावा. त्यांचा आकार वर्तूळ असून नाजूक असावा.

घोणा (नाकपुड्याच्या मधला भाग)—तो सारखा जडलेला असून सरळ असावा ह्मणजे उत्तम होय. हा उंचही असावा.

गंडस्थळ (घोणाच्या दोन्ही बाजू)—पूर्व भागीं विस्तीर्ण व छिद्ररहित असून उग्र नसावें ह्मणजे उत्तम होय.

अश्रुपात (डोळ्याच्या खालचा भाग)—तो पूर्वभागीं उंच व घट्ट अशा घोणेवर असून त्याच्या समोर मांस, शिरा व स्नायु असावेत

अक्षिकूट(नेत्राच्छादनाचें जें कातडें असतें त्याचे वरचा भाग)—हा स्थूळ (लठ्ठ) नसावा आणि विषम नसावा.

कपाळ (ललाट)—घोड्याचें कपाळ रुंद असून उंच असावें व खोल नसावें. तें मांसरहित सारखें, पुष्ट आणि वरच्या भागास विशाळ असावें, व त्यावर भोंवरा असावा. असे असलेले घोडे चांगले व धैर्यवान असतात

शिर (मस्तक)—सारखें पुष्ट व किंचित उंच व वर्तुळ असावें. तें प्रशस्त असून त्यावर दोहोंकडे दोन भोंवरे असावेत.

कान (कर्ण)—घोड्याचे कान आंखूड, सूक्ष्म, त्रिकोन, पातळ व तीक्ष्ण असावेत. त्यांची कांती चंद्रासारखी असावी. त्यांच्यावर दीर्घ केंश नसावेत. त्यांवर रेषा असाव्यात, व ते फार लांब व फार आंखूडही नसावेत.

शंख (कंठाच्या वरचा दोन अंगुळें प्रदेश)—तो अस्थि, मांस, शिरा यांनीं युक्त असावा.

बिंदु (कानाचे खालीं सहा अंगुळें परीमित जो भाग तो)—हे शिर आणि मान यांमध्यें असून परस्पर चिकटलेले आणि गोलाकार व उग्र असावेत.

निगाल (नंटाबंधनाच्या जवळचा कंठप्रदेश)—हा अगदीं मांस रहित व उंच असावा. तो मऊ, लहान आणि मांसास मिळालेला असून सुरेख असावा.

गल (गळा)—हा निर्मळ, सरळ, गोल व सारखा असून सुरेख असावा.

कंठ—वर्तुळ, सरळ, फार संलग्न झालेला समान असून विस्तीर्ण असावा.

मान—बळकट आणि लांब अशी असून अकुंचित होणारी अशी असावी.

केसर (मानेवरचे केंश)—हे अतिशय पांढरे किंवा सामान्यतः शुभ्र, मृदु, स्निग्ध, सूक्ष्म आणि लांब असे मस्तकावरचे केंश असले तर उत्तम समजावे, आणि त्यांत जटा असाव्या.

पृष्ठ (पाठ)—घोड्याची पाठ विस्तीर्ण व पुष्ट आणि मांसयुक्त असावी. ती नम्र असून कांहीं पहात बसलेल्या हंसाप्रमाणें उंच असावी ह्मणजे किंचित वांकलेली असावी, परंतु फार लांब नसावी.

स्कंध (खांदा)—हा पुष्ट, मांसांत बुडालेला व दृढ, मांसयुक्त असून स्थिर व विस्तीर्ण, बळकट असावा ह्मणजे उत्तम. त्यावर भोंवरा नसावा.

बाहू—अश्वाचे बाहू लांब, दृढ, पुष्ट व गोल असून सारखे सरळ आणि विभक्त असावेत. ह्मणजे एकमेकास न लागणारे व संधीचे टायीं अगदीं मिळालेले असून पूर्वभागीं विस्तीर्ण असावेत. ते आंखूड असावेत असेही कोणी ह्मणतात.

ककुद—घोड्याचे जत्रु (गर्दनाजवळचें हाड) सारखें असून घट्ट व पुष्ट असावें.

जानू (गुडघे)—सारखे वर्तुळ, उंच, सरळ, मांसरहित, स्थिर, घट्ट व बळकट असावेत. ते आकारानें सुरेख व मांसांत अगदीं बुडालेले असावेत.

जंघा—वर्तुळ, लांब, मांसरहित, सरळ, घट्ट आणि स्नायु (शिरा) यांणीं युक्त असाव्यात. ह्या एकमेकाशीं सुटून भिन्न भिन्न असाव्यात. त्या काळ्या नसाव्यात. व चक्रहीन असून आंखूडही असाव्यात.

क्षीरिका (खुर संबंधी मांस)—हें सर्व ठिकाणीं सारखें असावें.

मंडूकी (खुराच्या खालीं तळ संधीचा मध्यभाग)—ही अगदीं खुर संधींत बुडालेली असून आंखूड असावी ह्मणजे उत्तम होय.

नाभि—घोड्याची नाभि वर्तुळ व खोल असून स्निग्ध असावी.

सृक्किणि (मुखाचे दक्षिणोत्तर भाग)—हे मोठे, निर्मळ व मृदु असून त्यांजवर केश अगदीं नसावेत.

स्फिक् (कंबरेच्या मागचा भाग)—तो गोल घट्ट व सारखा असून एकमेकांस मिळालेला असावा.

पुच्छ—आंखूड नसावें. तें वर्तुळाकार असून उंच असावें. क्रमानें वृद्धिंगत झालेलें व ज्यांतील केंश लांब असें असावें. त्यावरील केंश वरचेवर वाढणारे असे असावे, आणि मृदु, चकचकीत व स्निग्ध असावें.

पायु (गुद)—हें सरळ, खोल व मोठें वर्तुळ असून अच्छादित असावें. तें अगदीं मिळालेलें असून नेहमीं सारखें असावें, व आंखूडही असावें.

मांड्या—प्रशस्त आकृतीच्या वर्तुळ, आंखूड आणि सुस्थिर असाव्यात, परंतु फार स्थूल नसाव्यात आणि त्यांचे सांधे गुप्त असावेत. त्या एकमेकांस मिळालेल्या व वर पुष्ट असाव्यात व काळ्या नसाव्यात.

कुष्किका (खुराचा मध्यभाग)—ही सारखी, वर्तुळ, आंखूड, स्थिर आणि किंचित उच्च असून तिजवरील शिरा गुप्त असाव्यात.

फलक (कंबरेचे सांधे)—उंच व पुष्ट असून सुरेख असावेत.

अंस (ककुदाचे पार्श्व भाग)—हे विस्तीर्ण, पुष्ट, सारखे आणि त्यांचे सांधे मिळालेले असून सम असावेत.

ऊर—हा विस्तीर्ण, रुंद, उथळ, मोठें व स्थिर असून पुष्ट असलेला उत्तम होय.

क्रोड (खुराच्या खालचा भाग)—तो पुष्ट, वर्तुळ व घट्ट असून सारखा असावा.

पार्श्व (दक्षिणोत्तर खुराचा भाग)—हे लांब, च्छिद्ररहित, पूर्ण, स्थिर, सारखे, घट्ट व मांसांत चिकटलेले असावेत.

उदर (पोट)—गोल, विस्तीर्ण, सुटलेलें, लोंबकलेलें नसावें. आकृतीनें सारखें, हरिणाच्या पाठीसारखें, च्छिद्ररहित, अविभक्त, लहान आणि सम असावें.

नेत्र—घोड्याचे नेत्र विस्तीर्ण, धुंद, शुद्ध, मोठे, तेजस्वी आणि मधाच्या रंगासारखे निर्मळ व त्यांतील बाहुली कृष्णवर्ण असावी, किंवा सुवर्णासारखे असावेत. त्यांची आकृती मल्लिका ह्मणजे मोगऱ्याच्या फुलासारखी किंवा मोर, उंट व चिमणा यांच्या नेत्रासारखी असावी. क्रौंच (कुरकुच्या) व तितिर पक्षी यांच्या डोळ्याप्रमाणें कृष्णवर्ण, आणि हत्ती, हरीण, हंस किंवा टिटवी यांच्या नेत्रासारखे असून लांब दाट पापण्यांनीं युक्त असलेले घोड्याचे डोळे उत्तम होत.

हनुवटी—ही विस्तीर्ण, वर्तुळ, दृढ व स्थिर असलेली उत्तम होय. ती पूर्वभागीं पुष्ट असून तिंतील मांस व हाड यांचा सांधा अगदीं चिकटलेला असावा.

मुख (तोंड)—हें विस्तीर्ण, निर्मांस, सुगंधयुक्त आणि सुवृत्त असावें. लांबट नसावें ह्मणजे उत्तम. परंतु कोणाचें मत तें लांबटही असावें असें आहे.

दंष्ट्रा (दाढा)—ह्या सुंदर रंगाच्या असून त्यांचीं अग्रें तीक्ष्ण असावीत व त्या चतुष्कोन, बळकट, स्निग्ध, सूक्ष्म आणि सारख्या असाव्यात.

वृषण—हें सारखें, वर्तुळ व केंशरहित आणि आंखूड असावें. तें किंचित लोंबलेलें असावें आणि त्यावर वळ्या पडूं नयेत. तसेंच शिश्न कृष्णवर्ण नसून आंखूड असावें ह्मणजे उत्तम लक्षण समजावें.

खूर—हे पुष्कळ उंच असून मोठे, गोल (वर्तुळ), आंखूड बळकट आणि विस्तीर्ण व स्निग्ध (तेजस्वी) असावेत. ते सारखे असून जमिनीवर टेकलेले असावेत, फुटीर किंवा खंडीत झालेले नसावेत. ते पांढरे, तांबडे, काळे अशा कोणत्याही एका रंगाचे असावेत. ते मध्यभागीं तळ्याचे ठिकाणीं खोल आणि शिळा तळा प्रमाणें कठीण असावेत, त्यांचे सांधे अगदीं मिळालेले असून निर्मांस असावेत.

जघन—मोठें विस्तीर्ण, चतुरस्त्र, सारखें असून सच्छिद्र व वर वा ढळेलें असावें.

कुक्षि (पार्श्व)—कुशी सारख्या, दीर्घ ह्मणजे लांबट, उंच व वर्तुळ असलेल्या शुभ होत. त्यांतील मांस वर असावें.

रंध्र—लांब व सच्छिद्र नसून सम असलेली शुभ होय.

वर्तिका—मूळांत निमग्न झालेली लांब आणि सूक्ष्म असून-गोलाकार असावी ह्मणजे उत्तम होय.

कूर्च (खुराच्या वरचा भाग)—सारखा व चांगला जडलेला असून उंच व सम वर्तुळ असावा. त्या ठिकाणीं ग्रंथी किंवा व्रण नसावें. व त्याचा रंग कृष्णवर्ण नसावा.

तळवा—खुराचे तळ काळे असावेत.

कटी—ही पुष्ट व तिचा मागला भाग वर्तुळ व विस्तीर्ण असावा.

मेहन (मूत्रद्वार)—गोल व संश्लिष्ट (चिकटलेलें) असावें.

मेंढ्र (शिश्न)—आंखूड, मऊ, वर्तुळ, सारखें व स्थिर असावें. त्याचें मुख मोठें असून अच्छादित असावें. व तें एक रंगीं असावें.

योनी (अश्विनीचें मूत्रद्वार)—सरळ व मोठी असून अच्छादित असलेली व घट्ट असावी आणि सुंदर मुखाची असावी.

पिंड—हे मांसांत बुडालेल्या शिरा व स्नायु यांनीं युक्त व पांढऱ्या रंगाचे असून उंच असावेत. तसेंच ते घट्ट व गोल असावेत.

स्तन—घट्ट, स्थिर, सारखे, वर्तुळ आणि दुग्धयुक्त असावे.

सक्थिनी (तळसंधी)—ह्या सरळ, सारख्या, गोल व पूर्ण असाव्या. त्या पूर्वभागीं विस्तीर्ण आणि पूर्ण असाव्या.

संधी—फार खोल किंवा फार उथळही नसावेत.

वंश (पाठीचा कणा)—वर्तुळ असावा.

आसन (पाठीचा मधला भाग)—विस्तीर्ण असावा.

किला—तीक्ष्ण असाव्यात.

जीं अंगें दीर्घ, ऱ्हस्व (आंखूड), वृत्त (वाटोळीं), पृथु (विस्तीर्ण), मृदु, स्निग्ध (तेजस्वी), तीक्ष्ण व मोठी, उंच, निर्मांस अशीं असावीत ह्मणून सांगितलें आहे, तर तीं तशीं असल्यास ते अश्व कोणत्या गुणाचे होतील तें सांगतों:—

त्यांचीं अंगें दीर्घ असल्यास ते बलवान, ऱ्हस्व असल्यास निरोगी, वृत्त ह्मणजे गोल असल्यास दीर्घायुषी, तेजस्वी आणि पुष्ट व पृथु असल्यास बलवान, मृदु असल्यास तेजस्वी व पुष्ट, स्निग्ध आणि तीक्ष्ण असल्यास पराक्रमी, मंडलाकृती असल्यास बुद्धिमान, नम्र आणि धैर्यवान असे होत.

जीं स्थानें निर्मांस असावींत ह्मणून सांगितलें तीं तशीं असल्यास तो अश्व मार्ग क्रमण्यास व भार वाहण्यास समर्थ असा असतो.


अवयवांची परिक्षा.

प्रकार दुसरा.

१ कपाळ विस्तीर्ण व उत्तम लक्षणाचा भोंवरा. २ मस्तक समान असून त्यावर वाटोळे भोवरें दोन असावेत. ३ नेत्रांतील बाहुल्या काळ्या असाव्यात. नेत्राखालीं आवळलेलें नसावेंत. ४ घोड्याचे दंत दाट व मऊ, हिरड्या आणि बळकट बांधलेले लांब व आंखूड नसावेत सारखे समान असावेत ते उत्तम. ५ ओंठ थोडे तांबडवर्ण असावेत रुक्ष नसावेत, कांतडें मऊ असावें. ६ हनुवटी लांब व मोठी नसावी, समान असावी. ७ कान आंखूड व चंचळ व पातळ असावेत. ८ जिव्हा मोकळी असावी. ९ टाळु लाल व मऊ चांगली. १० मान बाकदार सुंदर, बळकट व चोंहोकडे फिरती असावी. ११ अयाळ मोकळी, जटा नसाव्या, तिचे केंश मऊ

व लांब असावेत. १२ पुन्छाचा कांदा बारीक व सरळ असावा. १३ खांद्यावर भोंवरा नसावा. १४ छाती रुंद असावी. १५ काख लांब व उंच असावेत. १६ पायाचे पोटऱ्याच्या नळ्या मांसहिन सरळ असाव्यात. १७ घोटे काळे आणि त्याचे खालवरचे संधी वेगळे असावेत त्यांस गांठ नसावी ह्मणजे नेवर लागणार नाहीं. १८ खूर मोठे, वाटोळे, काळे, बळकट बेडुकासारखे असावेत. १९ कुशी उंच व लांब आणि बळकट असावी. २० पोट लांब नसावें. २१ पाठ लहान नसावी मध्यें बाक नसावा सारखी असावी. २२ कंबर पुष्ट असावी. २३ आगा वाटोळा असावा. २४ दांडी मऊ, चिकं-ण व तिचे केंश लांब असावेत. २५ वृषण आंखूड, बेलफळासारखें वाटोळें असावें त्यावर केंश नसावेत. २६ शिश्न आंखूड व काळें नसावें. या प्रकारें चिन्हांचा घोडा उत्तम समजावा.

या आंकड्यांचें वर्णन पान ७३। ७४ यांतमध्यें पहा.



घोड्यांचें शारीर वर्णन.

(इंग्रजी ग्रंथाधारें.)

भाग पहिला.

Head डोकें. Face चेहरा.

१ Muzzle तोंड अथवा मुसकट.
२ Nostril नाकपुडी.
० Eyes डोळे.

तोंडापासून ते डोळ्यापर्यंतचे भागास चेहरा ह्मणतात.

३ Forehead कपाळ.
४ Jaw जवडा.
० Ears कान.
५ Poll डोकें अथवा मस्तक.

कपाळापासून ते कानापर्यंतचे भागास मस्तक किंवा डोकें म्हणतात.

भाग दुसरा.

Neck मान.

६ Crest शेंडी अथवा टाळूंचीवट
७ Thropple or wind-Pipe कंठ किंवा घसा.

शेंडीपासून खांदा सुरू होतो तेथपर्यंतचा प्रदेश म्हणजे अयाळीचा अंत प्रदेश.

भाग तिसरा.

Fore-quarter पुढील भाग.

८ Shoulder-Blade खांदा किंवा फरा.
९ Point of Shoulder खांद्याचें टोंक.
१० Bosom or Breast or chest छाती किंवा ऊर म्हणजे गळ्या खालीं आणि खांद्याचे मधीं जो भाग तो.
११ True-Arm बाहू ह्म० कोंपरापर्यंत जो भाग तो.
१२ Elbow कोंपर ह्म० काखा.
१३ Fore-Arm हात ह्म० दंड.
१४ Knee गुडघा ह्म० कोंपर.

हेच अवयव मनुष्याचे अवयवाशीं ताडले तर काखा-दंड-कोंपर या प्रमाणें येतात.

१५ Cannon-bone गुडघ्या खालची नळी.
१६ Back Sinew गुडघ्या खालचे नळीचे मागील हाड.
१७ Fetlock or pastern joint नेवर ४५ पासून ६० डीग्रि.
१८ Coronate जिव्हाळी किंवा तळवा.

१९ Hoof or foot खूर किंवा नखी.
२० Heel खोट किंवा टांच.

भाग चौथा.

Body of middlepiece मधला भाग.

२१ Withers कुकूद किंवा वसवंड इ० मानेचा अंत प्रदेश व स्कंद किंवा खांद्याचे मधील भाग.
२२ Back पाठ.
२३ Ribs पंजर किंवा बरगडी.
२४ Circumference of the chest or girth तंगाचे जागेचा घेर.
२५ Loins कंबर किंवा कटी.
२६ Croup or cruptur लेंडी.
२७ Hip कमरेचा खवाटा.
२८ Flank कुसवा किंवा कोठा किंवा पोट.
२९ Sheath कोष.
३० Root of the Dock or tail शेपटीचें मूळ.

भाग पांचवा.

Hind-quarter मागील भाग.


३१ Hip-joint, round, or whirl-bone कमरेचा सांधा किंवा ढुंगण.
३२ Stifle-joint मांडीचे वरचे समोरचें चपटें हाड किंवा कमरेचा सांधा मिळतो तेथील हाड.
३३ Lower thigh or gaskin खालची मांडी.
३४ Quarters मांडीचा मागील वरचा भाग.
३५ Hock मागील पायाचा गुडघा.
३६ Point of the hock मागील पायाचे गुडघ्याचें टोंक.
३७ Curb place मागील पायाचे गुडघ्याचे जोडाखालचा भाग.
३८ Cannon-bone गुडघ्या खालील नळी.
३९ Back sinew क्यानन बोनचे नळीचे मागील हाड.
४० Pastern or fetlock-joint मनगट किंवा पायबंदाची जागा.
४१ Coronet तळवा.
४२ Hoof or Foot खूर किंवा पाय किंवा नखी.
४३ Heel खोट किंवा टांच.
४४ Spavin-place मागील पायाचे गडघ्याचे समोरचें हाड.

घोड्याचे शरिराव रून कसे विभाग केले आहेत तें.

१ आकसिपिट. ________ डोक्याची रचना.
२ शेरिबेलम. ________ मस्तकातिल लाहान मेंदु.
३ शेरिब्रम. ________ मस्तकातिल मोठा मेंदु.
४ नसाळ मेंब्रनस ________ नाकाचे पडदे.
५ टंग. ________ जिव्हा.
६ सरविकल वरटिब्रि. ________ मानेचे मणके.
७ स्पिनल कार्ड. ________ पाठिंचे कण्याची रज्जू.
८ फारिंग्स. ________ आन्ना शयाव जाणाऱ्या नळिचे तोंड.
९ आतारफेगस. ________ जठरात अन्न जाणारि नळी.
१० कारडियाक आरीफीस आफ स्टमक. ________ पक्काशयाचेरज्जू प्रथम तोंड द्वार
११ पिलारस. ________ पक्काशयात अन्न जाण्याचा रस्ता.
१२ पोस्टीरिअर सरफेस अफ डायाफ्रम. ________ छाति व पोट याचे मधिल पडद्याचा पाठिमागिल भाग.
१३ ट्रेकिया. ________ हवेची नळी. सासोस्वासाचा रस्ता.
१४ लंगस. ________ फोफिस.
१५ हर्ट ________ काळिज.

ए. पक्काशय अंक १० ११ मिळुन
बि. प्लिहा
शि. मूत्रपिंड
डि गर्भाशयाचे रुंद संधिबंधन
ई मलाशय
एफ गुदद्वार
जि. एच. ऐ. आअय. जे. के. एल. मांडिच्या आंतरगत स्नायु.

ट्रेकीया.



ए – मोलरटीथ —————— दाढा.

बी - एच – क्यानाइन किंवा टस्क ——— सुळेदांत.

सी - आय - इनसिसर्स ——————— छेदकदंत ह्म० चावण्याचें पुढचें दांत.

ई - ॲटलस ——————— शिरोधरास्थी.

जी - ऑरबिट् ——————— डोळ्याचें वर्तुळ ह्म० अस्थिकोश.

एम् - क्यार्नीफॉर्मक्यार्टीलेज (कुर्चा) —— खांद्याचा तंतूमयरज्जू. (हा पाखरी सारिखा असतो)

एन् - एन्सीफार्मक्यार्टीलेज (कुर्चा) —— खाकेजवळचा तंतूमयरज्जू.

ओ - कोराकॉइड प्रोसेस ऑफ् स्क्यापुला —— खांद्याचे सांध्याचें हाड.

पी - स्पाईन् ——————— कणा.

क्यू - क्यार्टिलेज (कुर्चा) ——————— तंतूमयरज्जू किंवा टोंक.

आर - ट्रोक्यांटरमेजॉर ——————— उर्वस्थीच्या वरच्या शेंड्यावरचे उंचवटे, ढुंगणाचें मोठें टोंक.

एस् - सबट्रोक्यांटरियनक्रेस्ट ——————— ढुंगणाचे लहान टोंकाचा उंचभाग.

टी - ट्रोकलिया ——————— मागील पायाचे सांध्याचें हाड ह्म० खालच्या शेंड्यावरचा संधीभाग.


यू - एक्सटर्नलकॉन्डाइल ——————— संधीशेजारचा उंचवटा.

व्ही - पटेला ——————— वाटी.

डब्ल्यु - हॉकजॉइंट ——————— मागील पायाचे गुडघ्याचे बाहेरचें टोंक.

क्यानियम	मस्तक संबंधि हाड.
२ लोवरजॉ	खालचा जबडा.
३ सर्व्हिकल व्हर्टिब्रि	मानेचे मणके.
४ डार्सल व्हर्टिब्रि	पाठिचे मणके.
५ लंबर व्हर्टिब्रि	कंबरेचे मणके.
६ सेक्रम.	माकड हाड
७ कॉकसिजिल व्हर्टिब्रि	शेपटीच्या दांडीचे मणके.
८ स्टरनम्.	छातीचें हाड.
९ ट्रुरिप्स.	खऱ्या बरगड्या.
१० क्यार्टिलेज ऑफ ट्रुरिप्स.	खऱ्या बरगड्यांचीं टोंकें किंवा तंतूमयरज्जू.
११ फॉल्स रिप्स	खोट्या बरगड्या.
१२ क्यार्टिलेज ऑफ फाल्सरिप्स.	खोट्या बरगड्यांचीं टोंकें किंवा तंतूमयरज्जू.
१३ स्क्यापुला } १४ ह्युमिरस }	खांद्याचीं हाडें.
१५ रेडियस्	हाताचें हाड किंवा दंडाचें हाड.
१६ एलुबो	खांका.
१७ अस् पिसि फॉर्म	गुडघ्याचे मागील हाड.
१८ २१ } १९ २२ } २० २३ } क्यारपल बोनूस.	गुडघ्यांचीं हाडें
२४ लार्ज मेटे क्यार्पल् बोन	पाय किंवा तंगडी यांचें हाड } तंगडीचीं हाडें.
२५ आउटर स्मॉल " "	मागील तंगडीचें हाड. } तंगडीचीं हाडें.
२६ इनर स्मॉल मेटे क्यार्पल् बोन.	बाहेरील तंगडीचा लहान भाग. } तंगडीचीं हाडें.

२७ } २८ } सिसिमाइट बोन्स	मणगटांचीं हाडें.
२९ ऑससक्र्याफिनिस.	मणगटाचें हाड.
३० ऑस कारोनिया.	सांध्याचें आरंभीचें हाड.
३१ आसिफिडिस	आंगठ्याचें हाड किंवा नखाचें टोंक.
३२ वुड्ग ऑफ पिडल् बोन	नेवराचें हाड
३३ ३४ } ३५ ३६ } ऑस इनोमिनेटम्.	ढुंगणाचीं हाडें
३७ फिमर.	ढुंगणाखालचें हाड.
३८ टिबिया.	मांडीचें हाड.
३९ ऑस स्याफीसीस	मागील पायाच्या गुडघ्याचीं हाडें.
४० आस्त्रेगेलस्.	मागील गुडघ्याचें हाड.
४१ ४२ } ४३ ४४ } टारसल् बोनूस.	मागील गुडघ्यांचीं हाडें.
४५ लार्ज मेटे टार्सल बोन.	मागील तंगडीच्या पुढील हाड.
४६ आउटर स्मॉल मेटे टारसल बोन्.	मागील तंगडीच्या बाहेरील हाड.
४७ इनर स्मॉल मेटे टारसल् बोन्.	मागील तंगडीचें मागील हाड.



भाग पहिला (डोकें).

मस्तक संबंधी.

फ्रन्टलबोन—कपाळाचें हाड एक १. **पॅरिटलबोन्न**—मेंदूचे जागचीं खालवरचीं हाडें २. **अक्सिपिटलबोन्स**—कपाळाचे माग-च्या भागाचें हाड १. **टेम्पोरलबोन्स**—कानपट्टीचीं दोन कानांचीं मिळून हाडें ४. **इथिमोडलबोन**—मेंदूसंबंधी हाड १. **स्पिनोडलबो-न**—नाक आणि तोंड यांचे दरम्यान भिंतीप्रमाणें असणारें हाड १. **इयरबोन्स**—कानांचीं हाडें ४, एकूण हाडें चौदा १४ असतात.

चेहऱ्यासंबंधी.

नेझलबोन—नाकाचें हाड. **सुपिरियर मॅक्झलरीबोन**—वरचे दांत राहाण्याचें हाड. **इनाफिरीयल मॅक्झलरीबोन**—हनवटीचें हाड. **मेलरबोन**—दाढा राहाण्याचें हाड. **ल्याक्रिमलबोन्स**—डोळ्याचीं हाडें. **पलेटाइनबोन्स**—टाळूचीं हाडें. **सुपरियरटर-मिनेटेडबोन**—नाकाचें हाड. **इनफिरीयरटरमिनेटेडबोन**—नाकाचें हाड. **ओमरबोन**—नाकासंबंधी हाड. **लोअरजॉ**—खालच्या जबड्याचें हाड. **टिथ**—दांत*४० चाळीस व **असहाईड**—जिभेचें हाड, एकूण हाडें एकूणसाठ ५९ असतात.

भाग दुसरा (धड).

या भागांत कणा, च्छाती व बस्ति इत्यादि आहेत.

कण्यासंबंधी.

सरव्हिकलव्हर्टिब्रीई—मानेचा कणा हाडें ७. **डार्सल**—पाठीचा कणा हाडें १८. **लम्बर**—कमरेचा कणा हाडें ५, एकूण हाडें तीस ३० असतात. परंतु कोठें कमरेचीं हाडें सहा सांगितलीं आहेत ह्मणून एकंदर एकतीस ३१ होतात.

---

* घोडीस दांत ३६ असतात. तीससूळेदांत ४ मुळींच नसतात.

थोरॉक्स—च्छाती.

रिब्स—बरगड्या दोन्ही बाजू मिळून छत्तीस ३६ व उरार्चे हाड १, एकूण एकंदर हाडें सदतीस ३७.

पेलव्हिस—बस्ति.

असइनामिनेटा—जंघा अगर कुल्याचीं हाडें २. सॅक्रम—माकडहाड १. काक्सिझीनबोन्स—शेपटीचे दांड्याचीं हाडें तेरा १३ पासून अठरा १८ पर्यंत किंवा कोठें शेपटीचीं सतरा हाडें सांगितलीं आहेत ह्मणून एकंदर हाडें एकवीस २१ किंवा बावीस २२ समजावीं.

भाग तिसरा (इतर अवयव).

पुढील भाग.

शोल्डरबोन्स—खांद्याचीं हाडें २ (स्कॅप्युला व ह्युमरस.)

आर्मबोन्स—हाताचीं हाडें २ (रेडिअस व अलना.)

बोन्स आफ दी निल—गुडघ्याचीं हाडें.

रो०-रांग १	स्काफाइड. लूनर. क्यूनिफार्म. ट्रॅपिझ्यूम.	रो.-रांग २	फिसिफार्म ट्रॅपिझाइड असमॅगनम अनसिफार्म	एकंदर हाडें ८.

हीं हाडें गुडघ्याच्या दोन्ही रांगांचीं समजावीं.

१ लार्ज मिटॅकरपलबोन } लेग-बोन्स } एकूण तंगडीचीं हाडें ३ तीन.
२ स्माल मिटॅकरपलबोन्स }

सिसॅमाइडबोन्स फेटलाग—नेवराचीं हाडें २ दोन.

पॅस्टर्न—पायबंदाचे ठिकाणचें हाड १ एक. कारोनेट—सुंभाचा टोप हाड १ एक.

काफिन. नॅव्हिक्यूलर. } फूटबोन्स—सुंभ किंवा खूर हाडें २ दोन.

एकंदर हाडें एकवीस २१.

मागील भाग.

फिमरव्हेचबोन—ढुंगणाचें हाड १ एक. **पटेलास्टाइफल-बोन**—मांडीचे वरच्या भागाचें हाड १ एक.

टिबिआ फिबिटा } थायबोन्स—एकूण मांडीचीं हाडें २ दोन.

असट्रॅगलस असकॅलसिज क्यूबाबाइडबोन्स } मिळून मागले पायाचा गुडघा हाडें ६ सहा.

हाक—गुडघ्याचे खालीं लागून ९ नऊ हाडें आहेत तीं एकंदर एकूणीस १९. तीं जशी पुढील पायाचे गुडघ्याचे खालीं असणारे हाडाविषयीं वर नांवें दिलीं आहेत त्याप्रमाणें ह्मणजे लेग्ज वगैरे नऊ ९ हाडें दिल्याप्रमाणें समजावीं. मागील पायासत मिटॅटार्सल ह्मणतात.

अवयव परीक्षा.

घोड्याचा पुढील भाग.

१ **मस्तक**—मस्तकात ज्यास्त कमी मेंदु असलेल्या मानानें घोड्याचें धैर्य व त्याचे मानसिक गुण असतात. यास्तव त्याचें मस्तक रुंद असावें म्हणजे तो धैर्यवान असतो कपाळा खालील भाग हा फक्त त्याचा सुंदरपणा किंवा उत्तम अथवा नीच जातीचे अवलादीचा तो आहे हें दाखवितो.

२ **नाकपुड्या**—ह्या फार काम करणाऱ्या घोड्याच्या रुंद असल्यात ह्मणजे त्यास श्वासोश्वास करण्यास चांगलें सांपडतें.

३ **जबडा**—हा रुंद असावा ह्मणजे गळ्यांतील वायूस बरोबर

मोकळ्या रीतीनें फिरतां येईल. जबडा रुंद नसल्यास डोकें मानेवर जसें वांकलें जावें तसें वांकलें जाणार नाहीं.

४ डोळे—डोळ्यांत दोन लक्षणें पहाण्यासारखीं आहेत. एक त्याचा स्वभाव आणि दुसरें त्याची शरीरप्रकृती. घोड्याची शरीरप्रकृती हल्लीं कशी आहे व पुढें तशीच राहील किंवा नाहीं हें डोळ्यावरून समजतें. डोळे पाणीदार आणि मोठे असे असले ह्मणजे घोडा चांगल्या स्वभावाचा आणि चांगले प्रकृतीचा असून पुढेंही त्याची प्रकृति चांगली राहील असें समजावें.

५ कान—हे फार आंखूड व लांब नसावेत, मध्यम असावेत आणि शेवटाकडे आणीदार असावेत, तुटके नसावेत.

६ मान—ही मध्यम लांबीची असून भरदार आणि मज्जायुक्त (मांसल) असावी. ती डोक्याकडे बारीक होत होत गेलेली असून कानाजवळ थोडी बांकदार असावी. स्कंधाचा सांधा आणि ऊर यांचे मधील मानेच्या खालचा भाग वर्तुळ असावा.

७ गळा—हा फार रुंद नसावा. घोड्याचा गळा फार रुंद असल्यास अथवा त्याचे घशापाशीं वळण असल्यास तो खिंकाळणारा असतो.

८ खांदा—जर घोडा बसण्याकरितांच पाहिजे असेल तर त्याचे खांद्याच्या गुणांकडे विशेष लक्ष पोंचविलें पाहिजे. खांदा नीट उभा असला ह्मणजे घोड्यास पाऊल लांब टाकतां येत नाहीं व तो चालतांना अडखळतो त्यामुळें त्यास लवकर चालतां येत नाहीं. अशा प्रकारचा खांदा नसून याखेरीज भिन्न प्रकारचा असेल तर वर बसणाराला त्रास होणार नाहीं. खांदा नीट असून जर तो मांसल आहे तर तो घोडा गाडी ओढण्याच्या किंवा ओझें वाहण्याच्या उपयोगीं पडतो. खांदा तिरका असेल तर खोगीर योग्य जागीं राहात नाहीं पुढें येतें, व बसणाऱ्याचा झोंकही

पुढें जातो. असें झालें ह्मणजे घोड्याचा वेगही कमी होतो. परंतु केवळ तिरकाच खांदा असावा असें नाहीं. त्याची मज्जा पुष्कळ व वरचें टोंक नेमस्त रीतीनें वाढलें असून तें फार मांसल नसावें. घोड्याचे खरे हाताची लांबी खांद्यावर अवलंबून असते. कधीं कधीं खांदा तिरका असून खरा हात आंखूड व नीट आणि कोंपराचे टोंकालगत असतो, हा एक दोषच आहे. जेव्हां कोंपर आंत वळतो तेव्हां बरगड्यास घांसतो, तेणेंकरून घोडा वेगानें चालत नाहीं. त्याचे हात लांब आणि मांसल असले ह्मणजे तो वेगानें चालतो.

९ **गुडघा**—हा रुंद आणि विस्तीर्ण असून खालीं बारीक होत गेलेला असावा. गुडघ्याखालील तंगडी लांब असावी.

१० **नेवर**—चालतांना नेवर पंचेचाळीस पासून साठ डिग्रीपर्यंत असावा. नेवर उचलतांना जमिनीशीं ४०।६० अंशाचा कोन होतो.

११ **कुकुद**—खांद्याचें टोंक ह्मणजे वसबंड हें उंच असून पातळ असावें आणि त्यावर थोडेंसें मांस असावें तें इतकें कीं, त्याजवरचीं हाडें दिसूं नयेत. कुकुद उंच असल्यास खोगीर मागें राहील अशी कल्पना केल्यास ती बरोबर नाहीं; कारण चालतांना खोगीर त्यावर आपटून त्याजवर त्याचें घर्षण होईल, यास्तव तें फार उंच नसावें. खादा जसा असावा तसा असेल तर कुकुद वाईट बरा पाहण्याची जरूर नाहीं. पाठ आणि मान यांचे दरम्यानचा त्याचा उंच भाग नसला तरी चालेल.

१२ **च्छाती**—ही लहान मोठी असेल त्या मानानें घोड्याचे अंगीं पाचनशक्ति असते आणि त्याच मानानें त्याचा फुप्फूसही असतो, यास्तव च्छाती रुंद असावी. फारच मोठी च्छाती असली तर तिजपासून खांदा व हात यांस अडथळा होईल, कारण ते दोन्ही बरगड्याला लागतील; यास्तव च्छाती फार मोठी अस-

ल्यास वेगानें घोडा चालण्यास फार अडथळा आहे. गाडीकरितां घोडा रुंद च्छातीचा असावा. त्याचा मधला भाग ह्मणजे पाठ आणि कंबर हा भाग फार जड नसून हलका असावा; तसा नसल्यास घोडा पहिलेच धांवण्यांत थकून जातो.

घोड्याचे इतर भाग अघळपघळ असावेत ह्मणजे काम करण्यापासून त्याची शक्ति कमी होणार नाहीं व तो कृशही होणार नाहीं. शर्यतीचे व शिकारीचे घोड्याची च्छाती मध्यम रुंद असून पाठ आंखूड असावी.

खांद्याचे हाडाची लांबी आणि मान, कुल्ले (टिऱ्या) ह्यांचे हाडांची लांबी खांद्याचे लांबीपेक्षां ज्यास्ती असावी, जर कमी असेल तर धांवण्यांत घोडा अडखळेल.

घोड्याच्या खालच्या भागापेक्षां वरचा भाग (पोटापासून वरचा भाग) आंखूड असावा, पोटापासून खालीं पायाकडे लांब असावा, पोटापासून कंबरेपर्यंत आंखूड असावा, पण असा घोडा मिळणें कठीण आहे. पाठ खोल असावी ह्मणजे ककुदापाशीं खोल होऊन कमरेकडे चढत जावी.

कमरेचा सांधा अरुंद असल्यास तेथें मांस ज्यास्ती असतें, आणि त्या योगानें कंबर आणि पाठ मजबूत दिसते, असे घोडे शिकारीस चांगले. ज्याची कंबर वांकलेली असेल तो पुष्कळ ओझें नेण्याच्या उपयोगीं पडेल.

घोड्याचा मागील भाग.

स्टैफल जॉइंट याची लांबी ज्या मानानें असेल त्या मानानें घोड्याचें पाऊल जवळ किंवा लांब पडेल. कमरेचा सांधा कोठें आहे हें बरोबर समजत नाहीं ह्यामुळें कमरेपासून स्टैफल जॉइंट

पर्यंत किती लांबी आहे हें समजण्यास जड पडतें, परंतु हें समजण्यास पुढें लिहिल्याप्रमाणें मार्ग आहे, ह्मणजे पंधरा हात व तीन इंच घोड्याची उंची असल्यास चोवीस इंच स्टैफल जॉइंट भरेल असें समजावें.

खालची मांडी तितकीच ह्मणजे स्टैफल जॉइंटा इतकीच लांब असावी. परंतु स्टैफल जॉइंटापासून मांडीचे सांध्यापर्यंत तिची लांबी मोजली तर घोडा चांगला उंच जातीचा शरीरानीं सुदृढ असल्यास ती अठ्ठावीस इंच भरेल पण ओझें वाहणारे घोड्यास इतके लांबीचे शरीर भाग असण्याची जरूर नाहीं; कारण इतके घोड्याचें लांब पाऊल पडण्याची अवश्यकता नाहीं. ओझ्याच्या घोड्याची खरी (वरची मांडी) इतर घोड्याच्या वरच्या मांडीप्रमाणेंच लांब असते, परंतु त्याची खालची मांडी फार आंखूड असते.

घोड्याचे कुल्ले मांसल असतात, आणि ते तसे नसले तर त्यांच्या हातून कोणतेंही काम चांगलें होणार नाहीं. घोड्याची परीक्षा कुल्यावर आहे. कुल्ले एकाशीं एक लागलेले असावेत ह्मणजे मलद्वाराचा खालचा भाग पोकळ (मध्यें फट नसावी) असल्यास तो घोडा वाईट समजावा. सांधे मजबूत आणि मज्जायुक्त असावेत. मागल्या भागांत महत्वाचा भाग मागल्या मांडीचा सांधा हा आहे. तो चपटा असून त्यास मांस (चर्बी) नसावी. त्याचा सांधा उतरता असावा. त्याची लांबी व आंखूडपणा हा मांडीचे मानाप्रमाणें असतो. त्यावरून क्याननबोन ह्मणजे गुडघ्याच्या नळीचा मागील भाग त्या मानानें लांब असतो.

अश्वाचे अवयवांचें मान.

मुख—साडेतीन व्रिही (साळी) चा एक अंगुळ अशा चोवीस अंगुळांचा एक हात (हस्त) या प्रमाणानें उत्तम अश्वाचे मुखाची

लांबी २२ अंगुळें, मध्यम अश्वाचे मुखाची २० व कनिष्ट अश्वाचे मुखाची १८ अंगुळें असते.

मान—उत्तम अश्वाची मान ५६ अंगुळें, मध्यम अश्वाची ४० अंगुळें आणि कनिष्ट अश्वाची ४० अंगुळें अगर त्याहून कांहीं कमी इतकी लांब असते.

ऊर, पाठ आणि कंबर—उराची लांबी १३ इंच असावी. पाठ आणि कंबर हीं प्रत्येक उत्तम अश्वाचीं २२ अंगुळें, मध्यम अश्वाचीं २० अंगुळें आणि कनिष्ट अश्वाचीं १८ अंगुळें अशीं असतात.

पोट—उत्तम अश्वाचे पोटाची लांबी ८४ अंगुळें असते.

कान—कर्ण ह्मणजे कान हे उत्तम अश्वाचे ७ अंगुळें व मध्यम अश्वाचे ६ अंगुळें लांब असतात.

टाळु—उत्तम अश्वाची टाळु ६ अंगुळें, मध्यम अश्वाची ५ आणि कनिष्ट अश्वाची ४ अंगुळें लांब असते.

खांदा, लिंग व वृषण—उत्तम अश्वाचा खांदा २४ अंगुळें, लिंग २४ अंगुळें व वृषण ४ अंगुळें लांब असतें.

गुद ह्मणजे मार्गस्थान—उत्तम अश्वाचे गुदद्वाराची लांबी २४ अंगुळें असते.

पुच्छ—पुच्छ दंड (शेंपटीचा दांडा) हा सूक्ष्म व सरळ असून उत्तम अश्वाचा २० अंगुळें, मध्यम अश्वाचा १८ अंगुळें आणि कनिष्ट अश्वाचा १६ अंगुळें लांब असतो.

पोटऱ्या व मनगट—उत्तम अश्वाच्या पोटऱ्या २२ अंगुळें आणि कनिष्टाच्या १४ अंगुळें उंच असतात व मनगट चार अंगुळें असतें.

खूर—उत्तम अश्वाचा खूर ७ अंगुळें परिमाणाचा लांब असतो. मध्यम अश्वाचा ६ अंगुळें आणि कनिष्टाचा ५ अंगुळें असतो.

उंची व लांबी—उत्तम अश्वाची लांबी त्याचे डोळ्याचे कोंपऱ्यापासून शेंपटीच्या मुखापर्यंत ५ हात असते. मध्यमाची ४ हात आणि कनिष्ठ अश्वाची साडेतीन हात असते.

घोड्याची उंची त्याच्या खुराच्या टोंकापासून ककुदापर्यंत मोजावी. ही उंची लांबीच्या प्रमाणानेंच असते. ह्यावरून पाहतां घोड्याची लांबी ७५ इंच आणि उंचीही पंचाहत्तरच इंच असते.

इंग्रजींत घोडा मोजण्याचें प्रमाण हातावरच आहे, परंतु तो हात ४ इंच लांबीचा असतो. ह्या प्रमाणानें उत्तम घोड्याची लांबी (शेंपटीचे मुळापासून डोळ्याच्या टोंकापर्यंत) ८० इंच व उंची (खुरापासून खांद्यापर्यंत) ६२ इंच असते.

अवयव मोजण्याची दुसरी रीत.

१ घोड्याची लांबी मोजणें ती नेत्राचे कडेपासून पुच्छमुखापर्यंत मोजावी व ती पांच हात असावी. २ घोड्याची उंची मोजणें ती खुरापासून कानाचे मध्यापर्यंत मोजावी व ती पाच हात असावी. ३ तोंड (मुख) ३२ बोटें लांब असावें. ४ परस्पर दोन्ही कानांमधील अंतर ६ बोटें असावें. ५ पाठ ५६ बोटें लांब असावी. ६ पुच्छाच्या दांड्याची लांबी २० बोटें असावी. ७ खूर व ८ कान यांची लांबी सात सात बोटें असावी. ९ घोड्याची मान, १० छाती व ११ कंबर या प्रत्येकांची लांबी छपन्न बोटें, असावी. व १२ पाय व मांड्या यांची लांबी छत्तीस बोटें असावी.

आवर्त्तांविषयीं.

पाण्यांतील भोंवऱ्याच्या आकृतीप्रमाणें केशाच्या रचनेची जी आकृती असते त्यास आवर्त अथवा भोंवरा असें ह्मणतात. घोड्याच्या बऱ्या वाईट खोडी समजणें त्या ह्या भोंवऱ्यांवरून समजल्या जातात.

घोड्यानां एकंदर ९६ भोंवरे (आवर्त्त) असतात. त्यांत वीस उत्तम आणि बाकी राहिलेले ७६ वाईट होत.

आवर्तांचे त्यांच्या आकार मानानें साधारण सात भेद आहेत ते असेः—शतपादी, मुकुल, संघात, पांडुक, अर्धपांडुक, शुक्ती आणि अवलीढ.

गोमेच्या आकाराप्रमाणें किंवा केंशासारखा ज्याचा आकार असतो त्यास शतपादी ह्मणतात.

जाईच्या कळीप्रमाणें भोंवरा असल्यास त्यास मुकुल ह्मणतात.

केंशांचा पुंजका जमून जो भोंवरा होतो त्यास संघात ह्मणतात.

पादुकेच्याआकाराचा जो भोंवरा असतो त्यास पांडुक ह्मणतात. अर्ध पादुकेच्या आकाराचा भोंवरा असल्यास त्यास अर्ध पांडुक ह्मणतात.

केंश स्पष्ट असून त्यांत शिंपीसारखा जो आकार असतो त्यास शुक्ति ह्मणतात. ती सामान्य खोडी आहे.

शुक्तीच्या भोंवऱ्यांचा एकत्र संचय असल्यास त्यास अवलीढ ह्मणतात.

आवर्तांचे इतर भेद.

१ कमलासारखा, २ अंगावर जिभेनें चाटलें असतां जसे केंश होतात तशा आकाराचा, ३ शेवंतीच्या फुलासारखा, आणि ४ वेणी सारखा, असे भोंवऱ्यांचे इतर भेद आहेत.

आवर्त गुण.

प्रपाण ह्मणजे वरचा ओंठ ह्यावरील भोंवरा, व सृक्किणी (ओंठाचें शेवट) ह्या ठिकाणचा भोंवरा हे उत्तम होत. ज्या घोड्याच्या कपाळावर चार, तीन किंवा दोन आवर्त ह्मणजे भोंवरे असतात तो घोडा फारच उत्तम होय. घोड्याच्या कपाळावर एकावर एक अशा क्रमानें तीन भोंवरे असल्यास त्यांस निश्रेणी ह्मणतात, ते उत्तम समजावेत. शीर आणि केशांत ह्मणजे केशाचा शेवट ह्या दोहोंच्या मध्यभागीं जो भाग असतो त्यास स्रुव ह्मणतात, त्या भागीं असलेला आवर्त उत्तम समजावा. घंटा बंधनापासून कंठाचे खालीं नऊ अंगुळांवर आणि हृदयापासून वर जें स्थान असतें त्यास निगाल ह्मणतात. आणि त्या निगालावर असलेल्या आवर्तास देवमणी असें ह्मणतात. तोही उत्तम समजावा.

कर्णाचें मूळ, बाहू, केशांत आणि मस्तक ह्या ठिकाणीं असलेले भोंवरे उत्तम समजावेत. मस्तकावर असलेला भोंवरा फारच उत्तम होय. ज्या घोड्याच्या उरावर चार किंवा तीन आणि कंठावर एक असे भोंवरे असतात तो घोडा उत्तम समजावा. अश्वाच्या रंध्र स्थानीं ह्मणजे पोट आणि नाभी यांचे अंतरावर किंवा उपरंध्राचे वरच्या बाजूवर असलेला आवर्त उत्तम समजावा. या भोंवऱ्यास क्षेम किंवा मेखला असें ह्मणतात. पाठ, कवर, नेत्र, ओष्ठ, ओष्ठप्रांत (जिभळ्या), मुख, पोट, कुशी ह्यांवर असलेले भोंवरे उत्तम होत.

घोड्याच्या वरच्या ओंठावर एक, ललाटावर एक, आणि रंध्र, उपरंध्र व वक्षस्थळ या ठिकाणीं दोन दोन असलेले आवर्त ध्रुवावर्त होत. ते उत्तम समजावेत.

अश्वाचें प्रपाण, कपाळ, ऊर, डोकें, रंध्र, उपरंध्र ह्या ठिकाणीं भोंवरे असावेत ह्मणून सांगितलें ते सर्व मिळून दहा असल्यास उत्तम

होत. ह्या अवयवांपैकीं एकावर तरी भोंवरा असावा. त्यांत देवमणी असला तर फारच उत्तम.

वीर मित्रोदयांत कांहीं विशेष सांगितलें आहे तें असें:—ज्या अश्वाच्या कपाळावर दोन उजवेकडे मुरडलेले आवर्त असतात तो अश्व उत्तम समजावा. मुकुलाकृति दोन भोंवरे ज्याच्या स्तुवावर असतात तो अश्व उत्तम समजावा.

ककुद (वखंड) सोडून पूर्वभागांत कोठेही असलेला आवर्त उत्तम समजावा.

ज्याच्या कंठांतील आवर्त शुक्तीच्या आकृतीचा असतो तो उत्तम समजावा.

ज्याच्या पूर्वभागीं मस्तकाचे ठिकाणीं शिंप, पताका ह्या आकृतीचे निश्रेणी (३ भोंवऱ्यांची ओळ) असून पाठीवर मेखळा (एक चिन्ह) आहे तो अश्व उत्तम समजावा.

केशांत या ठिकाणीं आणि अश्वाच्या दोन्ही डोळ्याच्या मध्यें शिंपीसारखे भोंवरे असतात ते उत्तम होत.

कंठावर रोचमान (श्रीवर्धन) हें चिन्ह आहे, किंवा उरावर चार भोंवरे आहेत तो अश्व उत्तम समजावा.

ज्याच्या बाहूचे ठिकाणीं शुभ्रवर्ण दोन भोंवरे असतात तो बाहू भूषणें धारण करणारा होय व तो उत्तम समजावा.

घोड्याच्या कपाळावर चार दिशेस चार असे भोंवरे असतात त्यास चतुरंग ह्मणतात. तो अश्व उत्तम समजावा.

ज्याच्या कानावर जाईच्या कळीसारखे दोन आवर्त प्रदक्षिणाकार असतात तो उत्तम समजावा.

ज्याचे वक्षस्थलावर किंवा ललाटाचे ठिकाणीं बिल्व, वृक्ष, स्वस्तिक, वर्धमान, गदा, पक्षी, नदींतील भोंवरा, नांगर, चक्र, शंख,

वज्र, खड्ग, धनुष्य, मत्स्य, चंद्र, सूर्य, पताका आणि मुसळ इत्यादि आकाराचे शुभ भोंवरे असतात तो अश्व उत्तम समजावा.

घोड्याचें कपाळ, मस्तक, मान, हृदय, पादपक्ष, मनगट, नाभि, स्कंध, पार्श्व (दक्षिणोत्तर बाजू), गळा, तोंड, उदर, रंध्र व त्रिक ह्मणजे पूर्वी सांगितलेलीं तीन स्थानें इतके ठिकाणीं मिळून बारा भोंवरे असावेत.

नासिकाग्राचे ठिकाणीं, कपाळावर शंखस्थानीं, कपाळाचे ठिकाणीं आणि मस्तकावर आवर्त असल्यास ते उत्तम समजावेत. ज्याच्या ललाटावर दोन आवर्त असतात आणि तिसरा मस्तकावर असतो तो अश्व उत्तम समजावा.

अश्वाचे कपाळावर दोन आवर्त असतात, त्यांस चंद्र सूर्य ह्मणतात. तो अश्व उत्तम समजावा.

अश्वाच्या उजव्या गंडस्थलावर जो भोंवरा असतो त्यास शिव ह्मणतात. तो अश्व उत्तम समजावा.

ज्यास कर्णमूळाचे ठिकाणीं एक व उरावर एक असे भोंवरे असतात त्यास इंद्राक्ष किंवा विजयावर्त ह्मणतात. हे उत्तम होत.

अश्वाच्या स्कंधावर किंवा पार्श्वभागीं असलेले आवर्तांस पद्मसंघ ह्मणतात, ते उत्तम समजावेत.

अश्वाच्या तालूचे ठिकाणीं जो आवर्त असतो त्यास मुकुल ह्मणतात, तो उत्तम समजावा.

घोड्याचे अंगावर दहा भोंवरे खालीं सांगितलेल्या स्थळीं असावेत त्यांपैकीं एक कमी असल्यास किंवा एक ज्यास्ती असल्यास घोडा अल्पायुषी ह्मणून समजावा. हे दहा भोंवरे आणि शिवाय तीन ध्रुव घोड्याच्या अंगावर पहावेत तीं ठिकाणें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

मस्तकावर दोन, छातीचे दोन्हीकडे दोन, कुशीच्या दोन्ही बाजूस जेथें डाग देतात ती जागा सोडून दोहींकडे दोन, पोटावर दोन, ओंठावर एक आणि कपाळावर एक इतक्या ठिकाणीं मिळून दहा भोंवरे असावेत.

छातीवर दोन, कपाळावर दोन, वरच्या ओंठावर दोन आणि दोन्ही कुशींवर दोन असे भोंवरे असल्यास उत्तम समजावेत. हें आठ भोंवऱ्यांचें लक्षण होय.

तीन भोंवरे एके ठिकाणीं असून जर ते उजवेकडे असतील तर तें उत्तम चिन्ह समजावें.

जर दोन भोंवरे एका बाजूवरच ह्मणजे उजव्या किंवा डाव्या बाजूवर असतील तर ते उत्तम समजावेत.

ज्याचे डोळे मोठे, कान मोठे, हिंमणें मोठें, चाल जलद व बिनझोल, आयाळीस केंश फार असून अत्यंत वेगवान, बळकट व स्वामीचे आज्ञेंत वागणारा असतो तो अश्व युद्धास योग्य जाणावा.

मान लांब; डोळ्याजवळील जागा, कंबर व छाती रुंद; मांड्या व गुढघे वाटोळे; शरीर शोभिवत; ओंठ, जिव्हा व टाळू अरक्त; अंगाची कातडीं व केंश मृदु; खूर वाटोळे; दृष्टि सन्मुख; कान, पुच्छ व ओंठ लहान; अशा गुणांनीं युक्त जो घोडा तो राजगृहीं असावा. तो शत्रूचा नाश करील.

ज्या घोड्याचा स्वर थोरले नौबतीमारखा, अगर शंखासारखा, अगर मेघासारखा, अगर हत्तीसारखा गंभीर असून मृदंगासारखा मधुर आहे तो घोडा उत्तम होय.

ज्या घोड्याचे पायाचे खूर काळे व मुटी शामवर्ण असून जो मुत्र करिते वेळीं त्याचा मुत्र पुढील पायांजवळ पडतो, जो दांतानीं नेहेमीं लगाम चघळतो, ज्याचा खांदा कोंबड्याचे खांद्यासारखा आहे, व

मांड्या रानडुकराचे मांड्याप्रमाणें बळकट आहेत तो घोडा उत्तम असून बहुत चालणारा होय.

मेखलांकीत-अग्रभागाचे ठिकाणीं जे चांगले भोंवरे असतात त्यांस मेखलांकित ह्मणतात.

चिंतामणी-ज्याच्या खुरावर लांब केश असतात त्या अश्वास चिंतामणी ह्मणतात.

देवमंगळ-कटीवर, उरावर, शिरावर व कपाळावर मिळून चार पांच भोंवरे असतात त्यास देवमंगळ ह्मणतात.

आष्टमंगळ-जो घोडा पांढरा किंवा बोर, अगर कुमाईत, किंवा जर्दा रंगाचा असून त्याचे चारी पाय, शेंपूट, ऊर,तोंड आणि डोक्यावरील केश,वृषण, शिश्न हे पांढरे आहेत त्याला अष्टमंगळ ह्मणतात.

कपाली-दोन्ही खुरावर नवाच्या आंकड्याप्रमाणें आणि कमळाकृति भोंवरे असल्यास त्यास कपाली ह्मणतात.

पंचकल्याणी-जो एक रंगी असून ज्याचे चारी पाय आणि तोंडाचा मध्यभाग पांढरा असतो त्यास पंचकल्याणी ह्मणतात. सर्व रंग तांबडा असून बाकीचीं वर सांगितल्याप्रमाणें चिन्हें असल्यास त्या अश्वासही पंचकल्याणी ह्मणतात.

कुमाईत तुरंग-ज्याचा सर्व अंगाचा रंग तांबडा असून डोळे मोठाले, दांडी, आयाळ, गुढघे, पाय आणि कान ह्यांचा रंग काळा असतो त्यास कुमाईत तुरंग ह्मणतात.

शामकर्ण-सर्वांग शुभ्र आणि कान काळे त्या अश्वाला शामकर्ण ह्मणावा.

शीतमंगल—ह्मणजे दोन्ही बाजूस कुशीखालीं शंखाप्रमाणें किंवा कमळाच्या फुलाप्रमाणें अथवा बांगडीप्रमाणें दोन भोंवरे असतात तो घोडा फार चांगला आहे. त्याचा धनी नेहेमीं संपत्तिवान राहील.

कृष्णावर्त—ह्मणजे घोड्याचे सर्व अंगांपैकीं एका ठिकाणीं शंखाप्रमाणें भोंवरा असतो तो फार चांगला आहे. धनी संपत्तिवान राहील व नफा फार होईल.

सुवर्णपाद—ह्मणजे छातीवर इतके केंश आलेअसावेत कीं, ती छाती झांकून जावी. तसेंच एका पायास किंवा चार पायांसही केंश असावेत.

गरुडपक्ष—ह्मणजे घोड्याचे दोन्ही कुशींवर दोन भोंवरे असतात. तो घोडा खरेदी घ्यावा. ह्यावर स्वार होऊन जो लढाईस जाईल तो सलामत परत येईल. त्याचा धनी संपत्तिवान राहील.

कांबीआयाळ—ह्मणजे घोड्याच्या डोसकीचे केंश इतके असतात कीं, त्यानीं डोळे झांकले जातात वआयाळ व दांडी इतकी लांब असते कीं, ती जमिनीवर पडते. असा घोडा फार चांगला व शुभदायक असतो.

दिव्यपक्ष—ह्मणजे एक रंगी घोडा असून त्या घोड्याच्या आंगावर कोठेही भोंवरा नसावा. असा घोडा चांगला असून तो आपले धन्यास लढाईंतून सलामत आणील.

भोंवऱ्यावरून देवता नामनिर्णय.

१ कपाळीं भोंवरा तेथें अग्नि राहतो. २ नाशिकीं भोंवरा तेथें वायु राहतो. ३ खोकींत दोहींकडे दोन तेथें श्री गणपति व कार्तिकवीर्य राहतो. ४ मस्तकावर दोन तेथें चंद्र सूर्य. ५ छातीवर दोन तेथें अश्विनीकुमार. ६ खांद्यांत दोन बाजूस तेथें कार्तीवीर्य. ७ कमरेवर दोन तेथें विष्णु महादेव. एकूण दहा भोंवरे ज्याचे आंगावर तो घोडा ध्रुवअश्व महाकल्याणकारक होय.

निश्रीनीअश्व-ह्मणजे ज्या घोड्याचे कपाळावर ओळीनें खालींवर तीन भोंवरे आहेत. ह्याच्या योगानें पागेंत अश्ववृद्धि होते.

कंकणाश्व-ह्मणजे ज्या घोड्याचे मानेवर तीन भोंवरे असतात. तो अश्व कल्याणकारक होय.

चिंतामणीअश्व-ज्या घोड्याचे कंठावर भोंवरा आहे त्यास चिंतामणी अश्व ह्मणतात. तो इच्छिले पदार्थ देतो.

सूर्यअश्व-ह्मणजे ज्या घोड्याचे पाठीचे कण्यावर भोंवरा तो. हा अश्व कल्याणकारक होय.

मेखलीअश्व-ज्या घोड्याचे उदरावर दक्षिणेकडे आवर्त असतो त्यास मेखली अश्व ह्मणतात. तो संपदा देतो.

जयमंगल-ह्मणजे ज्या घोड्याचे आंगावर पांच भोंवरे किंवा दोन चार शिरावर, ओंठावर किंवा कपाळावर व ऱ्हदयीं व अपानावर असतात. हा अश्व रणांत गेला असतां जय येईल यांत संशय नाहीं.

भूमंगल-ह्मणजे ज्या घोड्याचे उरावर भोंवरे चार पांच असतात किंवा सारे कंठाचे ठिकाणीं असतात त्यास अथवा ज्या घोड्याचे कंठीं कमलाचे फुलासारखा किंवा पत्रासारिखा एक किंवा दोन बाजूस दोहींकडे दक्षिणेचे बाजूनें फिरणारे आवर्त असतात त्यास ह्मणतात. असा घोडा नळाचे घरीं होता.

देवमणीअश्व—घोडा ह्मणजे ज्या घोड्याचें ऊर सोडून वरभागीं कंठाचे खालीं भोंवरा असतो तो. हा अश्व सुखदायक होय.

श्रीवृक्षीअश्व—ह्मणजे ज्या घोड्याचे छातीवर चार चहूंकडे व कंठाचे ठिकाणीं चार असे आठ भोंवरे असतात. तो घोडा राजगृहीं सतत संपदा देतो.

ज्या घोड्याचे कंठावर तीन व खुरावर चार असे सात भोंवरे असतात तो राजास सुख देतो.

अशुभ (वाईट) अवर्तांविषयीं.

घोड्याच्या अश्रुपातस्थानीं, तसेंच हनुवटी, गंडस्थळें, ऱ्हदय,

कंठ, मोथ (वरच्या ओंठाचा वरचा भाग), शंख (कटाक्षापासून दोन अंगुळावरचा भाग), कटी, गुढघे, मुष्क (अंड), व नाभी या ठिकाणीं असलेले भोंवरे वाईट समजावेत.

ककुद, गुद, डावी कुक्षि, डावा पाय, घोणा, नाकपुडी, भिंवई, लोचनावर्त, खांदा, गळा ह्या ठिकाणीं, त्याचप्रमाणें ग्रंथी, कूर्च, कलाकूर्च, काकस्थान, क्रोड, आसन, ऱ्हदय, त्रिक, पुच्छमूल, खूर इतक्या ठिकाणीं भोंवरे असल्यास ते वाईट ह्मणून समजावेत. घोड्याचें प्रपाण, कपाळ, ऊर, डोकें, रंध्र, उपरंध्र इतक्या ठिकाणीं मिळून अगदींच भोंवरा नसल्यास हें वाईट लक्षण समजावें. ज्याच्या पाठीचे कण्यावर एक आवर्त असतो त्या अश्वास सूर्य अशीं संज्ञा आहे. तोही वाईट ह्मणून समजावा. अश्वाचें मुख व कंठ ह्या ठिकाणीं एक आवर्त असल्यास तो वाईट ह्मणून समजावा. गुढघ्यावरील आवर्तास प्रवाल ह्मणतात. तो वाईट समजावा. मेंढ्रतलावर (शिश्नाचे तळीं) असलेला आवर्त, तसाच त्रिवळीच्या ठिकाणीं असलेला आवर्त वाईट समजावा. घोड्याच्या पुच्छ प्रदेशावरील आवर्तास धुमकेतु ह्मणतात. तो वाईट समजावा.

एका बाजूकडे वरील भोंवऱ्यांपैकीं एकच भोंवरा असल्यास वाईट समजावा. मांडीवर भोंवरा असल्यास किंवा शिश्नाचे ठिकाणीं असल्यास वाईट. मांडीवरचे भोंवऱ्यास जंघावर्त ह्मणतात.

खोडीविषयीं.

१ **शृंगी**— शेंडींत किंवा कानाचे अंतरांत मासाचा खिळा दिसतो त्यास ह्मणतात. शिंगासारखें चिन्ह ह्मणजे आंगठ्याप्रमाणें किंवा जांभूळ, बोर, कोय, हिरडा ह्यासारखे केशांची रचना दग्धचर्मवत असते त्यास ह्मणतात. व शेंडींत भोंवरा असल्यास त्यासही शृंगि ह्मणतात, परंतु ती बहुमतानें खोड नाहीं.

२ **अंजनी**—घोडा एक रंगाचा असून त्यावर कोठें तरी त्याशिवाय इतर रंगाचा टिकला असल्यास त्यास ह्मणतात. कोणी तिला चांदणी असेंही ह्मणतात.

३ **द्वयखुरी**—ज्याचे खूर बैलाच्या खुराप्रमाणें त्रिवळीयुक्त व मध्यें खोल असे असतात त्या घोडीस द्विखुरी ह्मणतात. खुरावर खुराचा आकार रेखांनीं दर्शित असतो.

४ **कुखावर्त**—घोड्याच्या दोन्ही कुशीवर भोंवरे असतात त्यांस कुखावर्त ह्मणतात. त्यांत एका कुशीवर (उजवे किंवा डावे) असेल तर वाईट समजावा. दोन्हीकडे असल्यास चांगला समजावा.

५ **एकांगुळ**—(एक मंडलिया) एक डोळा गारोळा आणि एक डोळा पांढरा असें असल्यास त्यास एकांगुळा किंवा फारषी भाषेंत हफीर ह्मणतात.

६ **त्रिकर्णी**—तीन कान असल्यास त्रिकर्णी ह्मणतात. दोन कानांपैकीं एक चिरल्या सारखा दिसतो किंवा एका कानास देंठ फुटल्याप्रमाणें असतो त्यालाच त्रिकर्णी ह्मणतात.

७ **थनी**—घोड्याच्या उरावर स्तनाकृति मांस असल्यास त्यास थनी ह्मणतात. व अंडा जवळ स्तनासारखे घोडीच्या स्तनाप्रमाणें आकार असतो त्यासही ह्मणतात.

८ **हीनदंती**—ज्यास पांच दांत आहेत तो हीनदंती होय.

९ **अंडावर्त**—घोड्याचें वृषण ज्या जागीं पोटास लागतें त्या जागीं किंवा वृषणावर भोंवरा असल्यास त्यास अंडावर्त ह्मणतात. तो साधारण आहे.

१० **अधिकदंत**—ज्यास सात दांत असतात त्यास ह्मणतात.

११ **काळवदन**—सर्व अंगावरचा सारखा रंग असून ह्मणजे एक रंगी असोन तोंडावर काळा पट्टा किंवा काळें तोंड असतें, असें असल्यास त्यास काळवदन किंवा काळमुखी ह्मणतात.

१२ **विक्राळ**—दोन्ही दांतांचे बाहेर वांकडा दांत असतो त्यास ह्मणतात, किंवा खालचे लांब आणि वरचे आंखूड दांत असल्यास त्यासही ह्मणतात.

१३ **पंचनखी**—घोड्याचे छातीवर पांच रेघा असतात त्यास ह्मणतात, किंवा पायाचे तळावर पांच उभ्या रेघा असतात त्यासही ह्मणतात.

१४ **कराळ**—खालचे दांत वरच्या दांताला जिंकतात व दोन दांताचे बाहेर एक वांकडा दांत असतो, वरील दांत लांबट असून खालील आंखूड असतात. यामुळें जबडा मिटला असतां दांतांस दांत लागत नाहींत फट राहाते.

१५ **अहीमुख**—सर्पासारखें ज्याचें तोंड तो अहीमुखी ह्मणून समजावा.

१६ **तुटपट्टा**—घोड्याच्या तोंडावर पांढरा मुखपट्टा असून तो दोन ठिकाणीं तुटला असेल तर त्यास तुटपट्टा असें ह्मणतात.

१७ **वाणिया**—घोड्याच्या आंगावर तीन चार अंगुळें लांब नीट रेघा असतात परंतु त्या भोंवऱ्याच्या आकृतीप्रमाणें नसतात त्यास वाणिया ह्मणतात.

१८ **बाशिंग**—कपाळावर त्रिकोनाकार तीन भोंवरे असल्यास त्यास बाशिंग ह्मणतात.

१९ **आसनखऊ**—पाठीवर जीन घातलें असतां जिनाखालीं जो भोंवरा झांकला जातो त्यास आसनखऊ ह्मणतात.

२० **सर्पिण**—लगाम देतांना जो घोडा जीभ बाहेर काढतो त्यास आडवी सर्पिण ह्मणतात.

२१ **कृष्णांजनी**—एक रंग असून त्याच्या डाव्या कुशी खालवर किंवा ऱ्हदयावर काळा टिळा असल्यास त्यास कृष्णांजनी ह्मणतात.

२२ **खानखऊ**—खांद्यावर भोंवरा असल्यास त्यास खानखऊ ह्मणतात.

२३ **गोमीपांच**—गोमेचें लक्षण आवर्ताचे लक्षणांत सांगितलेंच आहे. ती गोम एक वीत अगर दोन विती लांब असल्यास वाईट. तिला कोणी गंगापाट असें ह्मणतात. तोंडावर अथवा पाठीवर किंवा मस्तकावर गोम असल्यास वाईट. ह्या गोमेचें तोंड घोड्याच्या तोंडाकडे असल्यास वाईट. शेपटीकडे असल्यास उत्तम. तसेंच खालीं तोंड असल्यास चांगलें, व वरती तोंड असल्यास वाईट. पायावर गोम असून तिचें तोंड वर असल्यास वाईट. खालीं असल्यास उत्तम.

२४ **हरिणांग**—घोडा एक रंगी असून त्याच्या पाठीवर शुभ्र रंग असल्यास त्यास हरिणांगी ह्मणतात.

२५ **पितअंजनी**—घोडा एक रंगी असून त्याच्या उजव्या छातीवर किंवा मांडीवर पिवळा टिकला असल्यास त्यास पितअंजनी किंवा पद्मांजन ह्मणतात.

२६ **काखावर्त**—एका बगलेंत भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

२७ **सारभूकण**—नाकपुड्याच्या आंतील बाजूस पांढरे एक किंवा अनेक ठिपके असल्यास त्यास सारभूकण (सारभाजन) ह्मणतात.

२८ **एकांडी**—ज्यास एक अंड असतें त्यास एकांडी ह्मणतात. आणि ज्याचें आंड एकीकडे लोंबत असतें त्यास ही एकांड ह्मणतात.

२९ **काळांजनी**—एक रंगी असून त्याच्या डाव्या कुशीच्या खालवर किंवा ऱ्हदयावर काळा टिळा असल्यास त्यास ह्मणतात.

३० **अंगावर्त**—घोड्याचे पुढील पायाचे फऱ्यावर उजवेकडे किंवा डावेकडे भोंवरा असतो त्यास अंगावर्त ह्मणतात.

३१ दाढगुंबळ---दाढांबरोबर बाहेरच्या अंगास किंवा गालावर भोंवरा असल्यास त्यास ह्मणावा.

३२ पुसावर्त—पुच्छाजवळ जो भोंवरा असतो त्यास ह्मणतात.

३३ श्वेतांजनी—घोडा एक रंगाचा असून त्याचे फासोळीला किंवा कुशीवर पांढरा ठिपका असल्यास त्यास श्वेतांजनी ह्मणतात. तसेंच एकरंगी पांढरा घोडा असून त्यावर तांबडी टिकली असल्यास त्यास रक्तांजनी ह्मणतात.

३४ लेंडावर्त---अस्वळीचे पुच्छा सारखें ज्याचें पुच्छ असतें त्यास ह्मणतात. असें शेंपूट होण्यास त्याचे शेंपटास असणारे मणके इतर घोड्याचे शेंपटाचे मणक्यापेक्षां कमी असतात.

३५ शुन्यमस्तक—दोन्ही कानांजवळ मस्तकाचे मागें आसपास भोंवरे नसल्यास त्याला ह्मणतात.

३६ हृदावर्त—उरावर भोंवरा असला तर त्यास ह्मणतात. चार अंगुळे लांब असा भोंवरा पेशबंधा खालचे ठिकाणीं असल्यास त्यासही हृदावर्त ह्मणतात.

३७ नासावर्त—नाकावरील भोंवऱ्यास नासावर्त ह्मणतात. तो उजवेकडे असल्यास जनावर्त आणि डावेकडे असल्यास नासावर्त ह्मणतात. नाकापाशीं फुगा किंवा चामखीळ असल्यास ती खोड गणली जाते.

३८ पोटावर्त—उदरावर भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात. ही सामान्य खोड आहे.

३९ तळावर्त—मागचा पाय पुढचे पायाला चालतांना लागतो त्यास ह्मणतात.

४० शिळावर्त—जानूवर (गुडघ्यावर) भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

४१ नेत्रावर्त—डोळ्यावरील डावे बाजूवर किंवा डोळ्याचे खा-लवर भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

४२ भाळलोचन—ज्याचें आयाळ (मानेवरचे केंश) दोही-कडे पडतात त्याला ह्मणतात. कोणी त्यास अयाळवळचणही ह्मणतात.

४३ व्याघ्रकांत—एकरंगी घोडा उन्हांत बांधला असतां वाघा सारखा चकाकतो त्यास ह्मणतात. आणि ज्याचे अंगावर वा-घाचे पट्या सारख्या रेघा असतात त्यासही व्याघ्रकांत ह्मणतात. अशा खोडीचा घोडा जरद्या रंगाचाच असतो.

४४ कृष्णटाळू—ज्याच्या टाळूवर काळे ठिपके असतात किंवा वर भोंवरा असतो, तो कृष्णटाळू ह्मणून समजावा. तो घोडा काळ्या रंगाचा असल्यास, कृष्णटाळूचा दोष नाहीं.

४५ कपिमुख—खालचा ओंठ लांब आणि वरचा आंखूड असे ओंठ असल्यास कपिमुख ह्मणतात. ही खोड सामान्य आहे.

४६ जानूवर्त—जानूवरील भोंवऱ्यास शिळावर्त ह्मणतात आणि जंघेवर (मांडीवर) भोंवरा असल्यास त्यास जानूवर्त ह्मणतात.

४७ आर्जेळ—(चित्रभंगी) एकरंगी घोडा असून पुढील किंवा मागील (डावा किंवा उजवा) पाय पांढरा असल्यास चित्रभंगी (आर्जेळ) ह्मणतात.

४८ कर्णमूळ—कानाचे पाठीवर भोंवरा असल्यास त्यास कर्णमूळ (ग्रीध्र) ह्मणतात.

४९ शिंपला—कमळा सारखा किंवा मोत्याचे शिंपल्यासारखा भोंवरा असल्यास त्यास शिंपला ह्मणतात. ही सामान्य खोड आहे.

५० पंचनखी—ज्याच्या चार पायांपैकीं कोणत्याही एका पाया-ला फाटा फुटल्यासारखे चरणाची आकृति असते त्यास ह्मणतात.

५१ मेंढमुख—ज्याचें तोंड मेंढरासारखें आहे त्यास ह्मणतात.

५२ खरमुख—गाढवा सारखें तोंड असल्यास ह्मणतात. हें लक्षण साधारण आहे.

५३ राघामुख—ज्याचें तोंड राघूसारखें आहे त्यास ह्मणतात. ही साधारण खोड आहे.

५४ कौस्तुकी—घोड्याच्या गळ्याखालीं लोंबणारें कांतडें (पोळी) असल्यास त्यास कौस्तुकी (गळ लोंबीका) ह्मणतात.

५५ हयभंग—घोडा एक रंगी असून त्याच्या पोटावर पांढरा ठिपका असल्यास त्यास ह्मणतात.

५६ केरसुण्या—जो घोडा आपलें शेंपूट डावे किंवा उजवे बाजूला नेहमीं धरतो त्यास ह्मणावा.

५७ मध्यदंती—घोड्याला दांत सहा असतात त्यांतील मधला दांत मोठा असल्यास त्यास मध्यदंती ह्मणतात आणि एक लहान असल्यास महानदंत ह्मणतात.

५८ खुंटीउपाड—घोड्याचे उजवे गुढघ्याखालीं भोंवरा असल्यास त्यास खुंटीउपाड ह्मणतात आणि डावे गुढघ्याखालीं भोंवरा असल्यास त्यास खुंटीगाड ह्मणतात.

५९ अश्रुपात—घोड्याचे डोळ्या खालीं भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

६० सेनाभंजन—घोड्याचे मागील चौकावर भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात. या खोडीस दळभंजन अशीही संज्ञा आहे. कपाळावर पांढऱ्या केंसांत तांबडे केंश असल्यास त्यासही दळभंजन ह्मणतात परंतु त्याचा आकार आंगठ्याच्या बाहेर आलेला नसावा.

६१ डासी—जो नेहमीं डासतो त्यास ह्मणतात.

६२ पोटसूळ—ज्याचें नेहमीं पोट दुखतें त्यास ह्मणतात.

६३ खळतो—जो नेहमीं रेत गाळतो त्यास ह्मणतात.

६४ रातांधळ—ज्यास रात्रीं दिसत नाहीं त्यास ह्मणतात.

६५ लीद खातो, ६६ मांधेशूळ, ६७ पडमुत, ६८ रक्त मुततो, ६९ पाण्यांत बसतो. ७० चऱ्हाटें खातो, ७१ डसतो, व ७२ बुजतो. याखेरीज इतरही आगखी खोडी आहेत त्या १ उतरड, २ चिमटा, ३ डंकी, ४ बोंबल्या, ५ एका अंगावर झुलणें, ६ बसला असतां उठतांना गुढघे टेकून उठणें ह्या होत.

याशिवाय कांहीं कारणां पासून ज्या खोडी लागतात त्या खालीं लिहिल्या प्रमाणें:—

१ मगरूरी करणें—ही खोड लहानपणांत फार मारल्यानें किंवा घोडयांचे तंव्यांत नेहमीं राहिल्यानें उत्पन्न होते.

२ फार हिसणें—घोडीजवळ घोड्यास नेहमीं बांधल्यानें उत्पन्न होते.

३ भित्रेपणा—ही खोड वाईट दीळ असल्यानें किंवा पुकारा व आवाज यापासून उत्पन्न होते.

४ उडयामारणें—स्वारीचे वेळेस उजवे व डावेकडेस पळिवल्यानें, पाठीवर जखम असतां स्वारी केल्यानें किंवा लहानपणांत नेहमीं अथवा जास्ती स्वारी केल्यानें होते.

५ पळण्याची खोड—फार मारण्यापासून किंवा बंदुक, ताशा वगैरेंचा आवाज ऐकण्या पासून उत्पन्न होते.

६ लाथ मारणें व भांडखोरपणा करणें—स्वभावजन्य आहे.

७ पुढें आलेले जिनसावरून उडून जाणें—लगाम हलका दिल्यानें किंवा ममरेज लाविल्यानें होते.

८ चावणें—अगुतीं गुळ खाण्यास दिल्यानें ही खोड लागते.

९ दोनपायांवर उभें राहणें—लगाम प्रथम ढिला सोडून नंतर एकदम ओढल्यानें घोडा दोन पायावर उभा राहतो.

१० नालबंदी करूं न देणें—पहिले नालबंदीचे वेळेस घोड्यास इजा झाली तर तो दुसऱ्यांदां करूं देत नाहीं.

याप्रमाणें घोड्याच्या वाईट खोडी विषयीं ठळक वर्णन दिलें आतां याशिवाय विशेष खुलासेवार खोडी विषयींचें वर्णन खालीं देतों तें असें:—

पंचबाख—घोड्यास छातीवर पांच रेखा असल्यास त्यास ह्मणतात. ही सामान्य खोड आहे.

बांधरीनाख किंवा **हरिनाख**—ह्मणजे दोन्ही कानांमध्यें आणि शेंडीमध्यें भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

उपानयन—घोड्यावर स्वार बसला असतां घोडा पुढचे दोन्ही पाय वर करितो त्या खोडीस ह्मणतात. ही खोड फार वाईट आहे व ती कधीं जात नाहीं.

जीनपाठक—घोड्याचा सर्व रंग एकसारखा असून पाठ पांढरी असल्यास ह्मणतात. तो वाईट समजावा.

तंगावर्त—तंगाखालीं बाटोळा भोंवरा असतो त्यास तंगावर्त ह्मणतात.

मांडवर्त—मांडीवर उजवेकडे किंवा डावेकडे भोंवरा असल्यास त्यास ह्मणतात.

चित्री—ज्या घोड्याच्या अंगावर सफेत ठिपके होतात त्यास चित्री किंवा चित्ता असें ह्मणतात. त्यास कधीं कधीं घोडा फुलला असेंही ह्मणतात.

शाखी—घोड्याच्या दोन्ही कानांपैकीं एक कान मोठा असून घट्ट उभा असतो त्याला शाखी अथवा शाख ह्मणतात. तो वाईट समजावा.

दोसीना—घोड्याचे ऱ्हदयावर मध्यभागीं दुसरे रंगाची रेघ असल्यास त्यास ह्मणतात.

रुईकांती—एक रंगी घोड्यास एका ठिकाणीं तांबडा अरुणोदयासारखा तांबूस रंगाचा ठिपका असतो त्यास ह्मणतात.

जंबावर्त—मांडीवर किंवा शिश्नावर भोंवरा असल्यास त्यास जंबावर्त ह्मणतात.

पंचपर्व—ज्या घोड्याचे चार पायांपैकीं कोणत्याही एका पायास फरगड्याची (सरड्याची) आकृति असते त्या घोड्यास पंचपर्व ह्मणतात.

गुदक—ज्याचे पायांचीं कांतडीं रक्तवर्ण असतात त्यास गुदक ह्मणतात. तो वाईट होय.

पापवर्ण—कंठदेशीं रेषा असेल तो पापवर्ण समजावा. तो वाईट होय.

कंठस्थानाचे मध्य हाडावर भोंवरा असल्यास तो स्वामीने स्त्रियेस नाशप्रद होतो.

जो घोडा नेहमीं लाळ गाळतो तो वाईट समजावा.

इतर वाईट भोंवऱ्यांविषयीं.

१ **असलि**—हा भोंवरा डोळ्यावर असतो तो चांगला व डोळ्याखालीं असल्यास वाईट.

२ **यकुब**—हा भोंवरा जबड्यावर असेल तर चांगला. खालीं असेल तर वाईट.

३ **सार्फान**—कानाचे मागें मध्यावर असेल तर वाईट.

४ **सिपलक**—एका कुशीवर असल्यास वाईट. दोन कुशीवरचा उत्तम.

५ **सिंगन**—हे भोंवरे दोन्ही कानांचे आंत असतील तर वाईट.

६ **कनइसलि**—कानापासून निघून पाठीकडे मानेवर गेला असेल तर चांगला व मानेपासून कानाकडे गेला असल्यास वाईट.

७ छप्परखट किंवा जनाजा—हा जिनाचे खालीं असतो.

८ इतलसार—हा भोंवरा कुल्यावर असतो.

९ इंखउजाड—तोंडाचे खालीं पायापर्यंत जो भोंवरा जातो तो.

१० संगिनमाक—हा भोंवरा आयाळींत छपून राहतो.

११ कुलुंज—मागील पायाचे कोन एकास एक लागतात तो स्वारीस वाईट.

१२ सफादारा—मागील पाय फार फैलावून चालतो अयब नाहीं.

१३ गातदार—घोड्याचा सुंभ जोड्यासारखा असतो अयब नाहीं.

१४ मुराघा—घोड्याचे मागील पाय कोंबड्याचे पायाप्रमाणें नीट असतात तो चांगला.

१५ चवडासुंभ—थाळीप्रमाणें रुंद सुंभ असतात तो स्वारीस वाईट.

१६ मुतलककूलफेदान—पुढील दोन पाय पांढरे असतात. मोंगल लोक त्याला अयब समजतात.

१७ मुतलकूललजेंन—मागील दोन पाय पांढरे असल्यास अयब.

१८ मलकूलयेसार—पुढचा व मागचा डावा पाय सफेत असतो तो अयब आहे.

१९ मुलकूलयोजान—पुढील व मागील उजवा पाय पांढरा असेल तर चांगला.

२० मुलारत—पुढील डावा पाय सफेत असणें वाईट आहे. उजवा जर पांढरा असेल तर बरा.

२१ चारगुल—सबजा रंगाच्या घोड्याचे उजवे पुठ्यावर चारगूल असेल तर पंजाबांत व नेपाळांत अयब समजतात.

२२ खालदार—पांढरे रंगाचा घोडा असून काळे केंश त्यांत मिश्र असतील तर अयब आहे.

२३ चबदस्त—तीन पाय पांढरे व पिवळे रंगाचा घोडा असून त्यांत काळे केंश असल्यास अयब.

२४ सिकल—पुढील उजवा पाय व मागील डावा पाय पांढरा असेल तर वाईट.

२५ गोबस्तान—गाईसारखी ज्या घोड्याची छाती तो देखण्यांत खराब परंतु अयब नाहीं.

२६ काच्छि—ज्या घोड्याचे पाठीवर खाडा तो देखण्यांत उत्तम.

२७ तबरंगु—हत्तीसारखा पुठ्ठा असतो तो अयब नाहीं.

२८ तस्मागर्दन—चारीतर्फे मान फिरवितो तो वाईट.

२९ औसिकम—हरणासारख्या रंगाचा जो घोडा तो चांगला.

३० मर्दजान—गुडघ्यांत दुसरें हाड राहतें तो खराब.

३१ मोथेवाला }
३२ चपरहडी } —हे दोन्ही खराब आहेत.

३३ पोतेअलग—ज्या घोड्याचे अंड अलग असतात तो वाईट. व त्यावर केंश असल्यास वाईट.

३४ पोपेला-ज्या घोड्याम पुढील दांत नसतात तो अयबाचा आहे.

३५ पेरसोन—ज्याचे कान मोठे व मनुष्याचे डोळ्यासारखे डोळे असतात तो खराब.

३६ अक्रबपेमानी—पानासारखा टिळा कपाळावर असतो तो वाईट.

३७ माहिरू—कपाळावर तिनकोनी पट्टा असेल तर अयब नाहीं.

३८ ढपल—कपाळावर वाटोळा टिळा मोठा असतो तो चांगला.

३९ सितारपेसानि—कपाळावर चक्रासारखा लहान वाटोळा टिळा असतो तो चांगला.

४० **त्रिकाल**—कपाळावर दोन अंगुळा येवढा रुंद नीट लांबट पट्टा असतो तो चांगला.

४१ **खुंटेउखाड**—मागील पायाचे जोडावर गुडघ्याखालीं जो भोंवरा असतो तो वाईट. पुढील पायाचे जोडावर गुडघ्याखालीं असतो तो चांगला त्यास खुंटेगाड असें ह्मणतात.

४२ **चांदसुरज**—डोळ्याचे खालीं एक व डोळ्याचेवर दोन असे भोंवरे असल्यास व ते वरच्या दोन भोंवऱ्यांपैकीं एक मोठा व खालचाही मोठाच असतो, परंतु खालचे दोन्ही भोंवरे मोठे असल्यास चांगले.

४३ **गजदंत**—गजासारखा (हत्तीसारखा) तोंडा बाहेर सुळादांत येतो तो वाईट.

४४ **चक्रावळ**—ज्या घोड्याचे मुंभावर ही खोड आहे तो अयन होय.

उंटाचे दांतासारखे ज्याचे दांत तो वाईट.

ज्याचें कपाळ उंच तो वाईट.

गाईचे मुंभासारखे ज्याचें मुंभ तो चांगला.

उभ्या उभ्यानें झोंप घेतो तो चांगला.

चालतांना जीभ काढतो तो वाईट.

पाणी पितेवेळीं पाण्यांत तोंड फार बुडवतो तो वाईट

दाणा खाऊन कांहीं ठेवीत नाहीं तो वाईट.

घोड्याचे अंडावर गाईसारखे थान ह्मणजे सड असतो तो वाईट व त्यावर केंश असतात तो वाईट.

एक आंड व अंडांत अगदीं कोय नसते तो वाईट.

ज्याची काळी जीभ तो वाईट.

झुलतो तो बरा परंतु दोन बाजूनीं झुलावा ह्मणजे चांगला. एका अंगानें झुलल्यास वाईट.

बेडाफोड भोंवरा छातीवरचे भोंवऱ्यास ह्मणतात तो वाईट.

टीप—ज्याचे पागेंत आठ घोड्यांहून ज्यास्त घोडे असतील त्यास घोड्याचे खोडीची बाधा होत नाहीं असें कित्येकांचें ह्मणणें आहे परंतु खोडीचा घोडा ठेवूं नये हें उत्तम.

शालिहोत्रे अश्वमहादोष परीक्षा.

ज्यास वसवड आहे तो, काळ्या जिभेचा, ज्याचें मुख आणि टाळू कृष्णवर्ण आहेत तो, भयंकर, दंतहीन, शृंगयुक्ती, अधिक दंताचा, एका अंडाचा किंवा अधिक अंडांचा, अंडहिन, कंचुकी, मांजरासारखे ज्याचे पाय आहेत तो, वाघाचे रंगाचा, तीन कान असलेला, दोन खुरांचा, ज्यास स्तन आहेत असा, जुळ्यासहित झालेला, वामन (फार ठेंगणा), कावळा किंवा तित्तिर पक्षी यांच्या रंगाचा, वानरासारखे ज्याचे डोळे आहेत तो, मुसळचिन्ह (ज्याचा एक पाय भिन्न रंगाचा) आहे तो, आणि वृषणाच्या ठिकाणीं अंडवृद्धी आहे तो, याप्रमाणें चिन्हांचे घोडे कल्याणेच्छूनें त्याग करावेत. कारण त्यांच्यावर बसणारा स्वामी नाशास पावतो व धनहीन होतो.

विष्णु धर्मोतरे विशेषः

जातमुष्क (विषमआंड), मनुष्याचे रंगाचा, गाढव, कावळा व भस्म या वर्णांचा, कावळ्यासारखे पायाचा, गर्दभाप्रमाणें ज्याचें बळ आहे तो, ज्याच्या मानेवरील केंश काळे आहेत तो, अतिशय काळे रंगाचा, वांकडा, पांढऱ्या पायाचा, आवर्तांनीं वियुक्त, व अशुभ भोंवरे आहेत तो, असे हे अश्व वर्ज करावेत.

पुंड्रकाविषयीं.

घोड्याचे प्रपाणावर जो पांढरा पट्टा असतो त्यास पुंड्रक ह्मणतात. शिंप, शंख, तरवार, धनुष्य, नांगर, मुसळ, गदा, कमल, चक्र, अंकुश ह्या सारखे पट्टे अश्वाचे कपाळावर, मस्तकावर, मुखावर आणि प्रोथावर असल्यास उत्तम समजावेत. चतुष्कोन पुंड्रक उत्तम होत. ते पुंड्रक, शंख, मत्स्य, हात्ती, वज्र, कमल, ध्वज, चामर या सारख्या आकृतींचे असतील तर उत्तम समजावेत.

वर सांगितलेल्या ठिकाणीं सांखळी, फांसा, शूळ आणि अग्नि यासारखे पुंड्रक ह्मणजे पट्टे असल्यास ते वाईट होत. त्यांत प्रोथाचे ठिकाणीं असल्यास फारच वाईट. कावळा, गृध्र, धड, सर्प, कोल्हा आणि कर्क यांच्या आकृतीचे काळे, पिंवळे व तांबडे पट्टे (पुंड्रक) वाईट समजावेत. वांकडे गेलेले, चित्र विचित्र सांखळीसारखे, शूल व फांसा या सारखे पुंड्रक अश्वाच्या कपाळावर डावेकडेस असल्यास वाईट समजावेत. निळे, काळे, अति सूक्ष्म व भस्माच्या रंगाचे पुंड्रक वाईट ह्मणून समजावेत.

ललाम ह्मणजे टिके याविषयीं.

अश्वाच्या कपाळावर जो नक्षत्राप्रमाणें टिळा असतो त्यास ललाम (टिपका) असें ह्मणतात. हे ललाम पांढऱ्या घोड्या शिवाय इतर रंगाचे घोड्याचे पहावेत.

चंद्र, सूर्य, मत्स्य अथवा कवच यांच्या आकृतीचा टिका (ललाम) असल्यास उत्तम समजावा. ज्या अश्वास नदींतील भोंवऱ्याच्या अथवा कासवाच्या पाठीच्या आकृतींचे ललाम असतात तो अश्व उत्तम समजावा. ज्यास हत्ती, घोडा, किंवा बैल यांच्या आकाराचा ललाम

असतो तो उत्तम. शिवाय घोड्याचे कपाळाचे ऊर्ध्व भागीं उजवे बाजूस ललाम असल्यास तोही उत्तम समजावा.

ज्यास कावळ्याच्या पाया सारखे किंवा गोमेसारखे ललाम असतात तो अश्व वाईट ह्मणून समजावा

ज्याचा ललाम छिन्नभिन्न, फिकट, अर्धाबारीक, मिश्र रंगाचा वाईट, पुसट, कांहीं काळा दिसणारा असा असतो तो वाईट होय.

मनुष्यांनीं ललामावर आपला आंगठा ठेविला असतां तो ललाम झांकला जाऊं नये, झांकला गेला तर तो ललाम वाईट होय व त्या ललामांत मिश्ररंगाचे केंश असले तर त्याला दळभंजन ह्मणतात. हा वाईट होय.

पुष्पाविषयीं.

अश्व ज्या रंगाचा असेल त्याच रंगाचे अश्वाच्या शरीरावर अस्पष्ट व सूक्ष्म आणि वाटोळे असे बिंदु (गुल) असतात त्यांस पुष्पें ह्मणतात. तीं अश्वाच्या केंश समुदायांच्या स्निग्धतेवरून व प्रसन्नतेवरून जाणावीत.

हीं पुष्पें कोठें कोठें असलेलीं उत्तम समजावीं याविषयीं:—

अश्वाचे प्रपाण (वरचा ओंठ) यावर चार पुष्पें असल्यास उत्तम. तशींच प्रोथ (वरच्या ओंठाचा वरचा भाग) ह्यावरील, ललाट (कपाळ) ह्यावरील, भिवई वरील, सृक्किणीवरील आणि चिबुकावरील पुष्पें उत्तम समजावीत. घोड्याच्या दोन्ही खांद्यावर पुष्पें असल्यास उत्तम होत. मुखावर पुष्प असल्यास उत्तम. बाहूवर असलेलीं पुष्पें, तशींच रंध्रावरील पुष्पें, घोड्याच्या वाम (डाव्या) भागावरचीं पुष्पें उत्तम समजावीत. उरावरचीं, पाठीवरील व

मुष्कावरील पुष्पें उत्तम समजावींत. सर्व आंगावर सारखीं पुष्पें असल्यास तो घोडा फारच उत्तम समजावा.

वाईट पुष्पाविषयीं.

अश्वाचे घोणेवरील, गळ्याखालील, अश्रुपातस्थानीं असलेलीं, घंटास्थानाचीं, गुडघ्यावरील, व पोट, खाक, कंबर, मान, ऱ्हदय, नाभी, जंघन (मांड्या), अपानद्वार किंवा मुत्रद्वार, पोटऱ्या, गळा, कूर्च, मूत्रकोश, स्फिकस्थान व कान इतके स्थानीं पुष्पें असल्यास वाईट ह्मणून समजावींत.

पुष्पांच्या रंगाविषयीं.

घोड्याच्या ककुदावर पांढरीं पुष्पें असलीं तर तीं उत्तम समजावींत. ज्या रंगाचा घोडा असेल त्याच रंगाचीं त्यावर पुष्पें असल्यास उत्तम समजावींत. पांढऱ्या रंगाचे घोड्यावर पांढरीं, स्निग्ध आणि सम अशीं पुष्पें असल्यास उत्तम समजावींत. घोडा तांबडा असून त्यावरील पुष्पें तांबडीं असल्यास उत्तम समजावींत. घोडा कृष्णवर्ण असून पुष्पेंही कृष्णवर्ण असल्यास उत्तम; परंतु इतर रंग असून त्यांत रक्तवर्ण, पीतवर्ण आणि कृष्णवर्ण पुष्पें असल्यास तीं वाईट ह्मणून समजावींत.

कृष्णवर्ण घोडा असून तांबडीं पुष्पें असल्यास तो वाईटच समजावा. तीं पुष्पें धुरकट रंगाचीं असल्यास वाईट ह्मणून समजावींत. श्वेतवर्ण अश्वास कृष्णवर्ण किंवा रक्तवर्ण पुष्पें असल्यास वाईट.

आयुष्याविषयीं.

अश्व क्षेत्र परीक्षा.

अश्वाचें आयुष्य दहा दशा ह्मणजे ३२ वर्षे असतें. प्रत्येक दशा तीन वर्षे सत्तर दिवसांची होते. घोड्याचीं योग्य फळें सांगण्यास दहा स्थानें आहेत तीं अशीं:—१ मुख. २ ललाट (कपाळ), ३ मानेपासून खांद्यापर्यंत, ४ उर, गुडगे, कंठ आणि वसवड, ५ आसन (पाठ), ६ कटी, ७ स्फीक, ८ फलक, ९ जंघा आणि १० कूर्चसंधी.

वरील दहा स्थानीं पूर्वी सांगितलेल्या भोंवऱ्यांपैकीं शुभ भोंवरे असल्यास त्या अश्वाचें वरील प्रमाणानीं आयुष्य आहे असें समजावें. सदर्हू स्थानीं वाईट प्रकारचे भोंवरे असल्यास तितकें प्रत्येक दशेच्या प्रमाणानें कमी आयुष्य जाणावें.

जसें मनुष्यास शंभर वर्षे आयुष्याचें प्रमाण आहे तसें खेचरास वीस, हत्तीस शंभर, गाईस २४, उंटास २५, कुत्र्यास सोळा, बकऱ्यास बारा, हरण व रोही यांस सोळा, ह्मशीस बावीस, कोल्ह्यास पंचवीस, कृमी सात दिवस, मक्षिका ह्मणजे माशीस १४ दिवस आयुष्य असतें त्याप्रमाणें घोड्यास ३२ वर्षे नियमित आहे.

आयुष्याच्या लक्षणांविषयीं.

जे घोडे उत्तम संस्कारानें युक्त असून आंखूड कानाचे असतात व ज्यांचा स्वर, डोळे व स्वभाव यांस दीनता कधीं नसते ते अश्व चिरायुषी होत.

घोणा (नाकपुड्याच्या मधला भाग) मोटा, शरीरानें स्थूल, व उर रुंद व तेजस्वी असलेले अश्व दीर्घायुषी होत.

ज्याचे कानाचे शेवटास पिळ्ळें असतां शेंदरासारखी कांति दिस-

ते, जे आपले ग्रास कधीं विखरीत नाहींत, जे आकाश हुंगतात ते अश्व दीर्घायुषी होत.

ज्याच्या कुशीवर घट्टे पडलेले असतात, जे जलप्रवाहाच्या समोर उभे राहून पाणी पितात, ज्यांच्या जिव्हेचें अग्र कमळाच्या पानासारखें असतात, ज्यांचे दांत मोत्यासारखे व लिंग निर्मळ असतें, जे हिंसतांना शेपूट हालवतात, ज्यांचा घाम सुगंधी, नखें दर्पणासारखीं व रोम बळकट असतात ते सर्व अश्व दीर्घायुषी होत.

ज्या अश्वाच्या प्रोथावर (वरच्या ओंठाचा वरचा व कानाचे खालचा भाग) तेजस्वी, खोल व लांब अशा विस्तीर्ण रेषा असतात तो दीर्घायुषी होय.

ज्याच्या प्रोथावर डावेकडून आलेल्या छत्र, चामर, भृंग, तलवार. शंख, अंकुश, शिंप, वज्र, गदा आणि ध्वज या आकारांच्या आंखूड रेषा असतात ते अश्व अल्पायुषी समजावेत.

श्रीवृक्ष (नारळाचें झाड) व स्वस्तिक यांच्या सारख्या ज्यांच्या प्रोथावर रेषा असतात ते अश्व दीर्घायुषी होत.

प्रोथावर प्रोथाच्या आकाराची रेषा असल्यास त्याचें आयुष्य दहा वर्षे समजावें.

ही वरील रेषा ज्याची अंगुळ मात्र आहे तो बारा वर्षे वांचतो. ज्यास चार अंगुळें रेषा असते तो तेरा वर्षे वांचतो.

ज्या अश्वाच्या प्रोथाच्या अग्रभागीं वांकड्यावर गेलेल्या दोन रेषा असतात ते अश्व चवदा वर्षे वांचतात.

जो घोडा नेहमीं उजव्या बाजूवर निजतो व ज्यास मूत्र कधीं थोडें व कधीं फार होतें तो फार दिवस जगत नाहीं.

जो घोडा शरीराचे पुढचे भागाचे ठिकाणीं वांकलेला, स्थूल गुडघ्याचा असून ज्याचे डोळ्याचें कूट स्थूल असून डोळे ताठ असतात तो अल्पायुषी जाणावा.

ज्या अश्वाचे मोथावर ह्मणजे वरच्या ओंठाचा वरचा भाग व नाकाचे खालील भाग या ठिकाणीं एक अंगुळ लकेर असेल तर तो घोडा एक वर्ष, तीन अंगुळें असल्यास तीन वर्षे आयुष्य जाणावें. उजवीकडे दोन लकेरी असल्यास चार वर्षे व डावीकडे दोन असल्यास पांच वर्षे, चारपेक्षां कमी किंवा ज्यास्ती असल्यास सहा वर्षे, दोन अर्ध्या व एक पुरी असल्यास आठ वर्षे, बारा जव लांब प्रमाणानें दोन लकेऱ्या असल्यास नऊ वर्षे, एक जवा येवढी असेल तर दहा वर्षे, डावे नाकपुडीचे डावेकडे एक लकेर जवासारखी असल्यास अकरा वर्षे, दोन लकेरी नाकाखालीं जायफळा येवढ्या लांब असल्यास तेरा वर्षे, ओंठावर तीन लकेऱ्या तुर्की लोकांचे टोपी सारख्या असल्यास चौदा वर्षे, नाकाचे उजवीकडे एक लकेर असल्यास बारा वर्षे, चार असल्यास सतरा वर्षे, डावेकडे चार असल्यास अठरा वर्षे, उजवीकडे चार असल्यास एकोणीस वर्षे, पांच असल्यास वीस वर्षे, त्या पांचांपैकीं एक लहान असल्यास एकवीस वर्षे, छत्राप्रमाणें एक लकेर असेल तर तेवीस वर्षे, एक लकेर झाडाची डहाळी ह्मणजे फांदीप्रमाणें असल्यास चोवीस वर्षे, मनुष्याचे डोळ्याप्रमाणें असल्यास पंचवीस वर्षे, तीन आडव्या व एक उभी रेषा असल्यास सवीस वर्षे, बदामाप्रमाणें असल्यास सत्तावीस वर्षे, एक लकेर नारिंगाप्रमाणें असल्यास अठावीस वर्षे, जवसाप्रमाणें असल्यास तीस वर्षे, चंद्राप्रमाणें असल्यास बत्तीस वर्षे याप्रमाणें घोड्याचें आयुष्य समजण्याविषयीं सामुद्रिक लक्षण आहे.

अन्ययुक्ती आयुष्य जाणणें.

ज्या घोड्याचे नाकावरील रेषा चार बोटें लांब तो तेरा वर्षे वांचेल. ज्याचे अंगें नाकावर रेषा व शिरा दिसतात त्यास आयुष्य

वर्षे दहा. ज्याचे कानावर रेषा तीन बोटे लांब असतात तो पांच वर्षे वांचतो. ज्याचे तोंडाकडील भाग सखल, मागील भाग उंच, गुडघे मोठे, डोळे खोल व डोळ्याचे पापण्यांची उघड झांक स्तब्ध असते त्यास आयुष्य थोडें राहातें असें समजावें.

चिरंजीव घोड्याची परिक्षा.

जो घोडा मोठ्या कानाचा, मोठ्या शरीराचा, मोठे शब्दाचा, मऊ आंगाचा व तेजस्वी असतो तो फार दिवस वांचतो. ज्या घोड्याचे कानाचा शेंडा पिवळा असतां तेथील रंग तांबडा शेंदरासारखा दिसतो तो बहुत दिवस वांचतो. ज्याचे कानावरील रेघा स्पष्ट व बहुत केसाच्या व वांकड्या असतात तो बहुत दिवस वाचतो. जो आकाशाकडे हुंगतो, सूर्याकडे पाहतो, ज्याच्या कुशी, काखा व कंबर हीं मोठीं असतात, जो निद्रा बहुत घेत नाहीं तो फार दिवस वांचतो. जो पुढील बैरण न विसकटतां जीभेनें तोंडांत घेतो, कंटाळा करीत नाहीं व ज्याचें शिश्न आंखूड असून कपाळ मोठें असतें तो अश्व फार आयुष्याचा जाणावा.

दांतावरून घोड्याचें वय पाहण्याची रीति.

घोड्याच्या खालच्या दांतांत दोन सुळे दांतांमध्यें सहा दांत असतात. ते सहाही दांत पांढरे असल्यास घोडा एक वर्षाचा आहे असें समजावें. काळे तांबडे असल्यास २ दोन वर्षांचा समजावा. दोन पंक्तींमध्यें मध्यभागीं जे दोन दांत असतात ते सदंश होत. सदंशाच्या दोन बाजूचे मध्यम होत. मध्यमाच्या दोन बाजूचे ते अंत्य होत. सदंश पडून पुन्हां आले असले तर ३ वर्षांचा, मध्यम पडून पुन्हां आले असले तर ४ वर्षांचा, अंत्य पडून नवे आले

असले तर ५ वर्षांचा, सदंश काळे असतील तर ६, मध्यम काळे असल्यास ७, आणि अंत्य काळे असल्यास आठ वर्षांचा घोडा ह्मणून समजावें. सदंश पिंवळे असल्यास ९ वर्षांचा, मध्यम पिंवळे असल्यास १०, आणि अंत्य पिंवळे असल्यास ११ वर्षे झालीं ह्मणून समजावें. सदंश पांढरे असल्यास १२ वर्षें, मध्यम पांढरे असल्यास १३, आणि अंत्य पांढरे असतील तर १४ वर्षांचा घोडा झाला असें समजावें. सदंश कांचवर्ण असल्यास १५वर्षे, मध्यम कांचवर्ण असल्यास १६, आणि अंत्य कांचवर्ण असल्यास १७ वर्षे वय समजावें. सदंश मधासारखे असल्यास १८, मध्यम मधासारखे असल्यास १९, आणि अंत्य मधासारखे असल्यास २० वर्षे वय समजावें. सदंश शंखासारखे असल्यास २१, मध्यम शंखासारखे असल्यास २२, आणि अंत्य शंखासारखे असल्यास २३ वर्षे झालीं ह्मणून समजावें. सदंश सच्छिद्र असले तर २४, मध्यम सच्छिद्र असल्यास २५, आणि अंत्य सच्छिद्र असल्यास २६ वर्षे झालीं ह्मणून समजावें. सदंश दांत हालत असल्यास २७, मध्यम हालत असल्यास २८, आणि अंत्य हालत असल्यास २९ वर्षे झालीं ह्मणून समजावें. सदंश पडले असले तर ३०, मध्यम पडले असले तर ३१, आणि अंत्य पडले असल्यास ३२ वर्षांचें वय समजावें.

घोड्याच्या दांतावरून वय ओळखण्याची रीत २ री.

हे प्रकार नऊ आहेत. त्या प्रत्येक प्रकारास व्यंजन असें ह्मणतात. तीं व्यंजनें खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ कालिका. ३ शुक्ल.

२ हरण्या. ४ काञ्य.

५ मीनक्षाला. ८ चलन.
६ शंख. ९ पतीत.
७ छिद्र.

कालिका व्यंजन ह्मणजे दांतांवर काळा रंग असतो. हा रंग ३ वर्षे पर्यंत असतो. तो कधीं पांच वर्षे व कधीं कधीं आठ ८ वर्षेपर्यंत राहतो.

हरण्या व्यंजन ह्मणजे दांतांवर हरणाच्या कांतड्या सारखा रंग येतो. हा रंग ३ वर्षांपासून ७ वर्षांपर्यंत असतो.

शुक्ल व्यंजन ह्मणजे तांदुळा सारखा रंग दांतांवर येतो. हा ११ वर्षांपासून १४ वर्षांपर्यंत असतो.

कांज्य व्यंजन ह्मणजे दांतांवरचा रंग कांचे सारखा होतो व थोडा पांढरा व हिरवा असतो. हा रंग १४ वर्षांपासून १७ वर्षांपर्यंत असतो.

मीनक्षाला ह्मणजे माशांच्या कांतड्या प्रमाणें रंग असतो. हा आठरा वर्षे पर्यंत राहून पुढें फिरतो.

शंख व्यंजन ह्मणजे शंखा सारखा दांतांवर रंग येतो. तो २० पासून २२ वर्षांपर्यंत असतो.

छिद्र व्यंजन ह्मणजे दांतांमध्यें छिद्रें असतात. हीं छिद्रें २३ वर्षांपासून २६ वर्षे पर्यंत असतात.

चलन व्यंजन ह्मणजे सर्व दांत हालूं लागतात. हें २६ पासून २९ वर्षेपर्यंत असतें.

पतीत व्यंजन ह्मणजे सर्व दांत पडतात. हें २९ वर्षांपासून ३२ वर्षांपर्यंत असतें. पुढें घोड्यास आयुष्य नाहीं.

वय ओळखण्याची रीत ३ री.

जन्मापासून १॥ वर्षपर्यंत घोड्याचे दांत पांढरे असतात, त्या नंतर

काळसर होतात. ते दोन वर्षे पर्यंत काळसर राहतात, पुढें घोड्याचा एक दांत पडला तर घोडा दोन २ वर्षे नऊ महिन्यांचा झाला ह्मणून समजावें. दोन पडले तर ३ वर्षांचा आहे असें समजावें.

घोडा निर्बळ असल्यास हजार दिवसांनंतर त्याची वाढ खुंटते, ह्मणजे पुढें उंच वाढत नाहीं.

हिंदवी घोडा चवथा दांत पडला असल्यास चार वर्षांचा झाला ह्मणून समजावें. दोन सुळे दांत पडले असल्यास ९ वर्षांचा झाला असें समजावें.

अरबी घोडा १७८० दिवसांनंतर वाढत नाहीं, त्याची वाढ खुंटते.

घोडीचें वय दांतावरून समजत नाहीं. डोळ्याजवळ केंस फार असतात. शेंडी जवळचें हाड निघतें. केंसांत व त्वचेंत फरक होतो. यावरून घोडीचें वय समजण्यास मार्ग आहे. घोडीस सुळे दांत नसतात.

शिंगरास एक महिन्याचे पुढें दोन दांत येतात. च्यार दांत आले ह्मणजे च्यार महिन्यांचें शिंगरूं झालें. सहा दांत आले ह्मणजे सहापासून आठ महिन्यांपर्यंत शिंगरूं झालें. पुढें एक वर्षाचे होईपर्यंत बारा दांत निघतात. केव्हां केव्हां खालचे दोन व वरचे दोन असे च्यार दांत उपजतांच निघतात. कित्येकांस पंधरा दिवसांनीं निघतात. दोन सव्वा दोन महिन्यांनीं बाजूचे दांत निघूं लागतात. एकंदर वर्षांत चोवीस दाढा येतात.खालचे व वरचे जभड्यास दोन्ही बाजू मिळून सुळे ४ आणि दांत१२व दाढा२४मिळून सर्व दांत चाळीस असतात.

घोड्याच्या सुळे दांतावर जे खळगे असतात ते आठ वर्षे उमरीचा घोडा झाला ह्मणजे नाहींसे होतात. वरचे चार दांत व पुढील ह्मणजे खालचे यांची खूण एकदम नाहींशी होते असें नाहीं, थोडे अंतरानें होते. दांतावरचीं चिन्हें नाहींशीं झालीं ह्मणजे वयाची परीक्षा होणार

नाहीं, तेव्हां दांताचे लांबी वरून अथवा रंगावरून सुमारानें वय कळेल.कारण दांतांत फटी पडतात व हिरड्यापासून दांत सुटूं लागतात.

घोड्याचे वरचे सहा दांत व खालचे सहा दांत यांना चावण्याचे दांत ह्मणतात.त्यांचे जवळील दोन्ही बाजूंस खालचे वरचे मिळून चार सुळे दांत असतात. ते कोणतेही पदार्थास कापण्याचे उपयोगी पडतात.दाढा सहा प्रत्येक बाजूस खालवर मिळून दोन्ही जबड्यास चोवीस असतात. दाढा व सुळे दांत ह्या दोहोंचे दरमियान फट असते तिला इंग्रेजींत बार असें ह्मणतात. शिंगरूं उपजलें ह्मणजे दोन खालवर दांत मात्र असतात. कांहीं दिवसांनीं पुढील चार दांत दिसूं लागतात. एक महिन्यांत तिसरा दांत निघतो. त्यापुढें दोन महिन्यांनीं आणखी पुढील चार दांत निघूं लागतात. सहा महिन्यांत सुळे दांत निघतात. व त्याच सुमारास चौथी दाढही उत्पन्न होते. खाण्याचे योगानें दांतांचे चिन्हांत बदल होणें आहे ती तीन वर्षे पर्यंत होत असते.सोळा महिन्यांपासून वीस महिन्यांपर्यंत पुढील चार व दुसरे राहिलेले दांतांचे खळगे नाहींसे होतात. अडीच किंवा तीन वर्षांत पाहिले दांत पडून दुसरे नवीन येऊं लागतात. दुधाचे दांत पांढरे व आंखूड असतात. हिरडी वाटोळी असते. पहिले दांत पडून दुसरे खेपेस दांत निघतात ते मोठे असतात व त्यास पांढरेपणा कमी असतो. पुढील चार दांत पहिल्यानें पडतात आणि नवे येतात. दुसरे दांत साडे तीन किंवा चार वर्षे पर्यंत पडण्याची व उगवण्याची रीत आहे व असें झाल्यानंतर दाढा दिसतात. सुळे दांत साडेचार किंवा पांच वर्षांत पडून नवे येतात. पुढील चार दांत पडून येतात तेव्हां त्या दांतावर दुधाचे दांतांवर ज्याप्रमाणें खळगा असतो त्याप्रमाणें खळगा असतो व खाण्याचे योगानें ते पुढें नाहींसे होतात. खालचे जबड्याचे पुढील दांतांवर जे खळगे असतात ते पांच किंवा सहा वर्षांत नाहींसे होतात आणि सुळे दांतावरचे खळगे आठ किंवा सात वर्षांत

नाहींसे होतात. वरचे जबड्याचे पुढील दांतांवरच्या खुणा खालच्या दांतांप्रमाणें बदल होतात परंतु त्यांस अवकाश मात्र जास्त लागतो.

खालचे वरचे बारा दांत हे शिंगरूं उपजतांच नसतात. दोन, तीन, पांच, सहा व सात या दिवसांत वरचे व खालचे चार दांत निघतात. एक महिन्यापासून दोन महिन्यांपर्यंत आणखी खालवर चार दांत निघतात. चार महिन्यांपर्यंत खालचे वरचे मिळून आठ आणखी त्यापुढें चार दांत बारा महिनेपर्यंत निघतात. मिळून बारा महिन्यांत बारा दांत येतात. दुसरे वर्षी दांतांचा रंग शिपल्या प्रमाणें पांढरा होतो. पुढें लांबट व रुंद दांत होतात. जे दांत एक महिन्या पासून दोन महिन्या पर्यंत निघतात त्यांना रुबया असें ह्मणतात. हे दात तीन किंवा साडेचार वर्षांत पडतात, ह्मणजे घोडा चौसाला झाला असें समजावें. त्यापुढें सनया दांत दोन, तीन, चार, पांच, सहा व सात दिवसां पर्यंत जे निघतात ते पडतात, तेव्हां घोडा पंच झाला असें ह्मणतात. सहा वर्षांपुढें दांतावर पिंवळेपणा येतो. काळ्या लकेरी दांतावर पडतात तेव्हां सात वर्षांचा झाला. नंतर दांतांचा रंग पांढरा होतो तेव्हां आठ नऊ वर्षांचा घोडा झाला असें समजावें. रुबया दांत काळी लकेरी जाऊन पिंवळे होतात व लाल व जर्दा रंग होतो तेव्हां बारा वर्षांचे वयाचा घोडा झाला असें समजावें. दहा दांत रुबया वगैरे सारखे होतात तेव्हां वीस वर्षें झालीं. तीस किंवा पस्तीस वर्षें वयाचे वेळेस दगडासारख्या रंगाचे दांत होतात व पुढें ते पडतात.

दंतपरिक्षा.

दांतांवरून घोड्याचें आयुष्य ज्ञान कळतें. घोडा उपजतांच जे पहिले दांत असतात ते दुधाचे दांत होत. त्यानंतर पुढें सोळा किंवा बारा महिन्यांनीं सर्व दांत फुटतात. त्या योगानें त्याचें वय समजतें. दुहेरी एकास एक लागून आलेले दांत

खालीं व वरती असल्यास तो घोडा नाशकारक होय. चौथे वर्षी चार दांत पडले किंवा पांचवे वर्षी सहा दांत पडले तर तो घोडा पांच वर्षे जगणार असें समजावें. पांचवेच वर्षी सहा दांत निघाले तर तो कालिको नामक घोडा यम सदनीं नेईल असें समजावें ह्मणून तो उपयोगी नाहीं. त्याचप्रमाणें सातवे वर्षी व चौथे वर्षी किंवा आठवे वर्षी दांत उत्पन्न झाले तर तोही कालिको नामक होय, ह्मणून तो नववे वर्षी दांत आल्यास ते अकरावे वर्षापर्यंत पडण्याचा संभव आहे. अकरा वर्षांनंतर सतरा वर्षांपर्यंत जे दांत येतात ते पांढरे कांचेच्या रंगासारखे असतात व ते वीस वर्षे पर्यंत तसेच राहातात. वीस वर्षांनंतर पुढें शंखासारखा दांत होऊन त्यावर मक्षीकेसारखे ठिपके पडतात. ते शंखासारखे शुभ्रही राहातात. तो अश्व तेवीस वर्षे वांचतो. तेवीस वर्षांनंतर सर्व दांत गळले अगर सव्वीस वर्षांनंतर सर्व दांत पडूं लागले तर ते बत्तीस वर्षेपर्यंत पडतात. पुढें घोड्यास आयुष्य नाहीं.

घोड्यास मांजराचे दांतांसारखे दांत येतात तेव्हां त्यास मांजरा इतकेंच आयुष्य समजावें. जेष्ट अथवा आषाढ महिन्यांत किंवा मीन, कर्क, सिंह, संक्रांतींत घोडी पसवली तर तें शिंगरूं चांगलें चालणारें अथवा धांवणारें होत नाहीं.

अश्व शाला.

पूर्वाभिमुख किंवा उत्तराभिमुख अशा निष्कंटक व पाषाणरहित स्थळीं अश्वशाळा बांधावी. ती अपवित्र जागीं नसावी. ती शाळा विटबंदी व अगदीं कोरडी असावी. अश्वशाळेंत घोड्यासमोर एक मोठा वान्नर व सवत्स गाय आणि पांढरा कोंबडा हे नेहमीं ठेवावेत ह्मणजे घोड्यास दृष्टीविकार होत नाहीं. तशाच शेळ्याही कांहीं

ठेवाव्यात. सदंश, शफबंध, मानबंध, कीलकबंध, वाशी, दात्र, कुठार, कठाह आणि कुडव हे पदार्थ व अश्वास लागणारीं सर्व औषधें नेहमीं अश्वशाळेंत असावींत. रात्रीं पार्गेत दीप सतत ठेवावा, जागल करणारे लोक शस्त्र घेऊन तेथें असावेत. शाळेंतील अंगण वाळूनें भरलेलें असावें ह्मणजे अश्वास चालण्यास व लोळण्यास उपयुक्त होईल. देवस्थान, स्मशान व उखर जमीन याठिकाणीं व मालकाचे घराचे दक्षिणेस व पश्चिमेस अश्वशाळा केली असतां वाईट आहे.

सर्व जातींचे घोड्यास एकसारखें ठाण योग्य होईल असें नाहीं. ज्या एका घोड्यास जें ठाण मानवतें तेंच दुसऱ्या घोड्यास मानवत नाहीं असा प्रकार होत असतो. अश्वशाळेंत "व्हेंटिलेशन" वारा नेहमीं खेळतां असावा, व ठाणाला जितकी जागा पाहिजे आहे तितकी अवश्य असावी अश्वशाळेंत चांगला उजेड असावा. बसावयाचा घोडा, शर्यतीचा घोडा, गाडीचा घोडा, शिकारीचा घोडा व वळू घोडा ह्या प्रत्येकांचें ठाण निरनिराळें असावें. हे घोडे एकमेकांच्या दृष्टीस पडूं देऊं नयेत. कारण प्रत्येकाचे जे निरनिराळे गुण असतात ते एकमेकांस लागतात. घोड्याचें ठाण घोडीच्या जवळ कधींही नसावें एवढेंच नाहीं तर तें इतकें लांब असावें कीं, त्याला घोडीचा वास सुद्धां येऊं नये. तो घोडीजवळ नेहमीं असल्यामुळें त्यास घोडीचा वास लागून वाईट गुण लागतील ह्मणजे तिजविषयींची इच्छा त्याचे मनांत उत्पन्न होऊन ती पूर्ण न झाल्यामुळें त्यास कांहीं रोगही लागतील.

घोड्याच्या ठाणाची जागा अगदीं कोरडी असावी. ओलसर किंवा लोणा लागलेली बिलकूल नसावी, आणि याच कारणासाठीं अश्वशाळेचा पाया दगडांनीं चांगला मजबूत खोल बांधलेला असावा. भिंती चांगल्या सुमारें एक हात रुंदीच्या असाव्यात, ह्मणजे जमिनीला ओल येणार नाहीं व लोणा लागणार नाहीं. ठाणाखालून नाला, किंवा पाण्याची मोरी व दुसरे कांहीं घाणेरे पदार्थ गेलेले नसावेत. ज्या घो-

ज्यास अंधारांत काम करण्याची संवय आहे त्याच्या ठाणांत दिव्याचा प्रकाश कमी असला तर चांगला. झोंपेचे वेळेस त्यास अंधारच पाहिजे. अश्वशाळेचें तोंड दक्षिणेकडे किंवा उत्तरेकडे करावें अशा विषयीं भिन्न मतें आहेत. कोणाचें मत दक्षिणेकडे नसावें असें आहे. त्याचें कारण दक्षिणेकडे उन्हाळ्यांत उन्हाचा फार उपद्रव होतो, आणि उत्तरेकडे तोंड केलें असतां थंडीच्या दिवसांत थंडीचा उपद्रव होतो. पूर्वेकडे तोंड असावें किंवा पश्चमेकडे तोंड करणें प्रशस्त आहे. ठाणाची जागा प्रत्येक घोड्यास १० फूट लांब आणि ६ फूट रुंद आणि जमिनीपासून छपरापर्यंत १० फूट उंच इतकी असावी, ह्याहून कमी नसावी. दरवाजा ४ फूट रुंद व ७ फूट उंच ह्याहून कमी नसावा. कोणत्याही जनावरास सूर्य किरणें अंगावर पडणें हितकारक आहे, त्याचप्रमाणें घोड्यासही आहे. पूर्वेकडे तोंड केलें असतां सूर्य किरणें पडतात ह्मणून अश्वशाला पूर्वाभिमुख असावी. ती शाळा बहुत करून घराजवळच असावी कारण धन्याची नजर घोड्यावर नेहमीं राहील. घोड्याच्या मोत्तदारांनीं अश्वशाळेंत रात्रीं नेहमीं राहवें. अश्वशाळेंत मोत्तदारास निजण्यास व घोड्याचें सामान ठेवण्यास जागा ठाणा खेरीज पृथक असावी.

अश्वशालेचा दुसरा प्रकार.

अश्वशाला (पागा) चौसोपी असून मध्यें चौक असावा; तो इतका मोठा असावा कीं, घोड्याचे पिछाडीच्या मेखा ठोकल्या जाऊन कांहीं मैदान, घोडे जाण्यास अथवा येण्यास खुलें असावें. मध्यभागीं चंदी, रातब, दंका, निशाण, सामायन, वगैरे ठेवण्यासाठीं एक लहानशी इमारत असावी. प्रत्येक घोड्याच्या ठाणामध्यें कमरे बरोबर भिंत एक विटी असावी. ठाणाची जागा प्रशस्थ,

हवाशीर, स्वच्छ, उंच व एकसारखी असावी. मुतारी झांकण्याचे तक्ते जमिनी बरोबर असावेत. ठाणांत अक्षयी गवताचा बिछाना असावा. घोड्याची अगाडी, दवासन व पिच्छाडी तंग नसतां बेताची असावी ह्मणजे घोड्यास उठण्या बसण्यास अराम राहील. गळेपट्टे, ठाणपट्टा व मुजामे नरम असावेत. पागेस एक मोठा व दुसरा लहान दरवाजा असावा. बाहेर दोन्ही दरवाज्याजवळ दोन आड (कुवे) असावेत. पागेपाशीं पागेचे खासदार, भंगी, भिस्ती आणि उंट राहण्याच्या जागा असाव्यात. मागच्या दरवाज्याबाहेर गवताच्या गंजीस जागा अलग असावी. मोठ्या दरवाज्यावर स्वार अथवा अधिकारी यांनां कारण परत्वें राहण्यास बंगला असावा.

पागेस डंकेवाला, निशाणदार, शालिहोत्री, दाणेकरी, भिस्ती, चांभार, जिनगर, मशालजी, शिंगाड्या, भंगी, एकेक असून शिवाय खासदार दर घोड्यास असावा.

पागेंत अगाडी पिच्छाडी तोबरा, खरारा वगैरे सामायन लावण्यासाठीं तट असावे. पागेंत घोड्यांस दृष्ट न लागावी ह्मणून एडका आणि वानर हे एकेक ठेवण्याची चाल पडली आहे.

दोन चार घोडे राहण्याजोग्या तबेल्याविषयीं.

तबेल्याची जागा घराचे दक्षिणेस किंवा पश्चिमेस असावी. ईशान्येस घोड्याचा तबेला बांधूं नये. घोडे बांधण्याची जागा किंचित् उतरती असावी. घोड्यास धुण्याची जागा जेथें केली असेल तेथें पाणी तुंबूं देऊं नये. लहानशी मोरी बांधून पाणी जाईल अशी सोय करावी. मोरी बांधण्यांत दहा फुटास दोन इंचाचा स्लोप (उतरण) ठेवावा, व त्या ठिकाणीं एक लहानसा हौद बांधावा. घो-

त्याचे तोंडावर वारा येऊं नये यासाठीं त्याचे तोंडासमोर भिंत असावी. तबेल्यांत घोड्याचे पिछाडीचें आंग मोकळें असावें; त्या ठिकाणीं चार फूट रुंद, सात फूट उंच असा दरवाजा ठेवावा. दरवाज्यास फळ्या लावूं नयेत. तबेल्याला उजेड असावा. तबेल्यांत प्रत्येक घोड्यास दहा फूट लांब व सहा फूट रुंद अशी जागा असावी. तबेल्याची उंची बारा फुटांची असावी. तबेल्यापुढें ह्मणजे घोडा बाहेर काढण्याचे दरवाज्यासमोर चार फूट रुंदीची पडवी असावी. नेटिव लोकांत घोडे मोकळे ठेवीत नाहींत, बांधलेले असतात सबब त्यांचा मूत्र एक जागीं जमल्यानें जागा खराब होऊन घोड्यास इजा होईल, सबब घोडा मुतण्याचे ठिकाणावर एक फूट औरस चौरस चुनेगची हौद करून त्यांत तितक्याच बेताचें भांडें राहील, आणि तें भांडें काढण्यास व ठेवण्यास आंकडे टेकून त्यावर छिद्राची लांकडी फळी ठेवावी कीं, जेणेंकरून घोड्याचा मूत्र भांड्यांत येईल. याप्रमाणें सोय केली असली ह्मणजे घोड्याचा मूत्र एक ठिकाणीं जमल्यावर काढून टाकण्यास सुलभ पडेल. घोड्याचे जवळ त्याची लीद, मूत्र व कचरा टाकण्याची जागा करूं नये, केली असतां त्यापासून चिलटें, मत्सर वगैरे होऊन घोड्यास डसतील व दुर्गंधीपासून घोड्यास कांहीं तरी अजार उत्पन्न होईल. घोड्याची लीद पडली ह्मणजे तात्काळ वरचेवर मोत्तदारानीं काढून नेमले जागीं खत सांठविण्याचे जागीं टाकावी.

घोड्याची चाकरी करणें.

घोडेवाल्यानें सकाळीं सहा वाजण्यापूर्वी उठावें. घोड्याचे शेजेचें ह्मणजे निजावयाचें गवत नेमले ठिकाणीं नेऊन ठेवावें. रात्रीस घोड्यानें लीद केली असेल ती काढून खताचे जागीं टाकावी.

हात धुऊन घोड्याचे आंगावरील झूल काढून घडी घालून ठेवावी. नंतर ब्रूस घेऊन घोड्याचें डोकें, मान व खांदा पुसून स्वच्छ करावा. त्यानंतर खरारा करण्यास आरंभ करावा. खरारा मळ निघत नाहीं असें होईपर्यंत करीत असावा. तें काम पुरें झाल्यावर घोड्याचे मागचे पाय ब्रुसानें साफ करावेत, त्यानंतर घोड्याचें सर्व आंग हाताळीनें पुसून नंतर रुमालानें पुसावें, असें केल्यानें घोड्याचे आंगावर बिलकूल मळ राहणार नाहीं. नंतर लागलीच त्याची झूल त्याजला घालावी. पुढें घोड्याचे डोळे, नाक, कान व मल-द्वार हीं नीट पुसावींत. आयाळ व डुम विंचरावी. पहिल्यानें को-रडी नंतर पाण्याचा हात लावून विंचरावी. खूर धुऊन काढावेत. पाय पुसावेत, डाग असतील ते धुवावेत अगर पुसावेत, पाय धुणें ते ऊन पाण्यानें साबण लावून धुवावेत. खूर धुण्याचें व पाय पुसून डाग काढण्याचें काम खरारा करण्यापूर्वी करावें. वसंतऋतु व पावसाळा यांमध्यें हाताळीनें आंग पुसण्याची जरूर आहे. ब्रूसानें पुसलें तरी चालेल. घोडा तबेल्यांतून बाहेर फिरविण्या-करितां काढण्याची वेळ येईल तेव्हां मानेचे म्हणजे आयाळीचे व डुम म्हणजे शेंपटीचे केंसावरून ब्रूस फिरवून साफ करावें. घोड्याचे खूर कोणी ऊन पाण्यानें नुसते धुतात, कोणी तेलाचा बोळा वर चोळून मग धुतात. परंतु तेल लावणें चांगलें नाहीं असें कोणी म्हणतात. नेटिव लोकांत घोड्यास हातांनीं व मनगटांनीं पाणी लावून फार चोळतात, तेणेंकरून त्याची लव फार वाढत नाहीं. ही रीत चांगली आहे व असें केल्यानें घोड्याच्या शिरा उत्तम चोळ-ल्या जाऊन त्याचें आंग हलकें होतें. जसें मनुष्यास आपलें आंग दाबून घेण्यापासून सौख्य होतें तसें घोड्यासही होतें. घोडा काम करून बाहेरून फिरून आला म्हणजे तो स्वच्छ असल्यास त्याचे पाय मात्र चांगले धुवावेत आणि चाकरी करून बांधावा.

घोडा फार थकला असेल किंवा भिजला असेल किंवा घाणेरा होऊन आला असेल तर मध्यम ऊन पाण्यानें धुऊन चांगला पुसून कोरडा करावा व त्याजवर झूल घालावी व त्याचे पुढील व मागील पायांचे गुडघ्यावर फलाणीचें कपडे बांधावेत, परंतु जर हवा उष्ण असेल तर फलाणीचे कपडे बांधण्याची जरूर नाहीं, उघडे राहूं द्यावे. घोडा थंडकाळामध्यें धुवावयाचा असेल तेव्हां तबेल्यापुढें जी पडवी असते त्यांत धुवावा. उन्हाळे दिवसांत बाहेर उघडे जागेंत धुवावा.

मोतदारानें घोड्याचे सुंभाकडे फार लक्ष्य ठेविलें पाहिजे, ह्मणजे घोडा बाहेरून फिरवून आणला ह्मणजे त्याचे नाल पहावेत, ढिले झाले असतील अगर त्याचे खिळे निघाले असतील तर नवीन नालबंदी करवावी. कोठें खडा वगैरे अडकला असेल तर तो काढावा आणि सुंभावर मळ बसला असेल तर तो धुऊन काढावा. सुंभ फार कठीण झालें तर आठवड्यांतून एक वेळ एक हिस्सा तार (डांबर) व तीन हिस्से शेण एकत्र करून त्यास लावावें, व तें सुमारें एक प्रहर राहूं द्यावें नंतर धुऊन काढावें ह्मणजे कठीणपणा जाऊन त्यास मृदूपणा येईल.

घोड्याची चाकरी करणें व हांकणें याविषयीं.

कोचमीन चांगल्या स्वभावाचा असावा. त्याचें काम जबाबदारीचें आहे. कारण यजमानाचा विश्वास त्यावर असतो. एक कोचमीन दोन घोड्यास संभाळूं शकतो. तीन तासांहून ज्यास्ती वेळ त्याच्यानें घोड्याचें काम होऊं शकणार नाहीं. गाडी साफ ठेवणें

☞ टिप--चाकरीविषयीं आणखी प्रकार वळू घोड्याचे प्रकरणांत पहावेत.

वगैरे काम फार आहे, गाडी परत आल्यावर लागलीच धुतली पाहिजे, नाहीं तर रंग व वारनीस बिघडेल. याच कामामागें लागलें तर घोड्याची अनास्था होते, ह्मणजे घोड्याचे पाय धुतले नाहींत व मालीस केली नाहीं तर त्याला थंडी होईल, व त्याचे खूर तडकतील. तीन घोडे असले तर एक मदतीस मनुष्य पाहिजे. घोडेवाल्यानें घोड्याजवळ असावें हें घोडेवाल्यास अवश्य आहे.

शिकारीचे घोड्यास चाकरी करणारा हुशार, व माहितगार मनुष्य पाहिजे. घोडा किती वजन घेऊन जाईल हें त्याजला ज्ञान पाहिजे व तो पळणारा मनुष्य असला पाहिजे.

घोड्याचे चाकरीस लागणारें सामान.

१ गवत वजन करून देण्याचा कांटा. २ रोजेचें गवत गोळा करण्याचें फावडें. ३ झाडू (खराटा). ४ लीद काढण्याची टोपली. ५ बकेत पाणी पिण्यास. ६ चाळणी दाणा चाळण्यास. ७ माप शेर पावशेर. ८ खरारा. ९ ब्रूस. १० पाण्याचा ब्रूस. ११ फणी मानेचे केंस विंचरण्याची. १२ पायाचा मळ काढण्याचा आंकडा. १३ स्पंज पाय धुण्यास. १४ कांतड्याचा तुकडा पुसण्याकरितां. १५ पेटी सामान ठेवण्याची. १६ कातरी. १७ मोऱ्हकी (पुंजी). १८ झूल. १९ फ्लानेलचा तुकडा अजारी किंवा पाय ओले असतील तेव्हां बांधण्यास. २० अघाडी ह्मणजे गळ्यांतील वाखाचें पेंडे व पिछाडी ह्मणजे पिछाडीचें पाय बांधण्यास वाखाचे पेंडे. २१ मेखा तीन पुढल्या दोन व पिछाडीस एक. २२ साबण, ज्या दिवशीं घोड्याचें सर्व अंग धुवावयाचें असेल त्या दिवशीं अंगास लावण्याकरितां. २३ तोबरा दाणा देण्यास.

बिछाना.

घोड्यास रात्रीं बिछाना केला पाहिजे तो सुक्या गवताचा करावा. गवत दाट पसरावें. लिदीनें किंवा मूत्रानें रात्रीस खराब होईल तें गवत सकाळीं चांगलें निराळें ठेवून मलमुत्रानें माखलेलें खताचे जागीं टाकावें. दर आठ दिवसांनीं नवें गवत बिछान्यास घेत जावें. उन्हाळे दिवसांत सेजेकरितां समुद्राची बारीक वाळू पसरली तर हितकारक होईल. एकरोंतीस पैान्ड गवत एका घोड्याचे सेजेस बस्स होईल. वाळू सहा इंच जाडी पसरावी. लांकडाचा भुसा लांकूड घेरून पडतो तो मिळेल तर त्याचीही सेज करावी. वाळूप्रमाणें सहा इंच जाड पसरावा.

व्यायाम.

अश्वास व्यायाम करविल्यानें त्यास स्थिरत्व येतें. भार सोसण्याचें सामर्थ्य, शीघ्र गति, अग्नि दीपन व तेज इत्यादि गुण अश्वास प्राप्त होतात. सत्व, नम्रता, प्रीति, निर्दोषता, निद्रा, हिनता, वेग आणि स्वाराचे मनाप्रमाणें चालणें हे गुण घोड्यास नित्य वहनापासून येतात.

जो अश्व उत्तम आवर्त्तांनीं व गति, छाया, बल, शील, गंध, वेग, वर्ण, आणि स्वर यांनीं युक्त असून कपाळीं पुंड्रयुक्त आहे तो बसण्यास फार उत्तम समजावा.

व्यायाम आणि काम घेणें याविषयीं.

अश्वाच्या सर्व गुणांत वेग हा उत्तम गुण आहे. हा गुण वहनानें प्रकाशित होतो ह्मणून अश्वास वहनक्रियेचा रात्रा नित्य

ठेवावा. वहनकालीं अश्ववेत्त्यानें अश्वावर बसावें ह्मणजे त्याचें बळ वृद्धिंगत पावतें. आरोहण केल्याशिवाय जे अश्वाचे गुण ते अवगुण समजावेत. अश्वास वाहणें व प्रीतिपूर्वक सोडणें हीं पथ्यकारक आहेत. उत्तम, मध्यम आणि कनिष्ट इत्यादि कोणत्याही प्रकारचे अश्वास नित्यवहन पाहिजे. रूप, भोंवरे, गति, छाया, सत्व, रंग, वय आणि बळ हे सारे गुण वेगहीन अश्वास असले तरी निरर्थक होत. गतिपेक्षां रंग श्रेष्ट, रंगापेक्षां स्वर श्रेष्ट, स्वरापेक्षां सत्व श्रेष्ट, कारण सत्वांत सर्व गुण येतात.

व्यायाम आणि काम घेणें याविषयीं वहानकाल.

उत्तम (ब्राह्मण) अश्वास प्रातःकाळीं, मध्यम (क्षत्रिय) अश्वास प्रहर दिवस गेल्यावर, कनिष्ठ (वैश्य) अश्वास मध्यानकाळीं आणि शूद्रास (अति कनिष्ठास) रात्रीं वहन करावें. भाद्रपद आणि अश्वीन या महिन्यांत अश्वावर भार घालूं नये व मार्गास नेऊं नये, कारण तेव्हां त्याचें पित्त क्षुब्ध झालेलें असतें. श्रावण व भाद्रपद महिन्यांत कार्य पडल्यास किंचित मार्ग क्रमण करावें. हेमंत, शिशिरऋतूंत त्यास योग्य वहन व क्रमण करावें आणि वसंत ऋतूंत पाहिजे तितकें वहन व क्रमण करावें.

बाल, वृद्ध, कृश, रोगी, ज्यास तेल दिलें आहे तो, ज्याचा कोठा अगदीं भरलेला किंवा अगदीं रिकामा आहे त्या अश्वास, तसेंच गर्भिणी अश्विनी (घोडी) ह्यांस चालवूं नये. घोड्यास कोस दोन कोसावर विष्ठा मूत्र करवावें. त्यास पाहिजे तसें पाणी व चारा द्यावा, असें न केल्यास दोष होतात. त्याचें शरीर सुस्त व जड होतें, घर्म फार येतो, मुत्र रोधल्यास अश्व सर्व कर्माविषयीं अस-

मर्थ होतो. त्याचें शिश्न बधिर होतें. रक्तमेह होऊन त्यास फार इजा होते. सावली येतांच उभा राहतो. त्यास पुष्कळ ताडन केलें तरी पाऊलभर चालत नाहीं. अश्व भारानें किंवा पुष्कळ चालण्यानें श्रमी झाला असतां त्यास चालवूं नये. चालून आलेल्या घोड्याचें खोगीर एकदम काढूं नये. त्याचा घाम जिरून तो स्वस्थ झाला ह्मणजे त्याचीं मागील व पुढील बंधनें सोडून नंतर खोगीर काढावें, आणि त्याचें आंग मर्दन करून धुराळ्यांत लोळवावें. नंतर स्नान पान व भोजन हीं क्रमानें करवावीं, नाहीं तर रक्तादिदोष उत्पन्न होतात. हृद्रोग, वात, व शूळ, उदक पानानें शांत होतात. रक्त पित्त झालें असल्यास गूळ पाणी द्यावें. रक्त पित्त व वात यावर शर्करायुक्त उदक द्यावें. मध व अजागल याचा रस अश्वास दिला असतां सर्व रोग जातात. तसेंच सातू. तूप व दूध अश्वास द्यावेत. अश्वास मुखादीक भागाचे ठिकाणीं खाजवावें ह्मणजे संग्रामाचे वेळेस तो खाजवणाराचें स्मरण ठेवून इमानानें वागतो.

घोड्यास नाल बांधणें.

नाल बांधणें ते घोडा दोन वर्षांचा झाला ह्मणजे बांधवावेत. ज्याचे सुंभ गाजरे (नरम) आहे त्याला दगडांतून चालतां येणार नाहीं, सबब त्यास इतर घोड्यांपेक्षां लवकर नाल बांधावेत. नाल बांधणें ते दरमहा नवीन बांधीत जावेत. जरी नाल पडला नाहीं तरी महिन्याचे महिन्यास नाल बांधीत जावेत, कारण त्याची नखी वाढत असते आणि त्यामुळें तो ठेंचाळतो.

नालाची संवय न लावतां तसेच घोडे दगडांतून वगैरे फिरविले असतां त्यांचें सुंभ कठीण होऊन त्यांजला दगड, खडा, कांटा वगैरेंची कांहीं इजा होत नाहीं. परंतु अशी संवय ठेवण्यापेक्षां नाल

बांधण्याची संवय ठेवली तर चांगली. नाल बांधते समयीं त्याची नखी फार कापून जिव्हाळी लागूं देऊं नये. महिन्याचे आंत ज्यास्ती कामामुळें किंवा कच्चा नाल बांधला गेल्यामुळें हलूं लागला किंवा पडला तर लागलीच पुनः नवीन नाल बांधावेत.

☞ टिप—वळू घोड्याचे प्रकरणांत नाल बांधण्याविषयीं विशेष लिहिलें आहे तें पहावें व त्याप्रमाणें करावें.

पोषणविधी.

श्रेष्ट, मध्यम आणि कनिष्ट अश्वास देशकाल व शक्ति पाहून औषध किंवा चारा अगर चंदी देण्याकरितां वजनाचें कोष्टक.

गुंजा ८ = १ मासा.
मासे १६ = १ कर्ष.
कर्ष ४ = १ पल.
पलें ४ = १ कुडव = १ पावशेर पक्का.
कुडव ४ = १ प्रस्थ = २पौन्ड किंवा १ शेर पक्का.
प्रस्थ ४ = १ आढक.
आढक ४ = १ द्रोण.

उत्तम अश्वास भाद्रपदांत उडीद २ आढक (८ शेर पक्के) द्यावेत, त्याचा चतुर्थांश मध्यमास ह्मणजे (२ शेर), त्याचा चतुर्थांश कनिष्ठास ह्मणजे ॥ शेर द्यावेत. याचप्रमाणें तांदूळ, हरबरे, व्रीही (साळी) द्यावेत. मार्गशिर्षांत जोंधळे वरील प्रमाणानेंच द्यावेत. चैत्र महिन्यांत सातू उत्तमास ४ आढक (१६ शेर पक्के), मध्यमास त्याचा चतुर्थांश (१ आढक = ४ शेर) आणि कनिष्टास त्याचा चतुर्थांश (१ शेर) द्यावेत. माघ महिन्यांत चणे (हरबरे) उडदाच्या प्रमाणाप्रमाणें द्यावेत, आणि वैशाखांत मुग हेही चण्याच्या प्रमाणाप्रमाणेंच द्यावेत.

पर्जन्यकाळीं अश्वशाळेंत अश्व नेल्याबरोबर त्यास क्रियाक्रम (चाकरी) करूं नये. पहिले १०।१२ दिवस तेल घालून पथ्य द्यावें. नंतर वर्षारंभीं पांच पलें (१ पावशेर) निंब द्यावा. उत्तम अश्वास ७ दिवस सुंठ, ओवा व सैन्धव हे गोमूत्रांत मिसळून तो स्वस्थ असेल तेव्हां पाजावेत. हरीतकी क्षालन (हिरडे भिजत घालून त्याचें पाणी तेलांत मिसळून) द्यावें. आधीं पांच हिरडे द्यावेत, दुसऱ्या दिवशीं १० हिरडे अशा क्रमानें पांच पांच वाढवून शंभर होईपर्यंत प्रतिदिवशीं चारावेत. मध्यमास ८० पर्यंत आणि कनिष्ठास ६० पर्यंत चारावेत. भाद्रपदमासीं हिरडे आणून दहा दिवस ठेवून त्यास वास देऊन मग चारावेत. लसूण व गुग्गुळ हे पहिला प्रहर गेल्यावर दुसऱ्या किंवा तिसऱ्या प्रहरीं द्यावेत. पहाटेस आणि मध्यान्हकाळीं भुस काढलेले सातू देऊन संध्याकाळीं पुन्हां अनुवासन द्यावें. जे दिवशी अभ्रामुळें सूर्योदयही दिसत नाहीं ते दिवशीं अश्वास पाणी पाजूं नये. त्यास फिरवुन दिवसाचे आठवे भागांत भोजन घालावें. पिंपळी, शृंगवेर, चित्रक, मिठ आणि अभया दारूंत मिसळून त्यास पाजावी.

शरत्कालांतील पोषण.

शरदृतूंत (अश्वीनमासीं) अश्वाचें सेवा कर्म करूं नये. केवळ कोंवळ्या गवतांनीं व सातूंनीं त्याचे पोषण करावें. तळ्यावर नेऊन पाणी पाजावें व धुवावें. फार तप्त झाल्यास त्यास बस्तिकर्म करावें. पाण्यांत भिजलेले सातू खाण्यास घालावेत. या ऋतूंत दुधानें मिश्रित पदार्थ अश्वास द्यावेत, ह्मणजे रक्तपित्ताचा नाश होतो. काश्मरी, अग्रफल, मुस्ता, बोर, कुटकी, वाळा, साखर, प्रियंगु, मध, पडोळे, त्रायमण हीं ११ औषधें दारूंत अश्वास द्यावींत. अतिशय

श्वास सोडणारे अश्वास तालवृक्षाचें पाणी पाजावें व विस्तीर्ण पाण्यांत पोहवावें. शरदृऋतूंत दूध मिसळून आणि मांस घालून साळी द्याव्यात. त्यांत कांहीं अम्ल पदार्थ घातल्यास हरकत नाहीं. या ऋतूंत शुक्ल २ स अश्वशाला ही चटया आणि कमलादिकानीं आच्छादित करून सूर्याचें ऊन न लागे अशी तजवीज करावी. सूर्य अस्तास गेल्यावर मग अच्छादन काढावें. नंतर निंबाचीं पानें व तूप आणि गुग्गुळ यांचा काढा त्यास द्यावा व त्याचें चांगलें रक्षण करावें. खरारा करणें व उद्वर्तन आणि फिरवणें हें सर्व रात्रीसच करावें. पूर्वीं मिरें व तूप देऊन कार्तिकमासीं घोड्याची शीर टोचावी. ती उरावरची, कूर्चावरची किंवा ओंठावरची यांपैकीं कोणतेही एका ठिकाणची एक किंवा दोन टोचाव्या नंतर मंजिष्टा, मध, कुष्ट, प्रियंगु, त्रायमाण, एल्का, पिंपळी, कुटकी हे समभाग करून दारूंतून त्यास कल्क करून द्यावेत.

हेमंतऋतूंतील घोड्याचे पोषणविधी.

हेमंत ऋतूंत अश्वाचें मुख व बस्ति या ठिकाणीं तेल लावून शीर टोचावी. नंतर ऋतुमानाप्रमाणें त्यास प्रतिपान द्यावें ह्मणजे उडीद खाण्यास द्यावेत ते अगदीं पुष्पित कीड लागलेले नसावेत. पुष्पित उडीद रक्तशांत करणारे व फलयुक्त उडीद मांसवृद्ध करणारे आहेत. पुष्पफळावांचून मात्र ते दोषी होत.

हेमंतऋतूस आरंभ झाल्यापासून तीन दिवस पाणी पाजूं नये. नंतर आठ दिवस एक दिवसा आड पाणी पाजावें. पुढें रोज एकदां पाणी पाजावें. या रीतीनें या ऋतूंत पाण्याचा क्रम ठेवावा. ताजी दारू आणि मीठ किंवा तेल हे अश्वास प्रशस्त आहेत. रात्रींचा एक प्रहर गेल्यावर सुवासित केलेले उडीद द्यावेत अशा क्रमानें तीन स-

सप्तकें गेलीं असतां एका दिवसा आड त्यास फिरण्यास काढावें. श्रम होऊन घाम येई पर्यंत त्यास फिरवून मठ, माष (उडीद) द्यावेत, ते फार कठीण किंवा अगदीं शिजलेले नसावेत. उडीद खाऊन त्यास शूळ झाल्यास " शूळाध्यायांत " सांगितल्या प्रमाणें त्यास उपचार करावा. त्रिवृत, लोध्र आणि मीठ हे पदार्थ तुळशी सहित पाण्यांत टकून ते अश्वास हेमंतऋतूंत पाजले असतां प्रशस्त होत.

शिशिर पोषण.

शिशिर ऋतूंत तीन दिवस प्रतिपादन देऊन त्याच्या जठराग्नीच्या मानाप्रमाणें भोजन द्यावें. घामेजलेले फलमाष, चाकवत, तिळाचें तेल आणि मीठ मिसळून केलेली पेज अश्वास द्यावी. या ऋतूंत प्रतिपादन एक द्यावें, असें केल्यानें अश्वाचा श्लेष्मा (कफ) प्रकोप पावत नाहीं. या ऋतूंत अश्वास मोहन आणि वाहन एका दिवसा आड करवावें. खाणें झालें ह्मणजे अनुपानांत दारू पाजावी. सुंठ, मिरे, पिंपळी, वावडिंग, हिंग, वेखंड, सुयवा, बडिशेप आणि पांच क्षार हे दारूंत मिश्र करून तें प्रतिपादन शिशिर ऋतूंत द्यावें ह्मणजे जठराग्नि प्रदिप्त होऊन कफ दोषाचा नाश होतो. अश्वास या ऋतूंत २ सप्तकें जाई पर्यंत वहन करूं नये. आरंभीं पांच दिवस पाणी देऊं नये. पुढें दोन सप्तकें जाई पर्यंत एक वेळ पाणी द्यावें. तिसरे सप्तकांत अश्वास किंचित वहन करावें. चौथ्या सप्तकांत त्याच्या शक्ती प्रमाणें वहावें. पुष्पित व फल युक्त असे सातू दिले असतां पुष्टि, बल व आरोग्य यांची वृद्धि होते.

वसंत ऋतूंतील पोषणविधी.

अश्वास वसंत ऋतूंत त्याच्या शरीर मानाप्रमाणें ३ किंवा २ दि-

वसांनीं मीठ द्यावें. व्योष, लोध्र, वावडिंगे, क्षौद्र व सैंधव हे दारूंत घालून तें प्रतिपान पाजावें.

हेमंत, वसंत व शिशिर ह्या ऋतूंत घोड्यास सहा दिवस उन्हांत बांधावें.

ग्रीष्म पोषण.

या ऋतूंत घोड्याची जागा छायायुक्त असावी. दररोज तीन वेळ स्नान पान करावें. दिवस मावळीचें मूळ दुधांत घालून तें प्रतिपान द्यावें. अश्व अशक्त असल्यास मांस रस मिश्रित पाजावें. सातूचा भात, दही आणि थोडें सैंधव हें भोजन द्यावें. कुकुटीमूळ आणि ककु हें मिसळून प्रियंगु, पिंपळी, रोध्र, मध आणि विश्वभेषज हे पदार्थ दारूंत मिसळून द्यावेत.

सामान्य पोषण.

देशादेशाचे ठिकाणीं भिन्न भिन्न प्रकारचीं पुष्कळ गवतें आहेत, ह्मणून अमुकच गवताची याद येथें नांववार सांगितली नाहीं. ग्रीष्म आणि शरद् या ऋतूंत घोड्यास ओल्या प्रदेशावर बांधावें, आणि अन्यकाळीं शुष्क स्थळीं बांधावें. कोणत्याही काळीं आणि कोणत्याही रोगावर अश्वास दुर्वा (हरळी) फार हितावह आहे. अश्वास स्वस्थ असतांना मात्रा भरबस्ती द्यावी. तेल कालमानाप्रमाणें पांच सहा दिवसांनीं द्यावें. व्योष, जिरें, सैंधव, बीज, सौवर्चल, यांचें पाणीं द्यावें. हळद, पूतीक, भारंगी, शिग्र, कुबेरक, गोमूत्र, पिष्ट यांचा गोळा प्रातःकाळीं द्यावा ह्मणजे अग्नीचें दीपन व बल व तेज यांची वृद्धि होते. वरील गोळा दारूंत दिला असतां तो पाचन करितो.

घोड्यास धान्य ऋतूप्रमाणें कोणचें द्यावयाचें तें वर लिहिलें आहे. गवताविषयीं नियम सांगवत नाहीं. विलायती गवत, हरळी, कडबा व सुकें गवत, गव्हांचा भुस्सा यांवर त्याचें पोषण होईल. जवस ह्मणजे आळशी याची पेंढ दाण्यांत मिश्र करून दिली असतां ती घोड्यास हास येत्ये त्यावर सुखावह होईल. गाजरें, मुळा, बटाटे या प्रकारचे कंद चारले तर त्याजवरही त्याचें पोषण होईल परंतु एकाच कंदावर पोषण होऊं शकणार नाहीं त्यांत दुसरे योग्य धान्यांचें मिश्रण पाहिजे.

घोड्यास दाणा सकाळीं सात वाजतां, अकरा वाजतां दुपारीं, व तीन वाजतां तिसरे प्रहरीं व सायंकाळीं सात वाजतां याप्रमाणें एकंदर जो दाणा देणें असेल त्या मानानें चार वेळ सारखे प्रमाणानें इंग्लिश लोक देतात. नेटिव लोक सकाळीं सात वाजतां व सायंकाळीं सात आठ वाजतां मिळून दोन वेळ देत असतात. केव्हां केव्हां घोड्यास फार श्रम झाले असतील तर किंवा फार मजल झाली तर दोनप्रहरीं बारा वाजल्यावर दाणा देत असतात.

घोड्याला गवत दिवस रात्र मिळून प्रहरा प्रहरानें देत जावें. दाण्याप्रमाणें गवतही वजन करून द्यावें. घोड्यास पाचन शक्ति फार असते. तो हरळी किंवा गवत सुकें पंधरा पौन्ड रात्र व दिवस मिळून खाऊं शकेल. ओलें गवत जास्त लागेल. ज्या घोड्यास दाणा भरपूर असेल त्यास गवत फार लागत नाहीं. तसेंच रतीब ह्मणजे खुराक ज्या घोड्यास असेल त्यासही गवत कमी लागतें.

पश्चिम देशचे जे घोडे असतात ते पुष्कळ मेवा ह्मणजे खजूर वगैरे खातात. त्यांस बहुतकरून जव, मठ, बाजरी, भुस्सा, गहूं हे एक ठिकाणीं मिळवून खावयास देतात. त्यांस हिरवें व सुकें

गवत व उंटाचें व दूम बकऱ्याचें दूध पिण्यास देतात.

उत्तर देशांत बरसातींत व गरमीचे दिवसांत आणि हिंवाळ्यांत तूप, साखर, गूळ हे जिन्नस खावयास देतात. पूर्व देशांत उत्तर देशाप्रमाणेंच पदार्थ खावयास देतात. दक्षिण देशांत कुळित, मठ, उडीद व बाजरी देतात. परंतु मुख्य हरबरे देण्याची वहिवाट प्रशस्त आहे. उत्तर देशाप्रमाणें तूप, साखर, गूळ, दूध वगैरे रतीबही देतात.

सामान्य पोषण.

सर्व ऋतूंत कोरडे सातूची चंदी द्यावी त्यापासून त्यास अरोग्य आहे. सातू न मिळाल्यास हरबरे किंवा मटकी द्यावी हें धान्य दहा व पित्तनाश करतें. मका धान्य मिळाल्यास त्याची डाळ द्यावी, अथवा त्याचें पीठ करून त्याची भाकरी तेल घालून द्यावी, ती पुष्टकारक व उत्साह देणारी आहे. मका न मिळाल्यास मुग धान्याचे घांस त्यांत तेल घालून द्यावेत. सातू न मिळाल्यास त्याचा भुसा द्यावा. सातूपेक्षां दुसरें धान्य घोड्यास उत्तम नाहीं. सातूचे योगानें रोगग्रस्त घोडा असल्यास तो पुष्ट होतो.

टिप—घोड्यास चंदी, वैरण व पाणी पिण्यास देणें आणि त्यास मालीश करणें व आंगधुणें यांजविषयीं वळू घोड्याचे प्रकरणांत जे नियम सांगितले आहेत तेच लागू करावेत.

वसंतऋतु (चैत्र वैशाख.)

ह्या ऋतूंत अश्वास रक्त काढल्यास दररोज एक पावशेर गोमुत्र व हिरडा तेलांत चारावा ह्मणजे तो सर्व रोग दूर करणारा व गुणकारक होतो. दुसरा उपाय—मटक्याची डाळ करून उन्हाळ्यांत घोड्यास द्यावी अथवा त्याचें पीठ करून त्याचे रोट तेलांत घालून द्यावेत ह्मणजे घोड्यास उत्साह राहून तो अरोग्य असतो. घोड्यास हरबरे व जव यां खेरीज दुसरें पुष्टकारक धान्य नाहीं. घोड्यास

लंघन पडलें तर ह्मणजे त्यास दाणा न मिळाला तर तूप द्यावें, तूप न मिळाल्यास गाईचें किंवा बकरीचें दूध पाजावें. ह्या ऋतूंत त्यास लोणी चारल्यानें तो पुष्ट होतो. अरण्यांत किंवा दुष्काळांत घोड्यास जें मिळेल तें गवत द्यावें, ह्यावेळीं तें अमुकच जातीचें असलें पाहिजे असें कांहीं नाहीं. वसंतऋतूंत घोड्यास सदोदीत हिंडवावें. त्यास ठाणावर बांधून ठेवूं नये, ठविल्यास त्याचा उत्साह नाहींसा होऊन त्यास आळस येतो. ह्या दिवसांत घोड्यास लिंब व मीठ द्यावें, लिंब न मिळाल्यास तेल व मीठ द्यावें, तेल न मिळाल्यास तूप द्यावें.

ग्रीष्मऋतू (जेष्ट आषाढ.)

या काळांत त्यास रोज हरळी चारावी व च्छायेत बांधावें व तूप चारावें ह्मणजे त्या योगें त्याचा संताप जातो. पाण्यांत बाजरीच्या पिठाच्या गोळ्या करून देत जाव्या. रक्त काढणें झाल्यास तें ह्या दिवसांत काढावें.

वर्षाऋतु (श्रावण भाद्रपद.)

घोड्यास ऊन पाण्यानें धुणें व दारू पिण्यास देणें हे रोगहरक उपाय होत. वर्षाकाळांत नवें पाणी दिलें तर तें बळ नाहींसें करतें ह्मणून नवें पाणी देऊं नये. सुकलेल्या जवाचा चारा घोड्यास नेहमीं द्यावा त्यानें रोग जातो व तेज येतें. दूध व जवाचा चारा दिल्यानें घोडा पुष्ट होतो. व यापेक्षां मटकीही त्यास सर्वदा पुष्टता करते आणि दहा व पित्त यांचा नाश करते ह्मणून ती देत जावी. या ऋतूंत घोड्याकडून प्रवास करवूं नये. त्यास विहिरीचें पाणी पिण्यास द्यावें. कडू तेलानें स्नान घालावें व त्यास स्वच्छ जागेंत बांधावें. एक दिवसांत दोन पल (४ तोळे) मिठ खाण्यास द्यावें दारू दिल्यानें निरोगी राहतो. उष्णोदकानें घोड्यास स्नान घातलें असतां त्याचें शरीर तेजस्वी रहातें.

शरदऋतु (आश्विन कार्तिक.)

या दिवसांत घोड्यास रात्रीं दररोज एक शेर प्रमाणें दूध तापवून द्यावें. त्यास सकाळीं नदीचें किंवा सरोवराचें पाणी सातूचें पिठ मिळवून पाजावें. वाईट पाणी कधीं पाजूं नये. या ऋतूंत तूप एकदां पाजावें व सातूची चंदी सात दिवस द्यावी.

हेमंतऋतु (मार्गशिर्ष पौष.)

शिरमाचे तेलानें स्नान घालावें व निवांत ठिकाणीं बांधावें व चार तोळे मिठ सकाळीं द्यावें ह्मणजे त्याणें घोड्याचा मुखरोग जातो.

दुसरा उपाय-उडीद शिजवून द्यावेत व निवांत ठिकाणीं बांधावें. तूप किंवा तेल हें जवाचे पिठा बरोबर एक वेळ केव्हां तरी या ऋतूंत परमीत प्रमाणानें चारावे. ऊन पाण्यानें घोड्यास धुवावें व दारू पिण्यास द्यावी ह्मणजे त्याचे सर्व रोग जातात.

शिशिरऋतु (माघ फाल्गुन.)

या ऋतूंत घोड्यास उडीद शिजवून द्यावेत व निवांत ठिकाणीं बांधावें. त्यास जवा बरोबर तूप किंवा तेल परमित प्रमाणानें द्यावें.

दुसरा उपाय-सातूचें गवत चारावें, गोडें किंवा शिरसाचें तेल पावशेर तीन दिवस किंवा सात अथवा एकवीस दिवस याप्रमाणें द्यावें. हरबऱ्याची डाळ किंवा मसूर सगळ्या द्याव्यात. ह्याप्रमाणें दिलें असता घोडा फार सुखी राहील. जवाचा चारा पुष्टिकारक आहे. दूधही पाजणें झाल्यास ह्या ऋतूंत पाजावें, तें चांगलें पुष्टिकारक आहे. जवाची चंदीही पुष्टिकारक आहे.

वळू घोड्याविषयीं.

१. वळू घोडा करावयाचा तो शक्तिवान, निरोगी, चांगल्या स्वभा-

बाचा व त्याची अवलाद चांगली असावी. घोडा देखणेदार असावा. म्हातारा झाला असतां त्याजकडून घोडी काढवूं नये. घोडी वृद्ध आणि घोडा तरूण किंवा त्याचे विरूद्ध ह्मणजे घोडा वृद्ध आणि घोडी तरूण याप्रमाणें असल्यास त्याजपासून जी संतति (शिंगरूं) होईल ती अशक्त होईल. आईबापाचे जे बरे वाईट गुण असतात तेच शिंगरास लागतात, या करितां आईबाप चांगले गुणाचे असावेत. बहुतकरून वळू घोडे अरबी जातीचे असतात. कारण अरबी पेक्षां उत्तम घोडा हल्लीं कोणताच नाहीं. दक्षिणेंतील भिवरथडी व मानदेशी घोडे वळू करण्यासारखे चांगले असतात. परंतु त्यांच्या मध्यें इतर जे गुण असावयाचे ते कमी असतात. फक्त देखणे व शरिरानें दृढ हे गुण चांगले असतात. वळू घोड्यास खुराक देत असावा. कारण मादवान्या त्यांजकडून काढविल्यानें त्यांचें विर्य कमी होऊन ते अशक्त होतात. मादवान्या काढविणें त्या सकाळीं सात वाजता किंवा सायंकाळीं पांच वाजतां काढवाव्या व तिजला दुसरे दिवशी तो घोडा दाखविला पाहिजे. कारण एक वेळ घोडा दिल्यानें केव्हां केव्हां घोडीस गर्भ धारण होत नाहीं.

२. वळू घोड्यास विर्य वृद्धि होण्यास औषध-भुई कोहळे ९ शेर आणि कवस कुहिरीचें बी ९ शेर एकत्रकरून त्यांचें चूर्ण करावें. हें गाईचे अर्धमण दुधांत घालून आटवावें आणि त्याचा खव्यासारखा घट्ट गोळा करावा. त्यांत ९ शेर तूप व २ शेर साकर घालून तो सात दिवस द्यावा. हें औषध सुकूं द्यावें आणि नासेल ह्मणून त्याजकडे वरचेवर पहात असावें.

३. घोडा घोडीस दिला आणि लागलीच त्यास चामणी मिळाली नाहीं तर अंगास थंडपणा येऊन वारंवार घाम येतो, शक्तिहीन होतो, खाणें अगदीं कमी होतें तेव्हां त्यास उपचार-हिरडे, बेहडे, आ-

वळकंठी, सुंठ, मिरे, पिंपळी, सराटे, भद्रमोथा, भुईनिंब व वावडींग हीं सर्व औषधें प्रत्येक ९ टाक प्रमाणें घेऊन त्यांत पाणी ९ शेर घालून अष्टमांश काढा करावा. त्यांत मध नऊ टाक घालून पोटांत द्यावा, असें सात दिवस केलें असतां घोडा हुषार होईल.

४. रोग व व्यंगाविषयीं मागें जो अभिप्राय लिहिला आहे तो वंश परंपरेचे प्रकारचे रोगांविषयीं तर अधिक लागूं आहे. ज्या मादीचे पायांचे नळ्यास मोत्रा असेल त्या मादीची औलाद घेणेंच झाली तर ज्या वळूच्या नळ्या अगदीं साफ असतील तो वळू तिस दिला पाहिजे. नर व मादी या दोघांस मोत्रे असले तर त्यांचे औलादीस मोत्रा जरूर होतो नाहीं तर त्या औलादीस मेहनत पडली ह्मणजे तो होतोच होतो. शक्य असेल त्या प्रमाणें रोगी पायाची औलाद घेऊं नये आणि वळूस इतर पुष्कळ काम असेल तेव्हां रोगी माद्या तशाच फार रोड किंवा औलाद घेण्याविषयीं इतर रीतीनें उपयोगी असणाऱ्या माद्या रद्द कराव्या.

वंश परंपरेचे रोग बहुतकरून असतात ते मोत्रा व चक्रावळ व मुठींत हाड वाहाडणें व वेरहड्डी व शेंचा हे आहेत.

वळू घोड्यांचा उपयोग.

वळू घोड्यास किती माद्या द्याव्या त्यांची संख्या अशी कीं, एका घोड्यास पांच दिवसांत एक मादी पुरे, अधिक माद्या दिल्यानें त्याचे शक्तीचा क्षय होईल. परंतु या मर्यादे प्रमाणें चाललें तर माद्यांचे मालक दुरून बहुधा येतात त्यांची निराशा होईल. यास्तव या मर्यादे प्रमाणें अगदीं बरोबर चालणें केव्हां केव्हां कठीण पडतें. तथापि घोड्यास फारच वारंवार माद्या दिल्या तर त्यांपैकीं थोडक्याच माद्या सबर होतात ही गोष्ट लक्षांत

ठेविली पाहिजे. आणि ही गोष्ट मुळींच घोडे न मिळाल्याप्रमाणेंच मालकांस निराशेची आहे. या खेरीज घोड्याचे शक्तीची नुकसानी होते. त्याचे नांवास बट्टा लागतो, माद्यांस घोडा देण्याचें काम फार चाललें असेल तेव्हां घोड्यास जास्ती चंदी किंवा बाजरीच्या भाकरींत पौष्टिक पदार्थ घालून त्या द्याव्यात. जे घोडे थंडे झाले असतील त्यांस अगदीं विसावा दिला पाहिजे; आणि जरूर असेल तर ते अगदीं बरे होत तोंपर्यंत त्यांस औषधोपचार करावा आणि मग त्यांस माद्या देणें त्या फारच कमी द्याव्या.

मादीस दोन वेळां घोडा देणें असें करणें जरूर असो किंवा नसो तथापि असें करण्याची चाल आहे. बरोबर ह्मटलें ह्मणजे तीन किंवा दोन दिवसांचे अंतरानें पुनः घोडा देण्यास काढावा. परंतु एतद्देशीय लोक दूर दूर ठिकाणांहून येतात त्यांस फार दिवस क्वचित थांबतां येतें. यास्तव मादीस दोन दिवस सतत किंवा एकाच दिवशीं प्रातःकाळीं व सायंकाळीं बहुधा घोडा द्यावा लागतो. असें केल्यानें घोड्याची नुकसानी होते, व मादीचा ही बहुधा उपयोग होत नाहीं. तथापि माद्यांचे मालकांस नाराजी करून पाठवून देण्यापेक्षां असें करणें बेहत्तर आहे.

माद्या पसवल्यानंतर लवकरच त्यांस घोडे देण्याची चाल पुष्कळ ठिकाणीं आहे आणि असें करण्यास हरकत नाहीं, असें केल्यानें माद्या चांगल्या सबर होतात अशी पुष्कळांची समजूत आहे. वळू घोडा पसंत करणें तें हजर झालेले मादीचे मालकास सांगावें. परंतु असें करतां येत नाहीं, कारण घोड शाळेंत जो घोडा सर्वांहून मोठा असतो तोच एतद्देशीय लोक बहुतकरून पसंत करतात, आणि असें झाल्यानें तो लौकरच निरुपयोगी होतो. वळू घोड्याबद्दल फी देण्यास लोक राजी होण्याचे दिवस पुढें कदाचित येतील. तेव्हां आवडते

वळूबद्दल जास्ती फी ठरवून मग त्या लोकांस घोडे पसंत करूं दिले असतां चालेल, परंतु तसें आतां करतां येत नाहीं, आणि जेव्हां करण्यांत येईल तेव्हां सरकारी वळू घोडे मागण्यासाठीं माद्यांचे मालक न येत असें न होई असे रीतीनें हळू हळू व फार सावधगिरीनें केलें पाहिजे. ज्यांचे स्वाधीन वळू घोडे असतात त्यांजकडेसच माद्यांसाठीं घोडे पसंत करण्याचें काम हल्लीं बहुतकरून राहिलें पाहिजे. कोणते मादीस कोणता घोडा योग्य हें बरोबर ठरविण्याची माहिती व हुशारी या लोकांस क्वचित असते. यामुळें हल्ली घोडे देतात ते बहुतकरून पाळीप्रमाणें नेहमीं देतात. मादी कशीही असो तें मनांत न आणितां ज्या घोड्याची पाळी असेल तो घोडा देण्यासाठीं बाहेर काढतात. परंतु योग्य विचार करून वळू घोडा पसंत करणें फार जरूर आहे यास्तव खालीं लिहिलेल्या गोष्टी सुचविल्या आहेत:-

सूचना १ ली-नुसते घोड्याचे कुवतीकडे लक्ष दिलें पाहिजे मादीपेक्षां घोडा कांहींसा मोठा असला तर चालेल. परंतु फार मोठा असला तर त्यापासून जोखीम होते आणि कांहीं उपयोग होत नाहीं, मादीस दुखापत कदाचित होते. तिला काढविल्याचें फळ बरोबर होत नाहीं, कारण औलादीची कद मादीचे कदीप्रमाणें बहुतकरून होते, नराचे कदीप्रमाणें होत नाहीं.

सूचना २रा-मादी आणली असेल तींत कोणते गोष्टीचें मोठें व्यंग आहे तें पहावें आणि त्याच गोष्टी विषयीं जो वळू घोडा चांगला असेल तो निवडून काढावा. उदाहरण-मादीचा पुठ्ठा नाजूक, लांबट व पोंचरा असेल तर नराचा पुठ्ठा आखूड, मजबूत व कांहींसा वर उचललाही असावा. या देशाचे बहुतेक माद्यांचे मागले पाय नाजूक व फेंगडे असतात त्याप्रमाणें मादीचे मागले पाय वांकडे असतील तर ज्या वळू घोड्याचे मागचे पाय सरळ असून नळ्या मोठ्या व जाड असतील तसा पसंत करावा.

प्रत्येक नरांत व प्रत्येक मादींत कांहीं तरी एखादें मोठें व्यंग असतें. यास्तव एकाच व्यंगाची मादी व नर असूं नयेत. अशी तजवीज केल्यानें औलाद व्यंग रहीत होण्याचा संभव आहे

सूचना ३ री-मादीची उत्पत्ति कशी झाली आहे याविषयीं विचार केला पाहिजे. एका जातीची मादी व दुसरे जातीचा नर यापासून झालेल्या पसू घोड्या आतां पुष्कळ येऊं लागतील; आणि या देशांतील घोड्यांची उत्पत्ति कायमची सुधारण्याचा आपला मोठा भरंवसा पसू घोड्यांचे औलादीवर आहे यास्तव असे पसू घोड्यांची उत्पत्ति कशी झाली आहे त्याकडे विशेषेंकरून लक्ष दिलें पाहिजे.

रीति ह्मटली ह्मणजे एका जातीची मादी व दुसरे जातीचा वळू घोडा यापासून औलाद झाली ह्मणजे ज्या जातीचा वळू घोडा प्रथम दिला असेल त्याच जातीचा वळू घोडा त्या औलादी माद्यास पुढें देत जावा. उदाहरणः—या देशाचे मादीस अरबी वळूपासून शिंगी झाली असेल तिस घोडा देणें तो अरबी वळू दिला पाहिजे. विलायती वळूपासून शिंगी झाली असेल तर तिस विलायती वळू दिला पाहिजे. असें करीत गेलें ह्मणजे कांहीं पिढ्या झाल्यावर या देशांत घोड्यांची औलाद शुद्ध व कायमची होईल परंतु असें न केलें व वारंवार बिजांत फेरफार केला तर मिश्र जातीची औलाद होईल व ती कधीं कायम राहणार नाहीं. सरकारी वळू बहुतकरून अरबी असतात. यामुळें या नियमाप्रमाणें त्यांचे औलादीविषयी चालण्यास अडचण पडणार नाहीं. परंतु विलायती वळू फार थोडके असतात. सबब त्यांचे औलादीविषयी या नियमाप्रमाणें चालण्याची सक्ती करतां येत नाहीं. मोठे कदीची औलाद होण्यासाठीं प्रथम विलायती वळूची औलाद घेऊन मग त्या औलादीस अरबी वळू दिल्यानें केव्हां केव्हां